पुणे, वार्षिक वर्गणी २०० रुपये, किंमत २० रुपये, एप्रिल-मे-जून २०२४, खंड २३, अंक १-२-३, पृष्ठे ८८

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्बोधक व माहितीपूर्ण मासिक

३ ■ मुसंडी
५ ■ आर्थिक पुनरुत्थानाची नवी चिनी दिशा...
१० ■ चीनचा डोळा 'पांढऱ्या सोन्या'वरही!
१७ ■ चिनी महत्त्वाकांक्षेचा विस्तारता परिघ
२५ ■ चिनी धरणांना बांध घालायचा कसा?
३१ ■ सक्तीच्या नागरीकरणाची चिनी शोकान्तिका
४१ ■ चिनी परराष्ट्र धोरणातील वाक्वळणे
**अर्थबोधपत्रिका पुरवणी**
५२ ■ भक्तीचळवळ आणि राजकीय मूल्यव्यवस्था

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**

**वार्षिक वर्गणी २००/– रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $ २०)** वर्गणी डिमांड ड्राफ्ट/मनीऑर्डर/पोस्टल ऑर्डर/ चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. **त्याबरोबर नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.

वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, (रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : ०२०-२५६५७१३२, २५६५७२१०, २५६५७६९७
ई-मेल : ispepune@gmail.com
www.ispepune.org.in

**अर्थबोधपत्रिका**
**खंड २२ (अंक १०-११-१२)**
**जानेवारी-फेब्रुवारी-मार्च- २०२४**
**संपादक – अभय टिळक**
**सहयोगी संपादक – पराग पोतदार**

- **अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?**
- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- नि:पक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

## अर्थबोधपत्रिकेचा हेतू

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यत: इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी अनेक माहिती संदर्भासह पुरविणे.**

*अर्थबोधपत्रिका कशी साकारते?*

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याल अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

---

- या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि / किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.
- अंकातील लेख आपण नियतकालिकात / वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे. **यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे. – तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# मुसंडी

‘अर्थबोधपत्रिके’च्या या जोडअंकाचे, अगदी योगायोगाने, जणू काही दोन भाग झालेले आहेत. एका भागाचा दुसऱ्या भागाच्या अंतरंगाशी अणुमात्रही संबंध नाही, असे एक मजेदार रसायन आपसूकच घोटले गेलेले आहे. अंकातील पहिल्या भागातील विवरण वाहिलेले आहे ते, १९७८-७९ सालापासून वैश्विक सत्तापटलावर अकल्पित अशी मुसंडी मारून लक्षवेधी स्थान बळाने पटकावलेल्या चीनच्या बहुपेडी कारवायांचे आणि उपद्व्यापांचे विविध पैलू समजावून घेण्याला. शीतयुद्धाच्या अंतानंतर पूर्णपणे अमेरिकाकेंद्री बनलेल्या वैश्विक सत्तापटावर आपली सोंगटी पुढे रेटत जागतिक व्यवहारांचा अमेरिकेवरील झोत क्रमाक्रमाने ढळवण्याचा निकराचा प्रयत्न चिनी नेतृत्व तेव्हापासून नेटाने करते आहे. दक्षिण आशियातील निर्विवाद बलशाली सत्ता असे आपले स्थान पक्के करण्याचा चीनचा मनसुबा आता केव्हाच मागे पडून वैश्विक पटलावरील एक निर्णायक ताकद म्हणून आपली ओळख प्रस्थापित करण्याचा चंग आता चीनने बांधलेला आहे. अमेरिकेच्या प्रभुसत्तेला आव्हान देणे आणि यथावकाश जगाच्या नकाशावरील सर्वोच्च सत्ताकेंद्र म्हणून स्थान बळकावण्याचे चिनी नेतृत्वाचे हेतू आता लपून राहिलेले नाहीत. बळकट अर्थकारण हे इथून पुढच्या काळातील राजकीय तसेच लष्करी अधिसत्तेचे अधिष्ठान असणार आहे, हे हेरून आर्थिक वाटचालीची गती बुलंद राखण्यासाठी जे काही करणे अनिवार्य आहे त्याचा पाठपुरावा चीन आज करताना दिसतो. उभा आर्थिक विकास हा स्वरूपत:च कमालीचा ऊर्जासघन असणार आहे हे पक्के उमजलेला चीन जगभरातील ऊर्जासाधनांवर या ना त्या साधनाने कबजा करण्यासाठी आसुसलेला चीन त्याच हेतूने आफ्रिका खंडात गेले दीड तप हातपाय पसरतो आहे. त्याच वेळी, आपल्या या विस्तारवादी आक्रमक पवित्र्यापायी बिचकलेले पश्चिमी देश आपली आर्थिक तसेच व्यापारी नाकेबंदी करू शकतात हे जाणून चीन आजवर अवलंबलेल्या आर्थिक विकासाच्या निर्यातोन्मुख प्रारूपाला मुरडही घालतो आहे. या सगळ्या झटापटीमध्ये जे नाना

प्रकारचे ताणतणाव व समस्या चीनच्या पुढ्यात उभ्या ठाकत आहेत त्यांचा पुढील पानांत घेतलेला धावता आढावा रोचक वाटावा.

या अंकातील पुरवणी मात्र वाहिलेली आहे एका अगदी अनोख्या चर्चाविषयाला. मध्ययुगीन महाराष्ट्रातील राजकीय विचारामध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय यांसारख्या मूलभूत मानवी मूल्यांची रुजवण घडून येण्यात भागवतधर्मीय वारकरी संतपरंपरेचे योगदान नेमके कशा प्रकारचे राहिले, याचा धांडोळा घेण्याचा प्रयत्न तिथे केलेला आहे. कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठामध्ये अलीकडेच आयोजित करण्यात आलेल्या एका परिसंवादामध्ये या विषयासंदर्भात काही एक ऊहापोह साकारला. मराठी संतपरंपरेच्या बहुमिती कार्यकर्तृत्वाबद्दल आजवर विपुल चिंतन-मंथन झालेले आहे. परंतु, संतप्रणीत भक्तीचळवळ आणि राजकीय मूल्यव्यवस्था हा त्या मानाने अल्पचर्चित चिकित्सा प्रांत आहे. संतप्रणीत मूल्ये आणि राजकीय मूल्यव्यवस्था यांच्या आंतरसंबंधांचा मागोवा घेण्याचा हा एक प्रयत्न जिज्ञासू वाचकांना विचारार्ह वाटेल, अशी आशा आहे.

## वाचकांना विनंती

अर्थबोधपत्रिकेचा अंक दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी– 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. संकेतस्थळाला वाचकांनी अवश्य भेट द्यावी. www.ispepune.org.in**

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

# आर्थिक

## आर्थिक पुनरुत्थानाची नवी चिनी दिशा...

चिनी अर्थव्यवस्था आणि पर्यायाने एकंदरच चिनी समाज स्थित्यंतराच्या एका मोठ्या पर्वातून सध्या वाटचाल करत आहे. साहजिकच, चीनमध्ये एकंदरच लक्षणीय अशी अशांतता विविध आघाड्यांवर अनुभवास येते आहे. 'कोविड-१९'च्या संसर्गाचे समूळ उच्चाटण घडवून आणण्यासाठी चिनी धोरणकर्त्यांनी नेटाने जारी केलेल्या 'झीरो कोविड' अभियानाची अधिकृत सांगता २०२३ या वर्षाच्या जानेवारी महिन्यात तिथे करण्यात आली. 'कोविड'च्या प्रादुर्भावापायी २०२० सालापासून चांगलीच जेरीस आलेली चिनी अर्थव्यवस्था 'झीरो कोविड' अभियानाच्या सांगतेनंतर हळूहळू कात टाकायला लागेल, अशी आशा चिनी नेतृत्वाला होती. परंतु, 'झीरो कोविड' अभियानाच्या अधिकृत सांगतेस आता चांगले सवा वर्ष उलटून चालले तरी, चिनी अर्थव्यवस्थेमध्ये पुनरुत्थानाची दमदार झळाळी अजूनही कोठे दिसत नाही. हे असे का होते आहे, या प्रश्नाचे नेमके उत्तर हाती येत नसल्याने चिनी धोरणकर्ते व नेतृत्व सध्या पुरते चक्रावून गेलेले दिसते. १९७८ सालापासून २०२० सालापर्यंत, म्हणजे, पुरती चार दशके सणसणीत वार्षिक दराने आगेकूच करणारी चिनी अर्थव्यवस्था मलूल होऊन पडलेली असल्याने चिनी धोरणकर्ते अस्वस्थ आहेत. आणि चिनी अर्थव्यवस्थेलाच हुडहुडी भरत असल्याने जागतिक अर्थव्यवस्थेतही गारठा फैलावेल का, अशी आशंका सर्वत्रच गडद बनते आहे.

चिनी धोरणकर्त्यांच्या पुढ्यातील आजमितीची मुख्य समस्या आहे ती अर्थव्यवस्थेंतर्गत दुर्बळ मागणीची. 'झीरो कोविड' अभियानाच्या सांगतेनंतर चिनी बाजारपेठांमध्ये मागणीच्या झुळुका वाहू लागतील, ही धोरणकर्त्यांची अपेक्षा आजही अधांतरीच आहे. मुख्यत: चिनी तरूणाईची अस्वस्थता वाढवणारी चिवट बेरोजगारी, गर्तेमध्ये रुतलेले चिनी बांधकाम क्षेत्र, मुळात मागणीच मान टाकून बसलेली असल्याने वस्तू व सेवांच्या किमतींमध्ये दिसून येणारी उतरती भाजणी, चिनी चलनाचा घडून

आलेला मूल्यऱ्हास... अशा नाना समस्यांच्या भोवऱ्यात चिनी अर्थव्यवस्था सध्या घुसमटते आहे. या गर्तेमधून बाहेर पडण्यासाठी चिनी धोरणकर्ते व नेतृत्व आता, दमदार आर्थिक वाढविकासासाठी आजवर अवलंबलेल्या धोरणांमध्ये मूलभूत स्वरूपाचे स्थित्यंतर घडवून आणण्याच्या दिशेने प्रयत्नशील बनलेले दिसते.

या धोरणात्मक स्थित्यंतराचे व्यवहारात अवतरणारे परिणाम नेमके कसे असतील आणि जे काही परिणाम जेव्हा केव्हा दिसतील तेव्हा चिनी अर्थकारणात त्याचे अपेक्षित असणारे पडसाद उमटतील किंवा नाही, यांबद्दलही अनेक अर्थतज्ज्ञ सचिंत आहेत. १९७८ साली आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाची पायाभरणी केल्यापासूनच चीनने वेगवान प्रगतीसाठी धोरण अवलंबले ते विकासाच्या निर्यातप्रधान प्रारूपावर बेतलेले. साहजिकच, चीनचा सारा भर राहिला तो परदेशी, आणि त्यांतही मुख्यत:, पश्चिमी बाजारपेठांमधील मागणीवर. प्रारंभापासून पहिली तीन दशके त्या 'मॉडेल'ने चिनी अर्थव्यवस्थेला हात दिला, हे कोणीच नाकारणार नाही. परंतु, २००८ साली उद्भवलेल्या जागतिक आर्थिक अरिष्टाद्वारे त्या प्रारूपाच्या अंगभूत मर्यादा उघड्या पडल्या. पश्चिमी बाजारपेठांमधील मागणी खचल्याने चिनी अर्थव्यवस्थेलाही त्या घसरणीचे चटके बसायला सुरुवात झाली. त्या फटक्यातून सावरण्यास चीनला जवळपास २०१२-१३ हे वर्ष उजाडावे लागले.

मात्र, २०१६ साली अमेरिकी अध्यक्षपदाची निवडणूक जिंकलेल्या डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनच्या विरोधात व्यापारी युद्धच जणू छेडले आणि तिथून चिनी अर्थव्यवस्थेच्या तिथवरील आगेकूचीला जबर पायबंद बसू लागला. परदेशी बाजारपेठांतील मागणीवर आपला आर्थिक विकास या पुढे फार काळ अवलंबून ठेवता येणार नाही, याची जाणीव झालेल्या चिनी नेतृत्वाने, तेव्हापासून, क्रमाक्रमाने देशांतर्गत बाजारपेठेच्या विकासाकडे मोहरा वळवला. आर्थिक विकासविषयक धोरणांच्या दिशेमधील मूलभूत वळणाचे ते पहिले पर्व होते. परंतु, हे काम सोपे नाही याची जाणीव चिनी धोरणकर्त्यांना वारंवार प्रकर्षाने होऊ लागली. आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमानंतर पुरी तीन दशके देशांतर्गत मागणीचे जाणीवपूर्वक केलेले दमन व कुपोषण लगोलग संपणारे नव्हते. मग, त्यांवर मात करण्यासाठी चिनी धोरणकर्त्यांनी प्रयत्नांचा झोत एकवटला तो नागरीकरणावर आणि नवीन शहरांच्या निर्मितीवर.

**धोरणात्मक हाराकिरी**

ही, तसे म्हणले तर, एक प्रकारची धोरणात्मक हाराकिरीच होती. नगरांमध्ये वास करणाऱ्या नागरिकांची उपभोगप्रवणता ग्रामीण भागांतील रहिवाशांच्या तुलनेत

अधिक असते, या अर्थवास्तवाच्या पायावर त्या धोरणात्मक नवदिशेची उभारणी होत होती. २०१६-१७ सालाच्या आगेमागे ती प्रक्रिया चिनी धोरणकर्त्यांनी प्रादेशिक स्तरांवरील शासनयंत्रणांच्या माध्यमातून आक्रमकपणे राबविली. विभागीय स्थानिक शासनसंस्थांनी तशा विकासासाठी भरभक्कम कर्जे उभारली. शहरीकरण वाढले की शहरी लोकसंख्येमध्ये वाढ घडून येईल आणि खर्चाळू शहरवासियांचे एकंदर लोकसंख्येतील प्रमाण वाढू लागले की त्यांद्वारे अर्थव्यवस्थेतील एकंदर मागणीला तरतरी येईल, अशी तर्कशुद्ध अटकळ त्यांमागे होती. परंतु, त्या धोरणात्मक वळणालाही म्हणावे असे यश आले नाही. उलट त्यांतून झाले भलतेच. एकीकडे, ग्रामीण भागांतील नागरिकांचे नवनिर्मित शहरांमध्ये चिनी सरकारने सक्तीचे स्थलांतर घडवून आणल्याने स्थलांतरित शहरी बेरोजगारांची समस्या 'आ' वासून उभी राहिली. कारण, सक्तीने स्थलांतरण घडवून आणलेल्या ग्रामीण चिनी रहिवाशांचा प्रवेश शहरी अर्थव्यवस्थेत घडून यावा अशा प्रकारच्या उचित रोजगारक्षमतेचा मुळातच त्यांच्या ठायी अभाव होता. दुसरीकडे, नव्याने उभारलेल्या शहरांमध्ये बांधलेल्या इमारती व निवासी गाळे विनावापर पडून राहात चालले. त्याचे कारण सोपे व सरळ होते. मुळात तेवढ्या संख्येने निर्माण केलेल्या बांधकामांना मागणीच नव्हती. नव्याने निर्माण केलेल्या शहरांमध्ये ओस पडलेली बांधकामे भरायला त्यानंतर जवळपास पाच ते सहा वर्षे जावी लागली. त्याचदरम्यान फेरा आला 'कोविड-१९'चा.

देशांतर्गत अर्थकारणामध्ये असे सगळे प्रयोग चालू असतानाच, वैश्विक स्तरावरही चीनची धडपड चालूच होती. चीनचे सर्वेसर्वा शी जिनपिंग यांनी त्यांच्या महत्त्वाकांक्षी अशा 'बेल्ट ॲन्ड रोड इनिशिएटिव्ह' या प्रकल्पाचे ऐलान केले २०१३ साली. पूर्व आशिया आणि युरोप यांना महामार्ग, रेल्वे यांसारख्या दळणवळणाच्या सुविधांद्वारे जोडणारे पायाभूत सेवासुविधांचे महाकाय जाळे निर्माण करण्याचा प्रधान हेतू असलेल्या या प्रकल्पाने यथावकाश आफ्रिकेत तसेच लॅटिन अमेरिकेतही आपले हातपाय पसरले. चिनी गुंतवणुकीला बढावा मिळून त्यांद्वारे चिनी अर्थविकासाला जबरदस्त चालना देण्याचा तो प्रचंड हिकमती उपक्रम राबविण्यात चीनने त्या मार्गावरील देशांना त्यांत सहभागी करून घेण्याचा सपाटा चालू केला. आर्थिकदृष्ट्या दुर्बल देशांना त्यांसाठी चीनने कर्जे देऊ केली. चिनी युआनला हळूहळू जागतिक चलन बनविण्याचा सुप्तासुप्त हेतू त्यांमागे होता व आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून चीनचा विस्तारवादी पवित्रा अमेरिकेसह एकंदरच पश्चिमी राष्ट्रांना धोकादायक वाटू लागला. दरम्यानच्या काळात, या महाकाय उपक्रमामध्ये सहभागी होण्यासाठी

चीनने दाखविलेल्या आमिषांना प्रथम बळी पडलेल्या अनेक देशांना त्यांपायी त्यांच्या डोक्यावर चढणारा कर्जांचा बोजा असह्य भासू-जाणवू लागला. परिणामी, त्या देशांमध्ये सदर प्रकल्पाबाबत निरुत्साह व साशंकता बळावू लागली. साधारण समांतरपणे देशांतर्गत आणि देशाबाहेर हातपाय मारण्यास सुरूवात केलेल्या चिनी अर्थकारणाला व त्याच्या मुळाशी असणाऱ्या धोरणदृष्टीला, यां सगळ्यांमुळे, वेसण बसू लागली.

**बांधकाम क्षेत्राची दुहेरी कोंडी**

कोणत्याही अर्थव्यवस्थेमध्ये बांधकाम उद्योगाची गणना पायाभूत उद्योगांच्या श्रेणीमध्ये केली जाते. कारण, एकट्या बांधकाम उद्योगास चालना मिळाली अथवा दिली गेली की सीमेन्ट, पोलाद, रंग, फर्निचर, घरबांधणीची उपकरणे अशांसारख्या विविध आनुषंगिक उद्योगव्यवसायांची चाके वेगाने फिरायला लागतात. मंदावू पाहत असलेला चिनी अर्थव्यवस्थेचा गाडा पुनश्च गतिमान बनावा यासाठी बांधकाम उद्योगाला सरकारी धोरणदृष्टीचा टेकू पुरविण्याचे पाऊल चिनी शासनसंस्था अलीकडील काळात सतत उचलत आलेली आहे. मात्र, चिनी अर्थव्यवस्थेचा सरासरीने उतरणीला लागलेला वाढीचा वार्षिक दर आणि चिवट बनत असलेली बहुक्षेत्रीय बेरोजगारी या दोहोंपायी बांधकाम क्षेत्रही आता अडचणीत आलेले आहे. बांधकाम क्षेत्र ऐन भरामध्ये असताना चिनी ढोकळ उत्पादनामध्ये त्याचा वाटा जवळपास ३० टक्के इतका घसघशीत होता. मात्र, त्याच बांधकाम क्षेत्रातील तीन अग्रगण्य कंपन्यांवर त्यांनी उचललेल्या परदेशी कर्जांचा हप्ता चुकवण्याची नामुष्की ओढवल्याने बांधकाम क्षेत्रातील अंतर्गत शबलतांची बोचरी जाणीव अलीकडेच सगळ्यांना झालेली आहे. बांधकाम पूर्ण झालेली परंतु विकसकाची आर्थिक ताकद संपुष्टात आल्याने निवास करण्यायोग्य स्थितीपर्यंत न पोहोचलेली लक्षावधी घरे आज तिथे पडून आहेत. घरांचा ताबा मिळत नसल्याने त्यांचे मालक घरासाठी घेतलेली कर्जे परत करण्याबाबत आता हात आखडता घेत आहेत. साहजिकच, अशा होतकरूंना गृहकर्जांचे वाटप सढळ हाताने केलेल्या वित्तीय संस्था आज चीनमध्ये वित्तीय संकटात सापडलेल्या आहेत. चिनी बांधकाम क्षेत्र आजमितीस अशा दुहेरी कोंडीचा सामना करते आहे.

अशा सगळ्या गुंतागुंतीच्या पार्श्वभूमीवर, चिनी नेतृत्वाने आणि चिनी धोरणकर्त्यांनी आता आजवर अवलंबलेली विकासदृष्टी मुळापासूनच बदलण्याचा घाट घातला आहे. चिनी धोरणांचा आजवर भर राहिला तो निर्यातप्रधान विकासनीती अवलंबत परदेशी बाजारपेठा काबीज करण्यावर. दुसरीकडे, त्यासाठी उत्पादनाच्या जवळपास

सर्वच क्षेत्रांमध्ये अत्याधुनिक असे तंत्रज्ञान स्वत: विकसित करण्याकडेही चीनने आपला मोहरा जाणीवपूर्वक वळवलेला होता. चीनच्या विस्तारवादी महत्त्वाकांक्षा लपून न राहिल्याने त्यांना पायबंद घालण्यासाठी चीनची तंत्रशास्त्रीय नाकेबंदी करण्याच्या पश्चिमी राष्ट्रांच्या पवित्र्याला उत्तर देण्यासाठी 'स्टेट ऑफ द आर्ट' तंत्रज्ञाने देशांतर्गत विकसित करण्यावर चीनने आजवर आपले बळ एकवटले. मात्र, नेमक्या याच प्रारूपाचा मुळापासून फेरविचार चीन आज करतो आहे.

उच्च व अत्याधुनिक अशा तंत्रशास्त्रावर आधारित अतिविशाल असे तंत्र-औद्योगिक साम्राज्य निर्माण करण्याचा मनसुबा आखून चीन आता त्या मार्गाकडे वळतो आहे. अशा महाकाय तंत्र-औद्योगिक साम्राज्याच्या उभारणीद्वारे देशांतर्गत मागणीस निर्णायक टेकू ('पुश') पुरविण्याचे धोरणात्मक तर्कशास्त्र या नवीन विकासदृष्टीच्या मुळाशी आहे. विकासविषयक धोरणदृष्टीमध्ये, या नवीन दिशेद्वारे, चीन १८० अंशांचे परिवर्तन घडवून आणू बघतो आहे. मुख्यत:, निर्यातप्रधान विकासनीतीवर स्थिर राहिलेल्या बहिर्मुख विकासविषयक धोरणांची दिशा चीन आता अंतर्मुख बनविण्यास सिद्ध होतो आहे. पुरेपूर चार दशके चांगले बस्तान बसविलेल्या एका प्रस्थापित 'मॉडेल'च्या जागी, त्याच्या बरोबर विरुद्ध दिशेला तोंड केलेले 'मॉडेल' चिनी विकासविषयक समस्यांवर परिणामकारक तोडगा काढण्यात कितपत यशस्वी होईल, याची सचिंत उत्सुकता चीनच्या आत व बाहेर सगळ्यांनाच आहे.

# आंतरराष्ट्रीय

## चीनचा डोळा 'पांढऱ्या सोन्या'वरही!

पेट्रोल-डिझेलवर चालणाऱ्या वाहनांना आताशा विजेवर चालू शकणाऱ्या वाहनांचा (मजकुरात या पुढे सर्वत्र विजेवर चालणाऱ्या वाहनांचा अथवा मोटरींचा निर्देश 'इलेक्ट्रिक वाहने' अथवा 'इलेक्ट्रिक मोटरी' असा केलेला आहे) एक समर्थ पर्याय उभा राहू पाहतो आहे. साहजिकच, इलेक्ट्रिक वाहनांना जगभरात मागणी वाढू लागली आहे. जगभरातील आर्थिक बदलांवर कावळ्यासारखी नजर ठेवून असणाऱ्या चीनने ही विस्तारणारी बाजारपेठ काबीज करण्याच्या दिशेने पावले टाकायला सुरुवात केलेली आहे. आजच्या घडीला इलेक्ट्रिक मोटरींच्या निर्मितीसाठी लागणाऱ्या बॅटऱ्यांचे उत्पादन व पुरवठा करणारी जगभरातील सर्वांत मोठी बाजारपेठ कोणती असा प्रश्न जर कुणी विचारला तर आपसूकच पहिले नाव डोळ्यांसमोर येते ते चीनचे. २०१८ सालाच्या अगोदरपासूनच चीनने यावर लक्ष केंद्रित केलेले होते आणि विजेवर चालणाऱ्या वाहनांची जगभरातील बाजारपेठ काबीज करण्याबरोबरच इलेक्ट्रिक वाहनांच्या निर्मितीत महत्त्वाच्या असणाऱ्या बॅटऱ्यांच्या उत्पादनासाठी लागणाऱ्या खनिजांसाठीदेखील चीनने विविध देशांमध्ये मोर्चेबांधणी सुरू केलेली आहे. त्यामुळे या 'पांढऱ्या सोन्यावर'देखील चिनी डोळा असल्याचे आता जागतिक समुदायाच्या लक्षात येते आहे.

अलीकडेच 'न्यूयॉर्क टाइम्स'ने प्रसिद्ध केलेल्या माहितीनुसार, २०२३ साली संपूर्ण जगभरात उत्पादन झालेल्या एकूण इलेक्ट्रिक मोटरगाड्यांपैकी निम्म्या गाड्या एकट्या चीनमध्ये तयार झालेल्या होत्या. विजेवर चालणाऱ्या मोटरगाड्या आणि दुचाकी वाहनांचे उत्पादन करणाऱ्या एकूण ब्रँन्ड्स्पैकी जवळपास निम्मे ब्रँन्ड्स्देखील चिनीच आहेत. मोटरगाड्यांच्या एकंदर विक्रीमध्ये, अमेरिकेचा विचार केला तर, इलेक्ट्रिक मोटरगाड्यांच्या विक्रीचा वाटा १० टक्क्यांवर पोहोचतो आहे. ही टक्केवारी चीनने २०१८ सालीच गाठलेली होती. इतक्या वेगाने चीनने या क्षेत्रात प्रगती साध्य तरी कशी केली हा या क्षेत्रातील अनेक जाणकारांनाही पडलेला प्रश्न आहे.

आजमितीस, जगभरातील जे देश इलेक्ट्रिक मोटरगाड्यांची विक्री करतात त्यांत चीन अव्वल आहे. त्या खालोखाल अमेरिका, जर्मनी, ब्रिटन, फ्रान्स, नॉर्वे, इटली, स्वीडन, दक्षिण कोरिया, नेदरलँड आदी देशांचा क्रमांक लागतो. भविष्याची पावले ओळखून चीनने अगदी नियोजनबद्ध पद्धतीने या बाजारपेठेवर आपले वर्चस्व मिळवले असल्याचे तज्ज्ञांचे निरीक्षण सांगते. सहा कोटी इलेक्ट्रिक मोटरगाड्यांच्या उत्पादनाचे लक्ष्य चीनने २०२२ सालीच गाठलेले होते. आजही इलेक्ट्रिक मोटरगाड्यांच्या श्रेणीवारीत पहिल्या १० ब्रँन्ड्स्मध्ये चिनी ब्रँड्स् आघाडीवर आहेत. चीनमध्ये ३५०पेक्षा अधिक कंपन्या आजघडीला इलेक्ट्रिक मोटरगाड्या बनवित आहेत. 'टेस्ला'सारख्या जागतिक ब्रँड्सूसमवेत चिनी कंपन्यांनी त्यासाठी हातमिळवणी केलेली आहे. जागतिक बाजारपेठेत आघाडीवर असणाऱ्या 'टेस्ला'च्या खालोखाल SIAC आणि Build Your Dreams (BYD) या दोन चिनी कंपन्यांनी उत्पादन केलेल्या इलेक्ट्रिक मोटरगाड्यांना मागणी सातत्याने वाढते आहे. त्याच्याच जोडीने बॅटऱ्यांच्या उत्पादनात चीनने आघाडी घेतलेली आहे. त्यामुळे जगातील मोठमोठ्या कंपन्यांनादेखील बॅटरीसाठी चीनवरच अवलंबून राहावे लागते आहे. CATL आणि BYD या आघाडीच्या बॅटरी उत्पादक कंपन्या असून त्यांनीही जागतिक बाजारपेठेवर वर्चस्व मिळवलेले आहे.

विजेवर चालणाऱ्या मोटरगाड्यांमध्ये बॅटरी हा सर्वांत महत्त्वाचा घटक होय. चीनसह जपान व कोरिया यांनीही बॅटरी उत्पादनावर लक्ष केंद्रित केले आहे. विजेवर चालणाऱ्या मोटरगाड्यांची बाजारपेठ या तीन देशांनी जणू काही त्यांच्या मुठीत ठेवलेली आहे. बॅटऱ्यांच्या उत्पादनात वैश्विक स्तरावरील बाजारपेठेत या तीन देशांचा वाटा तब्बल ९५ टक्के इतका आहे आणि त्यातील ६० टक्के वाटा एकट्या चीनचा आहे. यावरून चिनी कंपन्यांचे वर्चस्व किती मोठे आहे याचा अंदाज येऊ शकतो.

इलेक्ट्रिक बाजारपेठेत आघाडीवर राहण्याच्या धोरणाचे सूचन चीनचे राष्ट्राध्यक्ष Xi Jinping यांनी २०१४ सालीच केले होते. वाहननिर्मितीचे जागतिक महाकेंद्र हे बिरुद चीनला लाभावे यासाठी इलेक्ट्रिक वाहनांचा विकास घडवून आणणे व त्यांच्या वैश्विक बाजारपेठेवर वर्चस्व प्रस्थापित करणे हाच एकमेव मार्ग असल्याचे त्यांनी जाहीर केले होते. त्यासाठी आवश्यक असणारी आर्थिक तरतूदही चीनने अगोदरच करून ठेवलेली होती. त्यामुळे कमी उत्पादनखर्चात वाहनांची निर्मिती करणे आणि त्यासाठी निकडीच्या ठरणाऱ्या उत्तम दर्जाच्या पायाभूत सुविधांचा विकास करणे यावर चीनने डोळसपणे ध्यान एकवटलेले होते. त्या दृष्टीने, उच्च

तंत्रज्ञानाच्या जोडीला वाहन निर्माते, पुरवठादार आणि ग्राहक यांना विक्री अनुदान देण्यावरही चीनने भर दिला. त्याचा परिणाम म्हणजे २०२५ सालादरम्यान इलेक्ट्रिक मोटरींच्या वैश्विक बाजारपेठेवर आपला वरचष्मा प्राप्त करण्याचे निर्धारित केलेले लक्ष्य चीनने तीन वर्षे आधीच साध्य केले. चीनचा या क्षेत्रातील प्रगतीचा वेग पाहिल्यानंतर इतर अनेक देशांना आपणही या क्षेत्रात काम करायला हवे याची जाणीव झाली. वाहन उत्पादक मोठ्या कंपन्यांनी विजेवर चालणाऱ्या मोटरगाड्यांचे उत्पादन वाढवले खरे, परंतु बॅटऱ्यांसाठी मात्र त्यांना चीनसह अन्य देशांवरच आजही अवलंबून राहावे लागते आहे. बॅटऱ्यांच्या उत्पादनातील मक्तेदारी प्रथम प्राप्त करण्यासाठी आणि नंतर ती टिकवून धरण्याच्या दृष्टीने, बॅटऱ्या तयार करण्यासाठी जी खनिजे लागतात त्यांच्या खाणींवर लक्ष चीनने केंद्रित केले. या खनिजांना 'व्हाइट गोल्ड' अर्थात 'पांढरे सोने' असे म्हटले जाते. जगातील विविध देशांच्या खाणींमध्ये पडून असलेल्या या पांढऱ्या सोन्याच्या साठ्यांवर चीनने खूप सुरुवातीपासूनच नजर रोखून ठेवलेली आहे.

अर्जेंटिनामधील खाणींमध्ये लिथियम मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होते. विजेवर चालणाऱ्या मोटरगाड्यांमधील बॅटऱ्यांच्या निर्मितीमध्ये लिथियमची सर्वाधिक गरज असते, हे अचूक हेरून चीनने दहा वर्षांपूर्वीच पावले उचलण्यास सुरुवात केलेली होती. अर्जेंटिनातील लिथियम उत्खनन प्रकल्पातील पहिला हिस्सा विकत घेण्यापासून ते युरोपातील अनेक खाण प्रकल्पांमध्ये चीनने भरीव गुंतवणूक करत बॅटरी उत्पादनासाठी लागणाऱ्या खनिजांच्या सुरळीत पुरवठ्याचे नियोजन करून ठेवलेले आहे. British Broadcasting Corporation ने (बीबीसी) अगदी अलीकडेच या संदर्भात एक अभ्यास केला. लिथियम उत्पादनाचे जे अनेकानेक प्रकल्प जगभरात स्वतंत्रपणे आणि/अथवा भागीदारीमध्ये कार्यरत आहेत त्यांतील एक तृतीयांश लिथियम प्रकल्पांवर फक्त चिनी कंपन्यांचेच नियंत्रण आहे.

चिनी कंपन्यांच्या व्यवहारावर आणि त्यांच्या कार्यपद्धतीवर अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. लिथियमसह कोबाल्ट, मँगनीज, निकेल अशा विविध खनिजांचे जे साठे देशोदेशी आहेत त्यांच्यावर डोळा ठेवून चीनने आजघडीला ६५ हून अधिक खाण प्रकल्पांमध्ये काम सुरू केले आहे. विजेवर चालणाऱ्या वाहनांच्या वैश्विक बाजारपेठेवर वर्चस्व अबाधित ठेवण्यासाठी चीनला खनिजांची निकड मोठ्या प्रमाणावर भासणार असल्याने असे करणे ही चीनची आजमितीची व्यावसायिक प्राथमिकता आहे. परंतु चीनच्या या धोरणाबाबत युरोपातील अनेक देशांना केवळ असमाधानच

नाही तर रोष आहे. विजेवर चालणाऱ्या जेवढ्या मोटरगाड्या आज युरोपीय देशांमधील रस्त्यांवरून धावत आहेत त्यांत ५० टक्क्यांहून अधिक वाटा एकट्या चीनचा आहे. त्यामुळेच चीनची ही घोडदौड रोखायची कशी, हा विचार चौफेर बळावतो आहे.

आंतरराष्ट्रीय घडामोडींचा अभ्यास करणाऱ्या Chatham House या व्यासपीठाने या संदर्भातील चिनी धोरणांचा बारकाईने अभ्यास केला आहे. त्यांच्या निरीक्षणानुसार, लिथियम आणि कोबाल्ट या खनिजांच्या शुद्धीकरणाच्या प्रक्रियेत चीन अगदी सुरुवातीपासून आघाडीवर आहे. २०२२ साली संपूर्ण जगभरात लिथियम आणि कोबाल्ट यांचा जेवढा पुरवठा केला गेला त्यांत अनुक्रमे ७२ टक्के आणि ६८ टक्के इतका प्रचंड वाटा एकट्या चीनचा होता. या दोन खनिजांसह, इलेक्ट्रिक वाहनांच्या निर्मितीसाठी आवश्यक असणाऱ्या अन्य खनिजांच्या साठ्यांवर नियंत्रण मिळवणे आणि त्यांचे शुद्धीकरण घडवून आणणे या दोहोंत वरचष्मा संपादन केल्याने विजेवर चालणाऱ्या मोटारगाड्यांच्या बाजारपेठेत चीनची मांड आता पक्की बसलेली आहे. इतकेच नव्हे तर पवनचक्क्यांसाठी आवश्यक असणाऱ्या टर्बाइनच्या उत्पादनामध्ये-देखील चीन आघाडीवर आहे. टर्बाइनच्या जगातील एकूण उत्पादनापैकी ६० टक्के उत्पादन एकटा चीन करतो. सौरऊर्जेचे संकलन करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या पॅनल्सच्या पुरवठासाखळीमध्येही ८० टक्के वाटा एकट्या चीनचा आहे. केवळ विजेवर चालणाऱ्या मोटारगाड्यांच्या उत्पादनातच नव्हे तर, भविष्यकाळात ऊर्जानिर्मिती क्षेत्राच्या वाढविस्तारासाठी ज्या ज्या गोष्टींची गरज निर्माण होणार आहे अशा सर्वच क्षेत्रांमध्ये चीनने दूरदृष्टीने आपले पाय पसरण्यास सुरुवात केलेली आहे, ही बाब या सगळ्यातून अधोरेखित होते. या क्षेत्रातील चीनवरील आपले परावलंबन कमी व्हावे म्हणून अमेरिका, ब्रिटन आणि युरोपीय युनियन आदींनी पावले उचलायला सुरुवात केलेली असली तरीही या बाजारपेठांमधील विद्यमान चिनी वर्चस्व बलशाली असेच आहे. चिनी कंपन्यांच्या अखत्यारीतील खाण प्रकल्पांना विरोधही मोठ्या प्रमाणावर होतो आहे. खनिजांचे उत्खनन करणाऱ्या चिनी कंपन्यांवर शेकडो प्रकारचे आरोप सध्या होत आहेत. मुख्यत्वेकरून या कंपन्यांची कार्यपद्धतीच त्याला कारणीभूत असल्याचे स्थानिक नागरिकांचे मत आहे. अनेक छोट्या देशांतील खाणींचे कामकाज चिनी कंपन्यांच्या अखत्यारीत असून त्या खाणींमुळे परिसरातील नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याच्या तक्रारी स्थानिकांकडून वारंवार उपस्थित केल्या जात असल्याचे अनुभवास येते.

आफ्रिका खंडातील अनेक देशांत उच्च दर्जाच्या दुर्मीळ खनिजांचा साठा आहे. मुबलक प्रमाणात मिळणारे स्वस्त मजूर आणि कठोर नियमांचा अभाव या गोष्टी

पथ्यावर पडल्याने गेल्या तीन दशकांपासून चीनने आफ्रिका खंडात पाय रोवायला सुरुवात केलेली असून तेथील खाणींबाबत देशोदेशींच्या शासकांशी करार केलेले आहेत. त्यामुळेच दुर्मीळ खनिजांना जगभरातून असलेली मागणी पूर्ण करण्याची क्षमता प्रामुख्याने चीनकडे आहे. खनिजांच्या साठ्यांवर वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या माध्यमातून आफ्रिकेतील आपले महत्त्व वाढवण्यासाठी चीन जोरकस प्रयत्न करीत आहे. आफ्रिकेच्या दक्षिण आणि पूर्व भागांतील देशांमध्ये दुर्मीळ खनिजांचे साठे मुबलक प्रमाणात उपलब्ध असले तरीही हे देश त्या बाबतीत पुरेसे सजग नाहीत. खरे तर, जगातील सर्वाधिक खनिजांचे साठे आफ्रिकेत आढळतात. दक्षिण आफ्रिका, मादागास्कर, मालावी, केनिया, नामिबिया, मोझाम्बिक, टांझानिया, झाम्बिया आणि बुरूंडी यांसारख्या देशांमध्ये Neodymium, Praseodymium आणि Dysprosium यांसारखी खनिजे लक्षणीय प्रमाणात आढळून येतात. दक्षिण आफ्रिकेच्या पश्चिम केप प्रांतात जगातील सर्वाधिक उच्च दर्जाची दुर्मीळ खनिजे सापडतात. त्यामुळे दक्षिण आफ्रिका हा खनिजांच्या जागतिक बाजारपेठेतील महत्त्वाचा पुरवठादार बनू शकतो.

आफ्रिकेत खनिजांचा साठा मुबलक असला तरी भूगर्भातील त्यांच्या साठ्यांचे उत्खनन करण्यासाठी संबंधित देशांनी चिनी कंपन्यांची मदत घेण्यास सुरुवात केली आणि चीनने तीच संधी अचूक हेरली. खाणीतील खनिजांचे उत्खनन व त्यांचे परिष्करण घडवून आणण्यात चिनी कंपन्यांनी पुढाकार घेतला आणि त्या माध्यमातून खनिजांच्या खाणींवर प्रभुत्व प्रस्थापित केले. चीन, जपान आणि दक्षिण कोरिया या देशांनी भूगर्भातील दुर्मीळ खनिजे मिळवण्यासाठी २०१० सालापासून विविध देशांमध्ये पाय रोवायला सुरुवात केली होती. खनिजांची कमतरता भासू लागल्यानंतर जगभरात आणि विशेषतः आफ्रिकेत काही नवे प्रकल्प सुरू करण्यात आले. चीनने १९८० पासून खनिजांवर लक्ष केंद्रित केलेले होते. त्या दृष्टीने, आफ्रिकेसारख्या खनिजसमृद्ध भूभागाशी चीनने अधिक निकटचे संबंध प्रस्थापित केले. खनिजांचे उत्खनन व परिष्करण सुलभ बनावे यासाठी तिथे आवश्यक त्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर भर दिला. आफ्रिकी देशांची नाजूक वित्तीय स्थिती हेरून तिचा लाभ उठवत वित्तीय संकटांपायी अडचणीत आलेल्या देशांना चीनने कर्जपुरवठा करण्यास सुरुवात केली.

जागतिक स्तरावर कोबाल्टच्या होणाऱ्या ७० टक्क्यांपेक्षा अधिक पुरवठ्यावर 'डेमॉक्रॅटिक रिपब्लिक ऑफ काँगो' या देशाचे नियंत्रण आहे. दशकभरापेक्षाही

अधिक काळ काँगोने चिनी खाण कंपन्यांसमवेत करार केलेला होता. परंतु, चिनी सहभागातून सुरू असलेल्या या प्रकल्पांमध्ये बालमजुरीची प्रथा आणि मानवी हक्कांचे उल्लंघन होत असल्याच्या तक्रारी वाढल्या. काँगोमधील समृद्ध खनिजस्रोतांचा गैरवापर करून कराराचे उल्लंघन केल्याचा आरोप चिनी कंपन्यांवर झाला. त्यामुळे चीनसमवेत केलेल्या कराराचा फेरविचार काँगो सरकारने सुरू केला. हे करार आपल्या देशाच्या दृष्टीने फारसे लाभदायक नाहीत, याची जाणीव काँगोला दरम्यानच्या कालखंडात झालेली होती. जवळपास याच परिस्थितीमध्ये आफ्रिकेतील अन्य काही देशही आजमितीस आहेत. सुलभ अटीशर्तींवर प्रारंभी आफ्रिकी देशांना चीनने कर्जपुरवठ्याच्या रूपाने अर्थसाहाय्य केले खरे. परंतु, त्या खर्चांची परतफेड वेळापत्रकानुसार करण्याबाबत चीन आताशा कडक तगादे लावतो आहे. तसेच, माथ्यावरील कर्जांच्या बोज्याने काही आफ्रिकी देशांची मुळातीलच तनुमनु वित्तीय स्थिती अधिकच नाजूक व दोलायमान बनल्याचेही या क्षेत्रातील अभ्यासकांचे निरीक्षण सांगते.

आफ्रिकी देशांमधील खाणजन्य जिनसांच्या उत्पादनावर चीनचे नियंत्रण दोन प्रकारचे आहे. खाणजन्य जिनसांच्या उत्पादनावर मालकी हक्क गाजवून त्यांच्यावर प्रक्रिया करण्याच्या मिषाने बहुमोल खनिजे चिनी कंपन्या चीनमध्ये परत आणतात. चीनमधील महाकाय प्रकल्पांमध्ये परिष्कृत केलेली खनिजे मग चीन जगभरात विकतो. दुसरे म्हणजे, छोट्या देशांना कर्जपुरवठ्याच्या रूपाने अर्थसहाय्य करून चीन त्यांना ऋणाईत बनवून ठेवतो. गेल्या काही दशकांपासून चीन हा आफ्रिकेला सर्वाधिक कर्ज देणारा देश बनला आहे. स्वत:ची दीर्घकालीन उद्दिष्टे साध्य करण्यासाठी चीन आर्थिक आमिषांचे गाजर पुढे करतो आणि आपल्याला जे हवे ते बरोबर पदरात पाडून घेतो ही चीनची चलाख भूमिका आता कुठे विविध देशांच्या लक्षात येऊ लागली आहे.

देशांतर्गत उद्योगांना केला जाणारा खाणजन्य जिनसांचा पुरवठा सुरळीत राहावा यासाठी चीनने २०१९ साली त्यांच्या निर्यातीवर मर्यादा आणली होती. त्या वेळी, खनिजांच्या वैश्विक बाजारपेठेत त्यांच्या किंमती अचानक दाणदिशी वाढल्या होत्या. खनिजांच्या जागतिक बाजारात चीनने प्रस्थापित केलेल्या वर्चस्वाचा काही एक अंदाज यावरून यावा. आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्माण होऊ लागलेल्या असंतोषाचा दबाव चीनला जाणवू लागल्यानंतर हे चित्र आताशा काही प्रमाणात बदलले आहे. खनिजसंपत्तीच्या जागतिक पटलावरील नकाशावर चीनने अलीकडील काही वर्षांत

वर्चस्व प्रस्थापित केलेले असले तरी त्याला आव्हान देण्यासाठी अमेरिकेसारख्या महासत्ता आता सज्ज होऊ लागल्या आहेत. चीनच्या विस्तारवादी व अरेरावी खाक्यामुळे वैश्विक सत्तासमीकरणांमध्ये निर्माण होणारी दृश्यादृश्य असुरक्षितता घटविण्यासाठी आणि आफ्रिकेतील खनिज प्रकल्पांमध्ये आपलाही सहभाग असावा या हेतूने अमेरिका जाणीवपूर्वक पूर्वीपेक्षा अधिक सक्रिय बनताना दिसते आहे. बाजारपेठेतील परिस्थिती वेळोवेळी बदलत असते आणि वैविध्यपूर्ण पुरवठा साखळी विकसित केल्याशिवाय चीन आंतरराष्ट्रीय बाजारावर नियंत्रण ठेवू शकत नाही, हे लक्षात घेऊन युरोपीय महासंघही चीनवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी आणि आफ्रिकी देशांसमवेत नवीन धोरणात्मक भागीदारी प्रस्थापित करण्यासाठी पुढे येतो आहे. बहुमोल खनिजांचे साठे व उत्पादन या उभय बाबतींत खनिजांच्या जागतिक नकाशावर प्रमुख स्थान असलेले जपान आणि ऑस्ट्रेलिया हे दोन देशही चीनला रोखण्यासाठी आणि आफ्रिका खंडातील चीनचे वर्चस्व कमी करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. या अशा सगळ्या संघटित प्रयत्नांची परिणती नेमकी कशात, काय व केव्हा होते हे बघण्याची उत्कंठा सगळ्यांनाच आहे.


मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी
यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत २१ व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणाऱ्या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक : नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५ किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

# विदेशनिती

## चिनी महत्त्वाकांक्षेचा विस्तारता परीघ

आफ्रिका खंडात चौफेर हातपाय पसरत असलेल्या चीनची त्या धोरणी कारवायांमागील व्यूहरचना बहुआयामी आहे. आपली ऊर्जासुरक्षा बळकट बनवणे, हा चीनचा हेतू अगदी सुरुवातीस होता. किंबहुना, त्या दृष्टीनेच चीनने २१व्या शतकाच्या पहिल्या दशकाचा मध्य ओलांडताना आफ्रिका खंडातील खनिजबहुल देशांना आपल्या जाळ्यात ओढण्यास अतिशय धूर्तपणे प्रारंभ केला. आपल्या भूमीमध्ये पडून असलेले ऊर्जासाधन खनिजांचे साठे आपली आर्थिक घोडदौड सातत्यशील राखण्याच्या दृष्टीने फार काळ पुरणार नाहीत याची अटकळ, १९७८ साली आर्थिक पुनर्रचना पर्वाला हात घातल्यानंतर सुमारे दशकभरातच चिनी धोरणकर्त्यांना आली. साहजिकच, ऊर्जासाधनांचे पर्यायी स्रोत शोधण्यासाठी चिनी नेतृत्वाची नजर जगभर भिरभिरू लागली. त्या नजरेच्या टप्प्यात आले आफ्रिका खंडातील खनिज संपत्तीच्या दृष्टीने संपन्न असलेले देश आणि मग तिथे आपले तांब्याभांडे स्थिर करण्याच्या हालचाली चीनने १९९५ वा १९९६ सालाच्या आसपास चालू केल्या.

आफ्रिका खंडाकडे तत्पूर्वी चीनचे लक्ष फारसे कधीच नव्हते. आफ्रिकी देशांना चीनकडून त्या काळात मिळणारे अर्थसाहाय्य अगदीच तुटपुंजे असे. मुदलात, विदेशनीतीमधील चिनी तज्ज्ञांचे त्या टप्प्यावर आफ्रिका खंडाबद्दलचे ज्ञान व आकलनदेखील अगदी बेतासबातच होते. मुळात मेख अशी होती की वैश्विक पटलावर आपण काही भरीव, लक्षवेधी अशी दमदार कामगिरी बजावू शकू असा विश्वास तत्कालीन चिनी नेतृत्वालाच त्या वेळी वाटत नव्हता. परंतु, उदारीकरणाचे पर्व चिनी अर्थव्यवस्थेमध्ये अवतरल्यानंतर चीनने जणू कातच टाकली. चिनी अर्थव्यवस्थेची चालू झालेली दमदार वाढ, अधिक प्रगल्भ अशी चिनी नेतृत्वाची नवीन पिढी, आत्मविश्वासाने भारलेला सर्वसाधारण चिनी नागरिक आणि आफ्रिका खंडाबद्दलची उंचावलेली जाण या सगळ्यांतून आफ्रिका खंड चिनी परदेशी संबंधविषयक धोरणाच्या केंद्रस्थानी एकदम विराजमान झाला.

अर्थात, चीनच्या दृष्टीने त्या मागील तत्कालीन आणि अतिशय तीव्र अशी निकड होती ती ऊर्जापुरवठ्याचे हमीदार स्त्रोत शोधून ते बुलंद बनविण्याची. चिनी वस्तुनिर्माण उद्योगाची भक्कम आणि चौफेर पायाभरणी त्यांखेरीज अशक्यप्रायच होती. चिनी वस्तुनिर्माण उद्योगाच्या विस्ताराबरोबरच चिनी निर्यातदारांना नवनवीन परदेशी बाजारपेठा उपलब्ध करून देण्याचे आव्हानही चिनी धोरणकर्त्यांच्या पुढ्यात होतेच. आफ्रिकी खंडाचे महत्त्व चीनला जाणवले ते नेमके त्याच टप्प्यावर. परंतु, ऊर्जासुरक्षेची हमी एवढेच मर्यादित उद्दिष्ट चीनच्या डोळ्यांपुढे तेव्हा होते, असे मात्र समजण्याचे कारण अजिबातच नाही. आफ्रिका खंडामध्ये हातपाय पसरण्यामागे चीनचे अन्य हेतूही होतेच. चिनी राजनैतिक मुत्सद्यांना जागतिक व्यासपीठांवर, प्रथम स्वत:ची व त्या बरोबरीनेच आपल्या देशाची 'ओळख' (आयडेन्टिटी) निर्माण करावयाची होती. चिनी हितसंबंधांचे वैश्विक सत्तापटावर रक्षण-संवर्धन करणाऱ्या धोरणांना वैश्विक समुदायाचे समर्थन प्राप्त करावयाचे होते. त्या बरोबरच, प्रसंगी, अमेरिकी वर्चस्वाला अगदी शह जरी नाही लगोलग तरी, आव्हान देण्याच्या प्रयत्नांना व्यापक बळ मिळवायचे होते.

जगाचे वस्तुनिर्माण केंद्र म्हणून चिनी अर्थव्यवस्थेचा लौकिक प्रस्थापित करणे, हा चिनी धोरणाचा आर्थिक पुनर्रचना पर्वाला हात घातल्यापासून, म्हणजे १९७८-७९ सालापासूनच, गाभा राहिला. राजनैतिक पातळीवरील मुत्सद्देगिरी असो अथवा सामरिक सामर्थ्य असो, भक्कम असा आर्थिक पाया असल्याखेरीज या दोन्ही आघाड्यांवर सशक्तपणे उभे ठाकता येणे अशक्य असते, हे इंगित चिनी नेत्यांनी उदारीकरणाच्या अगदी आरंभीच्या पर्वातच हेरले होते. त्यांमुळे, जागतिक स्तरावरील एक बलदंड आर्थिक सत्ता म्हणून चीनला ओळख प्राप्त करून द्यायची तर आर्थिक वाढविकासाचा वार्षिक सरासरी दर सातत्यशील आणि भरभक्कम असण्यास पर्याय नाही, ही बाब अचूक उमगलेल्या चिनी व्यवस्थेने प्रयत्नांचा सारा भर आर्थिक वाढीवर एकवटला. आर्थिक घोडदौड भरधाव राखायची तर अर्थकारणाला ऊर्जासुरक्षेचे कवच पुरवावयास हवे, हे ओघानेच येते. त्यासाठी, ऊर्जापुरवठ्याचे हुकुमी स्त्रोत हाताशी असणे अनिवार्य शाबीत होते. खनिजसमृद्ध आफ्रिकी खंडावर चीनने आपल्या धोरणाचा झोत त्या दृष्टीने स्थिर करावा हे अतिशय स्वाभाविकच ठरले.

नायजेरिया, सुदान, अंगोला, गॅबन, अल्जिरिया यांसारख्या खनिज तेलसाठ्यांनी समृद्ध असलेल्या देशांवर चिनी धोरणकर्त्यांनी लक्ष केंद्रीत केले. केवळ खनिज तेलच नव्हे तर नानाविध खनिजांचे प्रचंड साठे या देशांच्या भूगर्भात पडून आहेत.

खनिज तेल आणि नैसर्गिक वायू यांव्यतिरिक्त तांबे, प्लॅटिनम, युरेनियम, फेरोक्रोम, सोने व चांदी यांसारख्या अनेक धातूंच्या व खनिजांच्या साठ्यांनी संबंधित आफ्रिकी देशांना समृद्ध बनवलेले आहे.

पाणी आणि हवा या दोहोंमध्ये एक साम्य आहे. कोठेही पोकळी दिसली की ती भरून काढणे हा या दोन जिनसांचा गुणधर्म. अगदी तोच कित्ता चीनने गिरवला आफ्रिका खंडाच्याबाबतीत. परराष्ट्रविषयक आपल्या 'स्वतंत्र' धोरणाचे समर्थक म्हणा वा पाठीराखे म्हणा, वैश्विक नकाशावर निर्माण करण्यास चीन १९९०च्या दशकाच्या मध्यापासून वाव शोधत होता. 'स्वतंत्र परराष्ट्र धोरण' या शब्दसंहतीस चीनच्या संदर्भात एक विशेष अर्थ होता व आजही आहे. 'अमेरिकी विचारविश्वाच्या प्रभुसत्तेच्या छायेपासून अ-स्पर्शित असलेले अथवा मुक्त राखलेले परराष्ट्रधोरण' म्हणजे 'स्वतंत्र' धोरण, अशी चीनची त्या संदर्भातील व्याख्या होय. अशा धोरणाचे ऐलान करण्यास चीनला आफ्रिकी खंडामध्ये अवकाश गवसला. त्या दिशेने मग चिनी नेतृत्वाने धोरणी पावले उचलण्यास सुरुवात केली. आफ्रिकी खंडातील अनेक देशांमधील व्यावसायिक तसेच राजकीय अभिजनांशी, अतिशय शांतपणे, कोणाच्याही डोळ्यांवर न येता, नातेसंबंध प्रस्थापित करण्यास साधारणपणे १९९५-९६च्या आसपास चीन सक्रिय बनला. त्यांत त्याला यशही प्राप्त होऊ लागले. सुदानपासून ते थेट दक्षिण आफ्रिकेपर्यंत अनेक देशांशी चीनने घनिष्ठ संबंध निर्माण केले व जोपासले. अनेक देशांना वित्तपुरवठा करण्यास प्रारंभ केला. आफ्रिका खंडातील ४०पेक्षा अधिक देशांशी व्यापारविषयक करारमदार चीनने केले. अनेक देशांच्या सत्ताधाऱ्यांशी लष्करी व संरक्षणविषयक सहकार्यासंदर्भात करार करण्यात पुढाकार घेतला.

एकंदर जागतिक राजकारणामध्ये अमेरिकी व्यूहरचनेच्या सारीपाटावर आफ्रिका खंड (अमेरिकी चष्म्यातून तितकासा महत्वाचा नसल्यामुळे) त्या मानाने अ-लक्षितच होता. जागतिक बँक आणि/अथवा आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या सारणीमध्येदेखील आफ्रिका खंडाच्या पदरात सतत उपेक्षेचेच दान पडत राहिले. या दोन वैश्विक सावकारांकडे अर्थसाहाय्याची मागणी करावी तर त्यांच्या अटीशर्ती मान्य करणे ऋणको देशांवर बंधनकारक असे. अनेक आफ्रिकी देशांमध्ये अजूनही लोकतंत्र नांदताना दिसत नाही. लोकशाही मूल्यांची जपणूक, गुलामीचे उच्चाटण यांसारख्या बाबी जागतिक बँक आणि/अथवा आंतरराष्ट्रीय नाणेनिधीसारख्या धनकोंच्या लेखी जिव्हाळ्याच्या ठरतात. वित्तसाहाय्याची मागणी करणाऱ्या देशांनी लोकशाही राज्यव्यवस्थेचा अवलंब करावा, सर्व स्तरांवरील व्यवहारांमध्ये पारदर्शकता आणली

जावी यांसारख्या ज्या अटी हे वैश्विक सावकार अर्थसाहाय्यविषयक प्रस्तावाचा विचार करतेवेळी घालतात त्या अटी आफ्रिकी देशांमधील हुकुमशाही राजवटींना साहजिकच जाचक वाटतात. आपल्याकडून वित्तसाहाय्याची अपेक्षा असणाऱ्या अथवा अर्थसाहाय्याची अपेक्षा करणाऱ्या संबंधित देशांनी राज्यकारभाराच्या प्रतवारीत व गुणवत्तेमध्ये सुधारणा घडवून आणावी, सर्व स्तरांवरील भ्रष्टाचारास परिणामकारक आळा घालावा, यांसारख्या अर्थसाहाय्याशी निगडित अशा ज्या अटीशर्ती जागतिक बँक आणि/अथवा आंतरराष्ट्रीय नाणेनिधी घालतात तो आफ्रिकी सत्ताधीशांना त्यांच्या अंतर्गत कारभारातील पश्चिमी शक्तींचा हस्तक्षेप वाटतो.

परिणामी, अर्थसाहाय्याभावी अनेक आफ्रिकी देशांमधील पायाभूत सेवासुविधांसह अनेक आघाड्यांवरील विकास रखडलेला राहिला. चिनी नेतृत्वाने ती पोकळी अचूक हेरली. मुदलात, चीनमध्येच चिनी कम्युनिस्ट पक्षाचा एकतंत्री अंमल चालत असल्याने आफ्रिकी देशांमधील हुकुमशाहीचे चीनला वावडे असण्याचा सवालच उद्भवत नाही. त्यामुळे, कोणत्याही अटींविनाच उपलब्ध होत असलेल्या चिनी अर्थसाहाय्याचे गरजवंत आफ्रिकी देशांनी स्वागत करावे, हे स्वाभाविकच ठरले. इथे चीनने एका दगडात दोन पक्षी मारले. वित्तसाहाय्याच्या मार्गाने आफ्रिकी देशांच्या अर्थकारणामध्ये चीनने चंचुप्रवेश साध्य तर केलाच, शिवाय आफ्रिकी नेत्यांच्या मनोविश्वात स्वत:ची प्रतिमाही उजळून प्रस्थापित करण्यात चीनने बाजी मारली. ते कुळ उभयपक्षी लाभाचे असे होते. नैसर्गिक संपत्तीने समृद्ध असणाऱ्या खनिजांचे उत्खनन, शुद्धीकरण, वितरण व विक्री यांसाठी आवश्यक असणाऱ्या वित्तीय, तांत्रिक तसेच व्यवस्थापकीय बळाचा पूर्ण अभाव आफ्रिकी देशांपाशी होता.

**नैसर्गिक साधनसंपत्तीवर नियंत्रण**

स्वार्थाला परहितसंवर्धनाचा मुलामा चढविण्याची ही संधी धूर्त चिनी नेतृत्वाने लगोलग साधली. आफ्रिकी देशांना वित्तीय तसेच तांत्रिक साहाय्य पुरविण्याच्या माध्यमातून चीनने संबंधित देशांच्या भूगर्भामध्ये पडून राहिलेल्या खनिजसंपत्तीपर्यंत आपले हात पोहोचविले. अंगोला, नायजेरिया, सुदान, अल्जिरिया यांसारख्या खनिज तेलांनी समृद्ध देशांमधील तेलखाणींच्या उत्खननाचे हक्क चीनने पदरात पाडून घेतले. केवळ एवढेच नाही तर, सुदान, अंगोला व अल्जिरियासारख्या देशांतील तेलउद्योगावर तर चीनने या माध्यमातून स्वत:चे प्रभुत्वही प्रस्थापित केले. याच्या जोडीनेच आफ्रिकी देशांच्या अर्थकारणातील अन्य क्षेत्रांमध्येदेखील पाय रोवण्याबाबत चीनने कटाक्ष राखला. 'हुवाई'सारख्या दूरसंचाराच्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या चिनी कंपनीने

केनया, झिम्बाब्वे आणि नायजेरिया या देशांमध्ये दूरसंचारसेवा पुरविण्याची कंत्राटेही मिळवली. जलविद्युत प्रकल्पांची उभारणी, हॉटेल व्यवसाय, बांधकाम क्षेत्र यांसारख्या उद्योगक्षेत्रामध्ये चिनी कंपन्या दक्षिण आफ्रिका व बोट्स्वानासारख्या देशांत कार्यरत आहेत. सिएरा लेओन, अंगोला यांसारख्या देशांच्या ढासळलेल्या अर्थव्यवस्थांच्या पुनर्बांधणीमध्येदेखील चिनी कंपन्या सक्रिय राहत आल्या. आफ्रिका खंडातील सर्वांत मोठी अर्थव्यवस्था गणल्या जाणाऱ्या दक्षिण आफ्रिकेबरोबर घनिष्ठ स्वरूपाचे व्यापारी संबंध निर्माण करण्यातही चीन आघाडीवर राहिला.

आफ्रिका खंडातील एक महासत्ता म्हणून, या सगळ्यांमुळे, आफ्रिकी सत्ताधीशांनी चीनची गणना करावी याचा विस्मय वाटण्याचे कारण नाही. तिथवर युरोप-अमेरिकेतील उद्योगव्यापारविश्व आणि राजकीय नेतृत्व यांच्यासाठीच जणू काही राखीव असलेली अथवा ठेवली गेलेली लाल पायघड्यांची वागणूक, मग, चिनी नेतृत्वाच्या वाट्याला आली. अमेरिकेची प्रभुसत्ता नकोशी वाटणाऱ्या अथवा झालेल्या आफ्रिकी नेत्यांना, त्यांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करण्याचा चिनी पवित्रा स्वागतार्ह वाटावा हेही मग ओघानेच आले. विकसित अशा पश्चिमी राष्ट्रांना विकसनशील देशांबद्दल काहीही देणेघेणे नसून चीनसारख्या, विकासाच्या मार्गावर भरधाव आगेकूच करणाऱ्या देशालाच विकसनशील देशांचा कळवळा असणे स्वाभाविक आहे, हा सूक्ष्म संदेश अशा सगळ्या माध्यमांतून आफ्रिकी शासकांच्या मनावर बिंबवत चीनने पहिली आघाडी जिंकली. तुलनेने मागास व विकसनशील देशांची बाजू वैश्विक पटलावर लावून धरणारा केवळ जवळचा मित्रच नव्हे तर जणू 'मोठा भाऊ'च अशी चीनने स्वत:ची प्रतिमा तिथे या माध्यमातून निर्माण केली. वैश्विक पटलावरील बलशाली (अमेरिकेला) पर्यायी महासत्ता म्हणून स्वत:ची ओळख प्रस्थापित करण्यास चीनला हीच सगळी कुमक कामी आली.

आफ्रिकी देशांमध्ये चिनी गुंतवणूक वाढावी यासाठीदेखील चिनी नेतृत्वाने जाणीवपूर्वक धोरणे आखली. त्या दृष्टीने गुंतवणूक व व्यापार यांच्या संवर्धनासाठी देशोदेशी विशेष केंद्रे स्थापन करण्यात आली. आफ्रिकी देशांमध्ये कार्यरत असणाऱ्या व्यवसाय-उद्योगांना आवश्यक ती सल्लासेवा पुरविणे हा या केंद्रांच्या कामकाजाचा मुख्य भाग. चिनी गुंतवणूक आफ्रिकी देशांमध्ये वाढावी यासाठी सुटसुटीत कार्यप्रणाली निर्माण करण्याबरोबरच त्यासाठी वेगळ्या निधींची तरतूद करण्याचा धोरणीपणाही चिनी केंद्रीय नेतृत्वाने दाखवलेला आहे. आफ्रिकी आर्थिक-औद्योगीक विश्वातील अग्रगण्यांसह घसट वाढविण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून विविध प्रकारचे

परिसंवाद आयोजित करण्याबरोबरच अनौपचारिक भेटीगाठी आयोजित करण्यावरही चीनने भर दिला. त्याच्याच जोडीने उद्योगविषयक सहकार्यासंदर्भातील परिषदांच्या माध्यमातून आफ्रिकी उद्योगविश्वाबरोबर नाना प्रकारचे औद्योगिक करार करण्याबाबतही चीन प्रकर्षाने प्रयत्नशील राहिला.

आफ्रिकी उद्योगांना तांत्रिक सहकार्य तसेच तंत्रविज्ञान पुरविण्याच्या माध्यमातून, पश्चिमी देशांच्या तुलनेत चीन हाच आपला हितचिंतक असल्याची दृढ भावना उद्योगविश्वासह एकंदरच आफ्रिकी नागरिकांच्या मनात प्रस्थापित करण्यात चीनला यश प्राप्त झाले. चिनी गुंतवणुकीबरोबरच जे चिनी नागरिक आफ्रिकी देशांमध्ये स्थलांतरित झाले त्यांच्या रूपाने चिनी हितसंबंधांची जपणूक त्या त्या देशात करणारा बलशाली दबावगटदेखील आपसूकच साकारला. स्थानिक प्रशासनासह अर्थ-राजकीय धोरणनिर्मितीवर प्रभाव टाकण्यास हा स्थलांतरित चिनी नागरिकांचा दबावगट चिनी धोरणकर्त्यांना वेळोवेळी मदतीस आला व आजही येत असतो.

**भौतिक विश्व आणि मानसिक विश्व**

वैश्विक पटलावर या पद्धतीने आपले प्रतिमासंवर्धन क्रमाक्रमाने साध्य करत असतानाच, आफ्रिकी देशांबरोबर बहुस्तरीय नातेसंबंध प्रस्थापित करण्यावरही चिनी नेतृत्वाने पुढील काळात जाणीवपूर्वक लक्ष एकवटले. देशी अर्थव्यवस्थेतील विस्तारणारा वस्तुनिर्माण उद्योग उत्पादन करत असलेल्या अगणित जिनसांना विस्तारणारी बाजारपेठ अत्यावश्यक होतीच. ती गरजही आफ्रिकी देश पुरवू लागले. आफ्रिकी देशांमध्ये रस्ते, धरणे, वीजप्रकल्प यांसारख्या पायाभूत सेवासुविधांचे जाळे उभारण्यात सक्रिय सहभाग घेण्यातून चीनने संबंधित देशांच्या अर्थचक्रालादेखील गती देण्यात पुढाकार घेतला. चिनी तंत्रज्ञ, कामगार यांना रोजगार मिळण्याबरोबरच चिनी उद्योगांनी निर्माण केलेल्या यंत्रसामग्रीला त्यांद्वारे आयती बाजारपेठदेखील उपलब्ध होऊ लागली. वस्तुनिर्माण उद्योगाचे वैश्विक केंद्र म्हणून उभे ठाकण्याच्या ध्येयाने झपाटलेल्या चीनमधील उद्योगांनी उत्पादन केलेल्या वस्तू व सेवांनी, अल्पकाळातच, अनेक आफ्रिकी देशांच्या बाजारपेठा गजबजून सोडल्या. आफ्रिकी देशांमध्ये निर्माण केलेल्या अथवा करावयाच्या पायाभूत सेवासुविधांसाठी देऊ केलेल्या कर्जाऊ रकमांचा आफ्रिकी नेतृत्व तसेच सर्वसामान्य आफ्रिकी नागरिक यांना डोईजड भार वाटू नये यासाठी तशा कर्जांचे रूपांतर देणग्या अथवा अनुदानांमध्ये घडवून आणण्याचा धोरणीपणाही चीन दाखवू लागला. परिणामी, चीन हा देशोदेशींच्या अभिजनांच्या आस्थेचा व कौतुकाचाही विषय बनू लागला.

आफ्रिकी देशांच्या आर्थिक-भौतिक विश्वात पाय पक्के रोवण्यापर्यंतची पायाभरणी झाल्यानंतर चीनने चाणाक्षपणे मोहरा वळविला तो त्यांचे मनोविश्व व्यापण्याकडे. पश्चिमी राष्ट्रांसह जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांच्यासारख्या वैश्विक संस्था व व्यासपीठांच्या माध्यमातून देशोदेशी प्रसृत होत राहणाऱ्या लोकतंत्र, उदारमतवाद, व्यक्तिस्वातंत्र्य यांसारख्या पश्चिमी मूल्यप्रधान कथनाला एक पर्यायी कथन (नॅरेटिव्ह) विकसित करण्याच्या उद्योगाला चीनने पुढील टप्प्यावर गंभीरपणे हात घातला. त्यासाठी चीनने वाढत्या प्रमाणावर वापर चालू केला तो त्याच्या 'सॉफ्ट पॉवर'चा. आफ्रिकी देशांमधील प्रेक्षणीय स्थळांकडे चिनी पर्यटनोत्सुकांची पावले वळावीत यासाठी चीन मग ठोस पावले उचलू लागला. इथिओपिया, केनिया, झिम्बाब्वे यांसारख्या देशांसह एकंदर १६ देशांवर या दृष्टीने चीनने भर दिलेला दिसतो. पर्यटनाच्या माध्यमातून त्या त्या देशाबरोबरील सांस्कृतिक संबंधांची वीण पक्की व्हावी, हा चीनचा त्यामागील अप्रगट हेतू.

उच्च शिक्षणासाठी पश्चिमी राष्ट्रांमधील विद्यापीठांची निवड करण्याचा आफ्रिकी विद्यार्थ्यांचा कल चीनमधील विद्यापीठांकडे वळावा यासाठी चीनने जाणीवपूर्वक जारी राखलेले प्रयत्न हा त्याच धोरणदृष्टीचा दुसरा आयाम. चिनी जीवनमूल्यांचा व परंपरांचा प्रथम परिचय व नंतर प्रसार सुलभ व्हावा यासाठी चिनी भाषेचे प्रशिक्षण प्रदान करणाऱ्या सुविधांचा विस्तार घडवून आणण्याबरोबरच कन्फ्युशिअस यांच्या शिकवणुकीचा प्रचारही चीनने मोठ्या धडाक्यात समांतरपणे सुरू केला. त्यासाठी आफ्रिकी विद्यापीठांमध्ये कन्फ्युशिअस यांच्या शिकवणुकीचा अभ्यास शिस्तबद्धपणे करणारी केंद्रे कार्यान्वित करण्यासाठी चीनने वित्तपुरवठा चालू केला. आफ्रिकी देशांमधील वैद्यकीय व्यवसायोत्सुकांना चिनी वैद्यकीय शिक्षणसंस्थांमध्ये शिक्षण-प्रशिक्षण देण्याचे दरवाजे उघडण्याबरोबरच आफ्रिकी देशांना औषधे व वैद्यकीय उपकरणे विनामूल्य उपलब्ध करून देण्यासही चीनने सुरुवात केली. अशांसारख्या नानाविध मार्गांनी आफ्रिकी देशांमधील अभिजनांच्या मनात आपल्याबद्दल दीर्घकालीक विश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न चीन करत आलेला आहे. परिणामी, अशा अभिजन वर्गांतील तरूण पिढी उच्च शिक्षणासाठी युरोप-अमेरिकेतील विद्यापीठांऐवजी चिनी उच्च शिक्षणसंस्थांकडे त्यांची पावले वळवेल व शिक्षणपद्धतीच्या माध्यमातून वैश्विक मनोविश्वामध्ये रुजणाऱ्या पाश्चिमात्य मूल्यव्यवस्थेच्या फैलावास आपसूकच आळा बसेल, असाही चिनी हिशेब या सगळ्याच्या मुळाशी आहे.

अंतिमत:, या सगळ्या चित्राला असलेला आणखी एक पैलू तितकाच चिंताजनकही आहे. चिनी कम्युनिस्ट राज्यकर्त्यांच्या हुकुमशाही शासन व्यवस्थेच्या माध्यमातून मूलभूत मानवी हक्कांच्या चीनमध्ये होणाऱ्या पायमल्लीबाबत पश्चिमी राष्ट्रांकडून संयुक्त राष्ट्रांच्या व्यासपीठावर टीकेचा विरोधी स्तर उमटू नये यासाठी देखील आफ्रिकी राष्ट्रांच्या कुमकेचा वापर चिनी नेतृत्व करताना दिसते. ''आपण भाऊ-भाऊ, दोघे मिळून खाऊ,'' असा चीनचा या संदर्भातील खाक्या राहिलेला आहे. आफ्रिकी देशांमधील रक्तरंजित संघर्ष, वंशच्छेद यांसारख्या हिंसक घटनांदरम्यान होणाऱ्या हत्यांबाबत संयुक्त राष्ट्रांच्या व्यासपीठावर आवाज उमटला की चीनने सारवासारवीची भूमिका घ्यायची आणि मानवी हक्कांच्या चीनमधील पायमल्लीकडे कानाडोळा केला जावा यासाठी आफ्रिकी देशांनी वैश्विक व्यासपीठांवर चीनची पाठराखण करायची, असा हा परस्परपूरक व्यवहार आहे. तैवानच्या समितीकरणाबाबत तर अनेक आफ्रिकी देश सतत पाठिंब्याची भूमिका जाहीरपणे घेताना दिसतात. आफ्रिका खंडातील झिम्बाब्वे, सुदान, इथिओपियासह अनेक देशांबरोबर लष्करी सहकार्यविषयक करार करण्यावर चीनचा भर राहिलेला आहे. आपल्या देशातील लष्करी साहित्यनिर्मिती उद्योगाची हुकुमी बाजारपेठ या दृष्टीने आफ्रिका खंडातील देशाशी संबंध जोपासण्याचा चीनचा पवित्रा वैश्विक समुदायाच्या लेखी चिरंतन चिंतेचा विषय ठरतो आहे.

# पर्यावरण

## चिनी धरणांना बांध घालायचा कसा?

पाण्याची अपुरी उपलब्धता आणि त्यापायी जाणवणारी त्याची वाढती टंचाई हे एक मोठे आव्हान आगामी काळात अवघ्या जगाच्या पुढ्यात उभे ठाकेल याची चिन्हे आज स्पष्ट दिसत आहेत. काळाची ही पावले ओळखूनच, कदाचित, मोठमोठाली धरणे बांधण्याची मोहिमच जणू चीनने हाती घेतली आहे. चीनच्या लेखी ते स्वाभाविक आहे, असेही एक वेळ समजता येईल. परंतु, या धोरणदृष्टीला चिकटलेला एक विलक्षण कळीचा असा राजकीय व्यूहरचनेचा कुटिल हेतू मात्र नजरेआड करता येणार नाही. आपल्या देशातील पाणीप्रश्नाची सोडवणूक आणि वीजनिर्मिती या दोन उद्देशांबरोबरच येणाऱ्या काळात भारताची जलकोंडी करण्याचे एक प्रभावी अस्त्र म्हणूनदेखील चीन या दिशेने मोर्चेबांधणी करतो आहे. भारतातून वाहणाऱ्या अनेक नद्या चीनच्या किंवा चीनने अंकित केलेल्या प्रदेशांत उगम पावत असल्याने हा मुद्दा अधिकच गंभीर व संवेदनशील बनतो. चीनमधील प्रमुख नद्यांवर मोठाली धरणे बांधून चीन या धरणांचा आणि त्यांद्वारे अडवल्या जाणाऱ्या पाण्याचा उपयोग एखाद्या अमोघ शस्त्राप्रमाणे भारताच्या विरोधात करू शकेल, अशी भीती या क्षेत्रातील जाणकारांना वाटते आहे.

'वॉटर – द एपिक स्ट्रगल फॉर वेल्थ, पॉवर अँड सिव्हिलायझेशन' या पुस्तकात ज्येष्ठ पत्रकार स्टीव्हन सॉलमन यांनी येत्या काळात एकंदरीनेच जागतिक स्तरावर जलसंकट किती व कसे तीव्र होत जाणार आहे याचा अभ्यासपूर्ण धांडोळा घेतलेला आहे. पाण्यापायी भविष्यात कोणकोणती संकटे उद्भवू शकतात याचा अभ्यासपूर्ण वेध घेताना 'आधुनिक युगातील अनेक युद्धे पाण्यावरूनच लढली जातील' अशी भीती त्यांनी त्यांच्या ग्रंथात व्यक्त केलेली आहे. सध्याचा काळ आणि पाण्यासंदर्भात या ना त्या स्वरूपात निर्माण होणाऱ्या समस्या पाहता त्यात तथ्यही असल्याचे दिसून येते. जागतिक तापमानवाढीचा एक परिणाम म्हणून जगभरातील जलसमस्या सर्वत्रच

अधिकाधिक तीव्र होत जाणार आहेत. एका बाजूला अनेक देशांतील मोठमोठ्या नद्या, जलाशय आज कोरडेठाक पडत चालले आहेत, तर दुसरीकडे उत्तर ध्रुवावरील अनेक हिमनद्या वितळू लागलेल्या आहेत. हे पर्यावरणीय असंतुलन एकीकडे निर्माण होत असताना एकत्रितपणे सामंजस्यपूर्वक या जलसंकटाचा सामना करण्यास सिद्ध होण्याऐवजी, शत्रूला नामोहरम करण्यासाठी सामरिकदृष्ट्या जलयुद्धाची नवीनच आघाडी कशी उघडता येईल, या संदर्भातील रणनीती आखण्यावर चीनचा भर दिसतो आहे. विशेषत:, विविध आघाड्यांवर भारताची कोंडी करता यावी या हेतूने चीनने खूप आधीपासूनच धोरणीपणे व्यूहरचनात्मक पावले उचलण्यास सुरुवात केलेली होती. सामरिक शस्त्रास्त्रांच्या जोडीनेच निसर्गसिद्ध जलस्त्रोतांचाही आता शस्त्र म्हणून येत्या काळात वापर कसा करता येईल, या बाबत कुटिल नीती अंगिकारणे हा त्या व्यूहरचनेचाच एक भाग दिसतो.

आधुनिक युद्धनीतीमध्ये प्रत्येक वेळी रणांगणावर प्रत्यक्ष युद्ध न करतादेखील एखाद्या राष्ट्राची कोंडी केली जाऊ शकते. त्यासाठी 'सायबर वॉर', आर्थिक नाकेबंदी, व्यापार-उदिमाला प्रतिबंध असे अनेकानेक पर्याय चोखाळले जाऊ शकतात व जात आहेत. पाण्याचादेखील वापर आता शस्त्रासारखा होऊ शकतो हा विचार या सगळ्या बदलत्या रणनीतीचाच एक भाग. आपल्या देशांतून वाहणाऱ्या महत्त्वाच्या नद्यांवरील मोठी धरणे शस्त्राप्रमाणेच वापरत समोरच्या देशाला नामोहरम करता येणे शक्य आहे, हे नेमके ओळखूनच चीनने मोठी धरणे बांधण्याचा जणू सपाटाच आता लावलेला आहे.

नदीच्या मुख्य प्रवाहावर मोठाली धरणे बांधत सीमापार वाहणाऱ्या नद्यांचे प्रवाह आपल्या बाजूला वळवून घेत नद्यांच्या लाभक्षेत्रात भौगोलिकदृष्ट्या पुढील टप्प्यातील भूप्रदेशांची पाण्याच्या उपलब्धतेसंदर्भात कोंडी करायची, अशा प्रकारचा भू-राजनैतिक व्यूहात्मक चिनी डाव या पाठीमागे दिसतो. विविध प्रांतांत धरणे बांधण्याची जी योजना चीनने आखलेली आहे तिच्या मुळाशी निखळ आणि केवळ विकासाची दृष्टी नसून, भारतासह शेजारील देशांची जलकोंडी कशी करता येईल हा विचार तिथे अग्रस्थानी आहे. म्यानमार, तिबेट या प्रांतांतून वाहणाऱ्या नद्यांवर भारतातील ईशान्येकडील राज्ये मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहेत, या वास्तवाची पूर्ण कल्पना असतानादेखील चीनने Yarlung Zangbo अर्थात ब्रह्मपुत्र नदीवर पाच मोठ्या जलविद्युत प्रकल्पांची निर्मिती हाती घेतलेली आहे. 'हायड्रोपॉवर डिप्लोमसी' असे या व्यूहात्मक रचनेचे वर्णन करता येईल. त्यानुसार, आतापर्यंत तब्बल ८६ हजार

धरणे चीनमध्ये बांधून पूर्ण झालेली आहेत. त्या तुलनेत भारतातील धरणांची संख्या खूपच कमी आहे. केंद्रीय जल आयोगाच्या उपलब्ध आकडेवारीनुसार, भारतात आजघडीला ५ हजार २६४ मोठी धरणे आहेत. ब्रह्मपुत्र नदीवर सध्या असलेल्या धरणापेक्षा तिप्पट मोठे धरण बांधण्याचे नियोजन १४ व्या पंचवार्षिक योजनेच्या आराखड्यात चीनने केलेले आहे.

ब्रह्मपुत्र ही नदी चीनमध्ये Tsangpo या नावाने ओळखली जाते. जगातील सर्वांत मोठ्या नद्यांमध्ये तिची गणना केली जाते. ही नदी हिमालयात उगम पावते. तिबेटमधून ती भारतातील अरुणाचल प्रदेशात येते. तिथून पुढे आसामातून वाहात ती बंगालच्या उपसागराला मिळते. या सगळ्याच प्रदेशांसाठी ती जीवनदायिनी गणली जाते. या नदीवर एक मोठे धरण बांधून त्याद्वारे जलविद्युत प्रकल्प साकारण्यात येणार आहे असे चीनने जाहीर केलेले आहे. हे धरण बांधले गेल्याने भारताच्या चिंता अधिक वाढणार आहेत. मॉन्सूनच्या काळात या धरणातून मोठ्या प्रमाणावर पाणी सोडले गेल्यास अरुणाचल प्रदेश, आसाम येथे पूरस्थिती निर्माण होऊ शकते. तर, पाणी रोखून धरल्यास काही संबंधित प्रांतांत अवर्षणाची स्थितीही निर्माण होऊ शकते. हे सगळे असे असल्यामुळे भारताचा या धरणाला विरोध आहे. पाकिस्तानमध्ये पूरपरिस्थिती निर्माण झाली तर त्यासाठी भारताला जबाबदार धरले जाते; परंतु, जलकोंडी करण्याच्या हेतूने आता चीन जर पाण्याचा आणि धरणांचा वापर करतो आहे तर त्यालाही वेसण घातली जाणे गरजेचे आहे, अशी भूमिका भारताने आंतरराष्ट्रीय समुदायासमोर आग्रहाने मांडलेली आहे.

सतलज व ब्रह्मपुत्र या नद्यांमधून वाहणाऱ्या पाण्याचे व्यवस्थापन आणि सुनियोजित वाटप यासाठी भारत आणि चीन यांच्यादरम्यान २००८ साली एक करार झालेला होता. परंतु, त्याची प्रभावी अंमलबजावणी मात्र होताना दिसत नाही. चीनमधून वाहत भारतात येणाऱ्या नद्यांमधील पाण्याच्या पातळीसंदर्भातील तपशील वेळोवेळी उपलब्ध करून देण्याबाबत भारत-चीनमध्ये असाच आणखी एक करार झालेला होता. परंतु, २०१७ साली डोकलाम येथे उद्‌भवलेल्या भारत-चीन संघर्षापासून चीनने ही माहिती भारताला पाठवणे बंद केले होते. काही काळानंतर संबंधित माहिती देण्यास चीनने आता सुरुवात केलेली असली तरीदेखील ती माहिती हातचे राखून दिली जाते असा दाट संशय भारताला आहे.

चीन अशा पद्धतीने कोंडी करू पाहत असल्याचे लक्षात आल्यानंतर अनेक देशांनी चीनच्या विरोधातील भूमिका आंतरराष्ट्रीय पटलावर आता मांडली आहे.

परंतु, केवळ वीजनिर्मिती आणि देशाच्या विकासाच्या हेतूने ही धरणे बांधली जात असून कोणाचीही कोंडी करण्याचा विचार त्यामागे अजिबात नसल्याची बतावणी चीन करतो आहे. परंतु, उपग्रहांनी टिपलेल्या छायाचित्रांनी मात्र चीनचे या सगळ्याच्या मागे असणारे छुपे मनसुबे सगळ्या जगासमोर उघड केले आहेत. चीनची अशी स्वार्थी धोरणनीती इतरांच्या हितावर गदा आणणारी असल्याचे मत या क्षेत्रातील जाणकारांकडून व्यक्त केले जात आहे. म्हणूनच चीनच्या या छुप्या व कूट रणनीतीला विरोध वाढतो आहे. चीनच्या या अशा जलव्यवस्थापनाचे भविष्यातील संभाव्य फटके हेरून त्यांपासून बचाव करण्यासाठी शेजारील अन्य देशांनीही धरणे बांधण्याचा धडाका सुरू केला आहे. मेकाँग नदीवर धरणे बांधायला चीनने सुरुवात केली तेव्हाच विरोध दर्शवत हा विषय आंतरराष्ट्रीय स्तरावर नेऊन रान उठवणे गरजेचे होते, असे आंतरराष्ट्रीय संबंधांचे अभ्यासक म्हणत आलेले आहेत. परंतु भारताने तसे काहीच न केल्याने चीनचे फावले आणि धरणप्रकल्पांचे काम त्याने अतिशय झपाट्याने सुरू केले.

या सगळ्यांतून उद्भवणारे भविष्यातील संभाव्य धोके लक्षात घेत कंबोडिया, लाओस, थायलंड आणि व्हिएतनाम या देशांनी मेकाँग नदीतील पाण्याचे सर्वसमावेशक वाटप होण्यासाठी १९९५ साली 'मेकाँग रिव्हर कमिशन'ची स्थापना केली होती. परंतु, त्यांत सहभागी होणेच चीनने टाळले. चीन त्यात सहभागी झाला असता तर 'रिव्हर कमिशन'च्या अटी, तरतुदींनुसार काम करणे त्याला भाग पडले असते. त्या ऐवजी, मुक्त राहात इतरांना झुकवून किंवा दबावाखाली आणून आपल्याला हवे ते साध्य करण्याचे धोरण अंगीकारत छोट्या राष्ट्रांवर दबाव आणण्याचे तंत्र चीनने अंगीकारले. या 'मेकाँग रिव्हर कमिशन'मध्ये चीन त्याच वेळी सहभागी होता तर आजचे चित्र निश्चितपणे वेगळे दिसले असते. आजघडीला चीनने मेकाँग नदीवर सहा मोठी धरणे बांधलेली आहेत. या धरणांची उभारणी करताना, सर्वसमावेशक पाणीवाटपाचे सूत्र त्याने सपशेल धुळीला मिळवले आहे. अडवलेला अधिकाधिक पाणीसाठा आपल्याच कामापुरता वापरता यावा याची पुरेपूर काळजी घेणाऱ्या निखळ स्वार्थकेंद्रित चिनी नीतीबाबत इतर देशांनी आवाज उठला तरी त्याला भीक न घालता धरणबांधणीचे धोरण चीनने अव्याहत सुरूच ठेवले आहे.

आजचे चित्र असे आहे की, मेकाँग नदीवर चीनने बांधलेल्या सर्वांत लहान धरणाचे आकारमान भारतातील सर्वांत मोठ्या धरणाइतके आहे. धरणबांधणीच्या महत्त्वाकांक्षी धोरणामागील चीनच्या मूळ हेतूची कल्पना यांवरून येऊ शकते. चीनने

केवळ आपल्याच भागांत मोठाली धरणे बांधली आहेत असे नव्हे. तर, पाकिस्तानव्याप्त क्षेत्रातदेखील सिंधू नदीवर पाच नवी धरणे बांधून देण्याची तयारी त्याने दाखवली आहे आणि त्यासाठी पाकिस्तानला लागेल ती मदत करण्याची तयारीही दर्शवलेली आहे. तसेच, या प्रकल्पासाठी आवश्यक तितके अर्थसहाय्यदेखील पाकिस्तानला उपलब्ध करून देण्यास चीन तयार आहे. पाकव्याप्त काश्मीरमधील शक्सगाम खोरे सामरिकदृष्ट्या किती महत्त्वाचे आहे हे चीन जाणून आहे. तिथे असणाऱ्या जलसाठ्यावरही चीन लक्ष ठेवून आहे. त्या प्रांतात धरणे बांधण्याबाबत चीनने दाखवलेला उत्साह व घेतलेला पुढाकार हा या पार्श्वभूमीवर लक्षणीय शाबीत होतो. चिनी राज्यकर्त्यांनी १९६० सालापासूनच तिथे हस्तक्षेप करत लष्करी हालचाली वाढवल्या होत्या. या खोऱ्यामध्ये २५० हून अधिक हिमनद्या असल्याने भविष्याच्या दृष्टीने हा भाग अत्यंत महत्त्वाचा आहे,

आंतरराष्ट्रीय संबंधांच्या अभ्यासकांनुसार, चीनचे हे धोरण हेरून त्याला विरोध करण्यास भारताला अंमळ उशीरच झाला आहे. परंतु, आता भारतानेही त्या संदर्भात उचित अशी पावले टाकायला सुरुवात केलेली आहे. धरणबांधणीची अशी दोन राष्ट्रांमधील स्पर्धा हिमालयीन पर्वतरांगांच्या निकट परिसरातील यच्चयावत परिसंस्थांच्या मुळावर उठू शकते, अशी भीती आता पर्यावरणक्षेत्रातील जाणकार आणि भूगर्भशास्त्रज्ञांकडून वर्तवली जाऊ लागली आहे. धरणबांधणीच्या अशा स्पर्धेचा घातक परिणाम येणाऱ्या काळात जाणवू शकेल अशी भीती पर्यावरणतज्ज्ञांना वाटते आहे. मोठ्या नद्यांवर धरणे बांधल्याने पर्यावरणाचे संतुलन ढासळते आहे. त्यामुळे नजीकच्या काळात धरणपरिसरात भूकंपांचे प्रमाण वाढेल आणि त्यामुळे तेथील जनजीवनच धोक्यात येईल अशी भीती आहे. या संभाव्य परिणामांकडे सरसहा दुर्लक्ष करत रेटलेली मोठ्या धरणांची उभारणी नक्कीच धोकादायक ठरू शकते असा इशारा पर्यावरण अभ्यासक देत आहेत.

हिमालयन पर्वतरांगांच्या वरच्या भागात म्हणजे तिबेटच्या पठारी प्रदेशात चीनने तर, हिमालयाच्या खालच्या बाजूला म्हणजे उत्तराखंडपासून ते अरुणाचल प्रदेशपर्यंत भारताने धरणे बांधलेली आहेत. त्यामुळे आगामी काळात हिमालयाच्या या परिसरात मोठे भूकंप होण्याची शक्यता भूगर्भशास्त्रज्ञ वर्तवत आहेत. याचा सगळ्यांत मोठा फटका नेपाळला तसेच भारतातील दिल्ली, चंदिगढ, नैनिताल व अरुणाचल प्रदेश या भागांना बसू शकेल अशी भीती आहे. त्यामुळे चीनच्या महत्त्वाकांक्षेला एकीकडे वेळीच आळा घालत असताना धरणबांधणीच्या स्पर्धेचा वेग भारतालाही कमी

करावा लागणार आहे. कारण या सगळ्याचे सर्वाधिक दुष्परिणाम भारतालाच भोगावे लागतील असा अभ्यासकांचा अंदाज आहे. त्यामुळे आगामी काळात परस्परसामंजस्याची भूमिका घेऊनच पुढे जाणे हे भारत आणि चीन या दोन शेजारी राष्ट्रांच्या हिताचे ठरणार आहे, असे आग्रही प्रतिपादन या क्षेत्रातील अभ्यासक आज प्रकर्षाने करताना दिसतात.

या सगळ्या पार्श्वभूमीवर, विस्तारवादी आणि वर्चस्व गाजविण्याची मानसिकता जोपासणाऱ्या चीनच्या या आक्रमक धरणबांधणीला येत्या काळात परिणामकारक बांध कसा घालायचा हा सगळ्यांच्याच पुढ्यातील एक गंभीर प्रश्न बनतो आहे. धरणबांधणीचा हा चिनी वेग अक्षरश: थक्क करणारा आहे. मात्र तो कुणाच्याच हिताचा नाही. कारण त्याचे संभाव्य असे व्यापक दुष्परिणाम सुदूर भविष्याच्या पोटात दडलेले आहेत. म्हणूनच, आपल्या शेजारील राष्ट्रांचीही पाण्याची भविष्यकालीन गरज लक्षात घेऊन, भारतासह अन्य सीमावर्ती देशांशी संवाद वाढवून जलवाटपाचा भविष्यकालीन सर्वहितकारक असा बृहत् आराखडा चीनने बनवणे आवश्यक आहे, असे या क्षेत्रातील जाणकारांचे मत आहे.

# नागरीकरण

## सक्तीच्या नागरीकरणाची चिनी शोकान्तिका...

अमेरिकी अर्थव्यवस्थेमध्ये उद्भवलेल्या वित्तीय अरिष्टापायी वैश्विक अर्थव्यवस्थेला जो दणका २००८ सालाच्या सरत्या उत्तरार्धामध्ये बसला त्याच्या झळा, तुलेनेने त्यांतल्या त्यांत अधिक बसल्या व सोसाव्या लागल्या त्या चिनी अर्थव्यवस्थेलाच. आर्थिक पुनर्रचना पर्वाला प्रारंभ केल्यापासून अवलंबलेली निर्यातप्रधान आर्थिक विकासाची धोरणप्रणाली, त्या कालबिंदूपासून, तशीच पुढे जारी राखणे चीनला अवघड ठरू लागले. चिनी वस्तू व सेवांना मुख्यत: पश्चिमी बाजारपेठांमधून येणाऱ्या मागणीत चालू झालेली घसरण हे त्यांमागील एक मुख्य कारण होते. हे कारण होते निखळ आर्थिक. २०१६ साली अमेरिकेत घडून आलेल्या सत्तापालटाद्वारे ट्रम्प यांनी अंगीकारलेल्या 'अमेरिका फर्स्ट' या धोरणापायी चिनी वस्तूंच्या मागणीस लागलेल्या कसरीला एक परराष्ट्रीय अर्थव्यूहरचनात्मक पवित्र्याचा आयाम जोडला गेला. साहजिकच, १९७०चे दशक सरत असताना अर्थविकासाची जी धोरणदिशा अवलंबलेली होती तिच्यामध्ये बदल घडवून आणण्याची निकड चिनी नेतृत्वाला जाणवू लागली. आर्थिक विकासविषयक धोरणांची १९७८-७९ सालापासून अवलंबलेली दिशा थेट १८० अंशांतून बदलण्याचे चिनी शासकांच्या पुढ्यातील आव्हान सोपे नव्हते व नाही. १९७०च्या दशकाच्या सरत्या पर्वापासून मुख्यत: विदेशी मागणीवर विसंबलेला बहिर्मुख आर्थिक विकास, त्याचा तेथवरचा सारा रोख अंतर्मुख बनवत, देशी मागणीवर स्थिर करावयाचा तर त्यासाठी विकासप्रक्रियेस दमदार हातभार लावणारे अ-पूर्व असे पूरक-कारक घटक देशी बाजारपेठांमध्ये निर्माण करणे चीनच्या दृष्टीने अगत्याचे बनले. देशी बाजारपेठांमध्ये सक्षम अशी मागणी तयार होणे, ही त्यासाठी अत्यावश्यक अशी पूर्वअट होती. त्यासाठी गरज होती ती चिनी अर्थव्यवस्थेमध्ये अतिशय मूलभूत स्वरूपाचे स्थित्यंतर घडवून आणण्याची. आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमास हात घातल्यानंतरही, ग्रामीण चीनमधील

शेतकऱ्यांनी त्यांच्यापाशी असणारे जमिनींचे लहानमोठे तुकडे कसूनच उपजीविका भागवावी, असाच सर्वसाधारण धोरणात्मक पवित्रा चीनने राखलेला होता. आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाच्या अंमलबजावणीद्वारे निष्पन्न होणाऱ्या लाभांच्या असमान वितरणाद्वारे निर्माण होणारा सामाजिक तसेच राजकीय असंतोष काबूत ठेवण्यासाठी तो पवित्रा अंगीकारणे चिनी धोरणकर्त्यांना अनिवार्यच होते. मात्र, चिनी अर्थव्यवस्थेच्या आगेकूचीच्या सरासरी वार्षिक दरात घसरण चालू राहण्याची प्रवृत्ती रोखायची तर काही तरी अगदी नवीन विचार करणे क्रमप्राप्त होते.

त्या साऱ्या घुसळणीद्वारे, ग्रामीण चीनचे झपाट्याने शहरीकरण घडवून आणण्याची टूम निघाली. नागरी जीवनशैली, नागरीकरण आणि आर्थिक वाढविकास यांच्यादरम्यान नांदणाऱ्या पुस्तकी आर्थिक तर्कावर ही सारी धोरणदृष्टी विसंबलेली होती. शहरांच्या तुलनेत ग्रामीणांचे सरासरी उत्पन्न व साहजिकच उपभोग हा सरासरीने निम्नस्तरावर असतो. देशी मागणीचा टेकू पुरवत आर्थिक विकासाचा वेग टिकवून धरायचा तर जवळपास दोन तृतीयांशापेक्षाही अधिक असणाऱ्या चिनी ग्रामीण लोकसंख्येच्या उपभोगाचे सरासरी मान उंचावण्याखेरीज पर्याय दिसत नव्हता. नागरीकरणाच्या प्रक्रियेने वेग पकडला की शहरी बांधकामे, पायाभूत सेवासुविधांची निर्मिती, करमणूक, घरबांधणी यांसारख्या माध्यमांतून रग्गड रोजगारनिर्मिती बिगर शेतीक्षेत्रामध्ये घडून येऊन त्यांद्वारे शेतीमध्ये गुंतलेल्या मनुष्यबळाला रोजगारसंधी प्राप्त होऊन त्यांची क्रयशक्ती वाढेल, असा सहसंबंध या धोरणविषयक दिशेच्या मुळाशी होता. दोन तृतीयांशापेक्षाही अधिक असलेल्या ग्रामीण चिनी लोकसंख्येची क्रयशक्ती या प्रक्रियेद्वारे उंचावली की देशांतर्गत मागणीदेखील लक्षणीयरीत्या वाढेल व यथावकाश आर्थिक घोडदौडीचा वेग परदेशी बाजारपेठांमधील मागणीवर अवलंबून राहण्याच्या परवशतेपासून मुक्तता लाभेल, असा चिनी धोरणकर्त्यांचा या मागे हिशेब होता. ही सारी धोरणात्मक विचारसरणी आर्थिक वाढविकास आणि नागरीकरण या दोन प्रक्रियांदरम्यानच्या नैसर्गिक नात्याच्या बैठकीकडे केवळ दुर्लक्ष करणारीच नव्हे तर तो सहसंबंध पुरता पायदळी तुडविणारी अशीच होती.

शहरांची निर्मिती आणि विस्तार ही सर्वसाधारण आर्थिक वाढविकासाच्या प्रक्रियेची एक नैसर्गिक व स्वाभाविक परिणती गणली जाते. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेदरम्यान संबंधित प्रदेशाच्या आर्थिक संरचनेमध्ये संरचनात्मक बदल (स्ट्रक्चरल चेन्जेस्) साकारतात. दरडोई सरासरी उत्पन्नात वाढ घडून आल्याने अन्नेतर जिनसांना यथावकाश मागणी सातत्याने वाढू लागते. त्यांतून बिगर शेती उद्योगव्यवसायांना चालना लाभते.

या बदलांद्वारे स्थलांतराला वेग येतो. बिगर शेती उद्योगधंद्यांची स्थापना व केंद्रीकरण ज्या ठिकाणी अव्याहत चालू राहते तिथे क्रमाने भू-वापर बदलतो. दरडोई उत्पन्नातील वाढीद्वारे लोकसंख्यावाढीला अनुकूल पर्यावरण निर्माण होते. वाढती लोकसंख्या, लोकसंख्येचे स्थलांतर, बिगर शेती उद्योगव्यवसायांची स्थापना व विस्तार आणि या सगळ्यांद्वारे भू-वापरात घडून येणारा बदल ही सारी कार्यकारणपरंपरा शहरांच्या निर्मिती व विस्तारामागे सक्रिय असते. चीनमध्ये अलीकडील दोन दशकांपासून शहरी वाढविस्ताराची जी प्रक्रिया बाळसे धरताना दिसत आली तिची निपज उपरोक्त प्रक्रियेद्वारे मुदलातच घडून आलेली नव्हती. चीनमधील केंद्रीय सत्ता आणि प्रादेशिक शासनसंस्था यांच्यादरम्यानच्या वित्तीय व्यवस्थेमध्ये घडवून आणले गेलेले काही बदल, चीनमध्ये तेथवर अंमलात असलेल्या भू-व्यवस्थापनविषयक धोरणांचा पालटलेला तोंडवळा आणि तत्कालीन राजकीय वास्तवाची निकड या तीन घटकांच्या आंतरघडामोडींचा परिणामस्वरूप म्हणजे चीनमधील नागरीकरण ठरले.

साहजिकच मग, असे कृत्रिम शहरीकरण शासनसंस्थेच्या पुढाकाराखेरीज अशक्यप्रायच होते. त्यांमुळे, नवनवीन अशी लहानमोठी शहरे निर्माण करण्याचा जणू धडाकाच चीनमध्ये २०१२-१३ सालापासून शासकीय धोरणाचा भाग म्हणून सुरू झाला. लहानखोर ग्रामीण घरांच्या जागी टोलेजंग अशा गगनचुंबी इमारती उठवल्या जाऊ लागल्या. शेतजमिनींचे रूपांतर रस्त्यांच्या जाळ्यामध्ये वेगाने घडून येऊ लागले. २०२५ सालादरम्यान तब्बल २५ कोटी ग्रामीण चिनी नागरिकांचे पुनर्वसन नवनिर्मित शहरांमध्ये घडवून आणण्याचे ध्येय या सगळ्याच्या मुळाशी होते. त्यांतून ग्रामीण चिनी नागरिकांच्या जीवनराहाटीत कमालीचे स्थित्यंतर घडून येऊ लागले. उभ्या चीनचे व्यक्तिमत्वच जणू बदलू लागले. धडाकेबाज नागरीकरणापायी, चिनी ग्रामीणांचे त्यांच्या जमिनींशी असलेले नाते पुरते विस्कटले. मुळात, जमीनधारणा, जमिनीची मालकी आणि जमीननिगडित संबंध यांबाबत, थेट, १९५०च्या दशकापासूनच चिनी कम्युनिस्ट पक्षाचे धोरण कमालीचे धरसोडीचे राहिलेले दिसते. १९५०च्या दशकादरम्यान पर्व नांदले ते ग्रामीण भागांतील चिनी कुटुंबांना जमिनींचे लहान लहान तुकडे कसण्यासाठी उपलब्ध करून देण्याचे. पुढे, माओप्रणीत सांस्कृतिक क्रांतीच्यादरम्यान लाट आली ती जमिनींची खासगी मालकी अथवा जमिनींवरील खासगी नियंत्रण हटवून सामुहिकीकरणाच्या तत्वाची. १९६२ ते १९७५ या कालावधीत लक्षावधी चिनी तरूणांनी फिरून एकवार खेड्यांची वाट पकडली. यथावकाश, १९७०च्या दशकाच्या अखेरीस आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमास

**शासनप्रणित नागरीकरणाचे ऊल्लेखित परिणाम**

*अर्थकारणातील कोणत्याही धोरणात्मक बदलांचे परिणाम केवळ अर्थकारणापुरतेच सीमित राहात नसतात. केवळ इतकेच नाही तर, एखाद्या धोरणाचे जसे काही अनपेक्षित पडसाद समाजकारणात उमटतात त्याचप्रमाणे शासनसंस्थेने उचललेल्या काही पावलांमुळे परिणामांची अगदी निराळीच मालिकाही व्यवहारात साकारते. चिनी धोरणकर्ते अलीकडील काही काळात नेमक्या याच सगळ्या कार्यकारणभावाचा सामना करत आहेत. चिनी अर्थव्यवस्थेला चालना देण्याच्या हेतूने कृत्रिमरीत्या नागरी विकासाला बळ पुरविणारी धोरणे चीन साधारणपणे २०१२ सालापासून राबवू लागला. साहजिकच, त्यांद्वारे चिनी बांधकाम क्षेत्राला प्रचंड ऊ र्जापुरवठा झाला. २०१२-१३ सालापासून पुढे किमान सात ते आठ वर्षे चिनी बांधकाम क्षेत्राची झंझावाती आगेकूच चालू राहिली. परंतु, चिनी बांधकाम क्षेत्रातील 'एव्हरग्रॅन्ड' या बलशाली भिडूचे आर्थिक साम्राज्य डळमळीत बनत असल्याची चिन्हे २०२० सालापासून दिसू लागल्यानंतर मात्र चिनी बांधकाम क्षेत्रात सारेच काही आलबेल नाही, याची चुणूक दिसू लागली. वास्तविक पाहता, चिनी बांधकाम क्षेत्रात अलीकडील उद्‌भवलेल्या समस्यांचे मूळ, काही अभ्यासकांच्या विश्लेषणानुसार, रुजलेले आहे ते १९८०च्या दशकापासून चिनी राज्यकर्त्यांनी कठोरपणे राबविलेल्या लोकसंख्यानियंत्रणाच्या धोरणाच्या भूमीत. आता, लोकसंख्या नियंत्रित करण्याच्या मागे तरी चीन का लागला, हेदेखील नीट समजावून घ्यावयास हवे. चिनी लोकसंख्येची भूक भागवू शकेल इतके पुरेसे अन्नोत्पादन करण्यासाठी चीनपाशी उपजाऊ जमीन आहे किंवा नाही, या मुद्याशी लोकसंख्यानियंत्रणाच्या धोरणाचा जागा जुळलेला होता व आहे. मुळात, चीनपाशी उपजाऊ जमीन मर्यादित प्रमाणामध्ये उपलब्ध असल्याने, वाढत्या लोकसंख्येबरोबर वाढणारी अन्नधान्याची गरज भागवण्याचे आव्हान उत्तरोत्तर उग्र बनत जाईल, याची अटकळ धोरणकर्त्यांना होती. तेव्हा भविष्यात उद्‌भवणारी अन्नधान्याच्या संभाव्य तुटवड्याची समस्या आटोक्यात राखायची तर खाणाऱ्या तोंडांची वाढ सीमित राखली पाहिजे, हे सूर्यप्रकाशाइतके उघड होते. दुसरीकडे, आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाच्या अंमलबजावणीनंतर विस्तारणारे नागरीकरण आणि निवासी घरांची वाढती मागणी ध्यानात घेता नागरी विस्तारासाठीदेखील पुरेशी जमीन उपलब्ध होणे*

*अथवा ती उपलब्ध करून दिली जाणे, अत्यावश्यक बनत होते. देशातील उपजाऊ जमिनीचे एकूणांतील प्रमाण टिकवून धरण्यासाठी वाढत्या शहरीकरणाला वाव देणारे वाढीव क्षेत्र चिनी धोरणकर्ते उपलब्ध करून देईनासे झाले. परिणामी, शहरी वापरासाठीच्या जमिनीची मागणी एकीकडे वाढत असतानाच दुसरीकडे त्याच वेळी शहरी वापरासाठीच्या जमिनीचा तुटवडा चीनमध्ये निर्माण झाला अथवा भासू लागला. साहजिकच, जमिनीच्या तुलनेत लोकसंख्या अतिरिक्त ठरत असल्याचे चित्र निर्माण होऊन एकीकडे लोकसंख्या नियंत्रित करण्याचे धोरण नेटाने राबविणे भाग पडले तर दुसरीकडे शहरी जमिनी आणि पर्यायाने शहरी निवारा महागला. अन्नधान्योत्पादनासाठी चीनपाशी वास्तविक मुबलक उपजाऊ जमीन उपलब्ध आहे अथवा होऊ शकते, हे पुढे स्पष्ट होऊनही 'वन चाइल्ड पॉलिसी' बदलण्याचे पाऊ ल चिनी धोरणकर्त्यांनी तेव्हाच काही उचलले नाही. या सगळ्याचा प्रतिकूल परिणाम लोकसंख्यावाढीच्या सरासरी वेगावर व्हावा, हे साहजिकच ठरते. चिनी समाजव्यवस्थेमध्ये दरम्यानच्या काळात साकारत आलेल्या काही बदलांनीदेखील लोकसंख्यावाढीच्या वेगाला खीळ घातली. चिनी तरूणाईमधील चिवट बेरोजगारी, वाढती महागाई आणि सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेलेल्या घरांच्या किमती यांपायी चिनी तरूण एक तर लग्न पुढे ढकलण्याच्या मन:स्थितीत आहेत अथवा इच्छा असूनदेखील जोडीदार मिळत नाहीत म्हणून आजही सडेच आहेत. परिणामी, मुलांच्या विवाहाचे सरासरी वय चीनमध्ये वाढते आहे. दुसरीकडे, आर्थिक सुबत्तेपायी वित्तीय स्वायत्ततेची चव चाखलेल्या चिनी तरुणींना 'चूल आणि मूल' या बंधनामध्ये अडकण्याची इच्छा नसल्याचे अलीकडील काही अभ्यासांद्वारे स्पष्ट होते आहे. या सगळ्यांमुळे चिनी समाजातील लग्नांचे प्रमाणही बाधित होते आहे. याचा परिणाम एकीकडे कुटुंबसंस्था विस्कळीत बनण्याबरोबरच लोकसंख्यावाढीस लगाम बसण्यातही होताना दिसतो. लोकसंख्यावाढीचा वेग अडखळू लागल्याचे पडसाद निवासी घरांच्या मागणीमध्ये उमटू लागले. चिनी बांधकाम क्षेत्राला उतरती कळा लागली ती तिथूनच!*

*चिनी समाजव्यवस्थेमध्ये काळाच्या ओघात घडून येत असलेल्या या बदलांचे परिणाम शासनप्रणित नागरीकरणाच्या धोरणावर तसेच बांधकाम क्षेत्राच्या आगेकूचीवर साहजिकच जाणवू लागले.*

आरंभ झाल्यानंतर चिनी ग्रामीणांना पुन्हा एकवार कसण्यासाठी जमिनी प्रदान करण्यात आल्या. त्याच वेळी, चीनमधील नागरीकरणानेदेखील वेग पकडला. आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाच्या अंमलबजावणीद्वारे चिनी अर्थव्यवस्थेत प्रवेशलेल्या परकीय थेट गुंतवणुकीचा त्यांत मोठाच वाटा होता. तर, ग्रामीण चीनमधील अतिरिक्त मनुष्यबळाचे चिनी शहरांकडे घडून आलेले स्थलांतर हा वेगवान नागरीकरणाला खतपाणी घालणारा दुसरा घटक ठरला. तिसरीकडे, 'शहर' अथवा 'नागरी विभाग' या संकल्पनेच्या व्याख्येमध्ये व निकषांमध्येदेखील चिनी शासनकर्त्यांनी बदल घडवून आणल्यामुळेसुद्धा चीनमधील नागरीकरणाचा वेग एकदम वधारला.

...आणि २०१२-१३ सालापासून सपाटा चालू झाला तो ग्रामीण चीनमधील खेडीपाडी, शेतजमिनी, देवळे, सार्वजनिक वापराच्या इमारती यांवर सरसहा वरवंटा फिरवून त्यांचे रूपांतर शहरांमध्ये घडवून आणण्याचा. या सगळ्यांतून चिनी बांधकाम क्षेत्राची जोरदार भरभराट चालू झाली. ही घोडदौड जवळपास २०१९-२० सालापर्यंत चालू होती. अर्थात, या साऱ्या कृत्रिम नागरी वाढविस्ताराची किंमतही, दुसरीकडे, जाणवू लागली. नवनागरी विभागांची निर्मिती करण्यासाठी लागवडीखालील अथवा वस्तीखालील ग्रामीण जमिनींचे अधिग्रहण करण्याचे धोरण चिनी शासनसंस्थेने राबवले. त्यांतून अधिग्रहित जमिनींच्या मोबदल्यासंदर्भातील अनेकानेक खेकटे उभी ठाकली. ग्रामीणांमध्ये तसेच शेतकऱ्यांमध्ये तशा सक्तीच्या अधिग्रहणाबाबत धुमसत असलेल्या असंतोषाला नानाविध सामाजिक उद्रेकांच्या रूपाने तोंड फुटू लागले. चिनी राज्यकर्त्यांनी राबविलेल्या सक्तीच्या नागरी वाढविस्ताराची जी किंमत चिनी समाजावर लादली जाऊ लागली त्याचे हे सारे ठरत राहिले सामाजिक परिमाण.

सैद्धान्तिक पातळीवर हे सगळे गोमटे-गोजिरे दिसत असले तरी या संक्रमणकाळात चिनी ग्रामीणांना नाना प्रकारच्या दिव्यांना सामोरे जाणे भाग पडत राहिले. मुख्य समस्या उभी राहिली ती, अर्थशास्त्रात जिला 'संरचनात्मक बेरोजगारी' असे संबोधले जाते त्या बेरोजगारीची. खेड्यांमधून चिनी ग्रामीणांना शहरांमध्ये स्थानांतर करणे शासनसंस्थेने सक्तीने भाग पाडले. सगळे आयुष्य शेतकामामध्ये घालवलेल्या चिनी ग्रामीणांना शहरी उद्योगक्षेत्रांतील बिगर शेती रोजगारसंधी पदरात पाडून घेणे दुरापास्त ठरू लागले. कारण, शहरी उद्योगव्यवसायांमध्ये रोजीरोटी कमविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या कौशल्यांची त्यांच्यापाशी वानवा होती. संपादन केलेल्या जमिनींच्या बदल्यात शासनसंस्थेने अदा केलेली मोबदला रक्कम सरल्यानंतर उपजीविकेचे काय करायचे, हा प्रश्न त्यांच्या पुढ्यात उभा ठाकला. ज्या ग्रामीण तरूणांना शहरी

नोकऱ्या लाभल्या त्यांची गुजराण चालू झाली. परंतु, जे चिनी ग्रामीण तरूण शहरी रोजगारक्षेत्रात सामावून घेतले गेले नाहीत त्यांच्यावर कठीण परिस्थिती ओढवली. विशेषत:, मध्यमवयीन चिनी ग्रामीणांची स्थिती अधिकच दोलायमान बनली. वयाची पन्नाशी ओलांडलेल्या अथवा पन्नाशीच्या उंबरठ्यावर येऊन ठेपलेल्या श्रमिकांना कामावर घेण्यास उद्योगव्यवसाय फारसे उत्सुक नसायचे. तुलनेने तरूण श्रमिकांची उत्पादकता सरासरीने अधिक असल्यामुळे तरूण होतकरूंना कामावर ठेवण्याकडे व्यवसायसंस्थांचा कल राहिल्याने प्रौढ श्रमिकांना आर्थिक ओढगस्तीचा सामना करणे भाग पडत राहिले. कृत्रिमरीत्या चालना दिलेल्या शहरीकरणाच्या प्रारूपाची चिनी समाजाला जी किंमत चुकती करावी लागली तिचे हे ठरले आर्थिक परिमाण.

आर्थिक विकासविषयक या धोरणदृष्टीचा प्रतिकूल असर चिनी शासनसंस्थेच्या वित्तीय प्रकृतीवरदेखील यथावकाश जाणवू लागला. खेडी सपाट करून तिथे शहरांची उभारणी नव्याने करण्यासाठी शासकीय तिजोरी खुली करणे भाग होते. शहरी पायाभूत सेवासुविधा, इस्पितळे, शाळा यांची उभारणी करण्यासाठी शासकीय खर्चाचे भरभक्कम इंजेक्शन अपरिहार्यच होते. संपादन केलेल्या जमिनींचे मोबदले, शेतीवरून सक्तीने हटवलेल्या ग्रामीणांना अर्थसाहाय्य, निवृत्तिवेतने यांसारखे पर्यायदेखील शासकीय तिजोरीवरील बोजा वाढवत राहिले. शहरे निर्माण करण्यासाठी ज्यांच्या जमिनी सक्तीने अधिग्रहित करण्यात आल्या त्यांना ठोस मोबदल्याखेरीज त्यांच्याकडून संपादन केलेल्या जमिनींवर उभ्या राहणाऱ्या प्रकल्पांमध्ये संबंधित भूधारकांना भागधारक म्हणून सामावून घेण्याचे धोरण चिनी राज्यकर्त्यांनी पुनर्वसनाचा एक आयाम म्हणून स्वीकारले. त्यांद्वारे, शेतीला मुकलेल्या ग्रामीणांना लाभांशाच्या रूपाने उत्पन्नाचा एक स्थिर व हमीदार प्रवाह खुला होईल, ही त्यामागील भूमिका राहिली. नव्याने वसवलेल्या शहरांमध्ये निर्माण होणाऱ्या रोजगारसंधी मिळाल्या की शहरांमध्ये पुनर्वसन करण्यात आलेल्या ग्रामीणांच्या हातांना कामे मिळून यथावकाश पगारपाण्याद्वारे त्यांना उत्पन मिळणे चालू होण्याबरोबरच शासनसंस्थेलादेखील करांद्वारे उत्पन्न मिळून तिजोरीतील खड्डा भरून काढणे सुकर ठरू शकेल, असाही विचार या साऱ्या प्रारूपाच्या मुळाशी राहिला.

चीनमध्ये १९९४ साली जारी करण्यात आलेल्या करमहसुलाच्या वाटपासंदर्भातील व्यवस्थात्मक बदलांमुळे चिनी नागरीकरणाच्या प्रक्रियेला एक नवीनच परिमाण जोडले गेले. चीनमधील केंद्रीय सत्ता आणि प्रादेशिक सत्ता यांच्यादरम्यानच्या महसूलवाटपाचे सूत्र १९९४ साली चिनी प्रशासकांनी बदलले. नवीन व्यवस्थेनुसार,

संकलित करमहसुलाचा मोठा हिस्सा केंद्रीय सत्तेकडे वळवला गेला. एकंदर महसुलातील केंद्रीय सत्तेचा पूर्वी असणारा २२ टक्क्यांचा वाटा, या बदलाद्वारे जाऊन पोहोचला थेट ५६ टक्क्यांवर. साहजिकच, प्रादेशिक सत्तांच्या वाट्याला येणारा महसूलस्रोत त्यांपायी रोडावला. मात्र, त्यांच्याकडे सुपूर्त करण्यात आलेल्या जबाबदाऱ्या त्याच व तेवढ्याच राहिल्या. परिणामी प्रांतिक सत्तांचे अर्थचित्र पुरते विस्कटले. आपल्या अखत्यारीतील प्रांतांमध्ये मूलभूत स्वरूपाच्या पायाभूत सेवासुविधा व नागरी सोयी पुरवणे त्यांना दुष्कर बनू लागले. या सगळ्याची भरपाई म्हणूनही असेल कदाचित पण, प्रांतिक सरकारांच्या उत्पन्नाध्ये निर्माण झालेली खोट भरून काढण्यासाठी आपल्या अखत्यारीत असणाऱ्या जमिनींचा विनियोग उत्पन्नाचे हमखास साधन म्हणून करण्याबाबतचे अधिकार भू-व्यवस्थापन कायद्यातील अनुरूप बदलांद्वारे चिनी प्रादेशिक सत्तांना बहाल करण्याचे धोरणात्मक पाऊल १९९४ साली उचलले गेले. जमीनवापराचे हक्क खासगी विकसकांना भाडेपट्ट्याने देऊन निधी उभारण्याची अनुमतीवजा एकाधिकारशाही समकक्ष सक्षमता भू-व्यवस्थापन कायद्यांतील सुधारणांद्वारे प्रांतिक शासनसंस्थांना प्रदान करण्यात आली. चीनमधील बांधकाम क्षेत्रामध्ये १९९८ साली लागू करण्यात आलेल्या सुधारणांपायी निवासी घरांना असणारी मागणीही वाढू लागली. बांधकाम क्षेत्राच्या विस्तारास हातभार लावण्याच्या दृष्टीने अनुकूल वित्तीय धोरणांचा टेकूही पुरविण्यात आला. वित्तीय सवलतींची प्रेरके, जमीन व्यवस्थापनाचे हक्क आणि निम्नस्तरीय प्रांतिक शासनांच्या कार्यक्षमता जोखण्याची उतरंडप्रधान मूल्यमापनप्रणाली यांपायी अधिकाधिक जमीन नागरी वाढविकासाकरिता खासगी विकसकांना भाडेपट्ट्याने उपलब्ध करून देत बख्खळ उत्पन्न गाठीशी बांधण्याची जणू काही एक प्रकारची स्पर्धाच चीनमधील प्रांतिक शासनसंस्थांमधील अधिकारपदस्थांमध्ये चालू झाली. शहरी जमिनींची वाढती मागणी आणि त्यांपायी चढणाऱ्या किमती पाहून प्रांतिक सत्तांनी त्यांच्यापाशी असणाऱ्या जमिनी व्यापारी तत्त्वांवर भाडेपट्ट्याने देऊन महसुलातील खड्डा भरून काढण्याचा पर्याय सरसहा अवलंबला. लहानमोठ्या शहरांमध्ये सक्रिय असणाऱ्या विकेंद्रित ग्रामोद्योगांच्या माध्यमातून महसूलवृद्धी साध्य करण्याऐवजी, जमीनविषयक व्यवहारांद्वारे तिजोरीला बाळसे प्राप्त करून देण्याचा पर्याय चिनी प्रांतिक सरकारांनी मग धडाक्याने अंगीकारला. एका अभ्यासानुसार, या मार्गाने मिळणाऱ्या उत्पन्नाचे चीनमधील प्रांतिक सरकारांच्या एकंदर महसुलातील सरासरी प्रमाण २०२१ सालादरम्यान ४९ टक्क्यांवर जाऊन पोहोचले.

अर्थातच, या कार्यपद्धतीचे तोटेही दृग्गोचर होऊ लागले. प्रांतिक सरकारांची एकंदरच महसूलव्यवस्था अस्थिर बनणे, हा या सगळ्यांतील सर्वांत मोठा तोटा गणावयास हवा. मुळात, आपल्या अखत्यारीतील जमीन हाच महसुलाचा प्रधान स्रोत समजून त्याचा विनियोग करण्यास प्रांतिक सरकारांनी सुरुवात केल्यामुळे जमिनीचा विधिनिषेधशून्य वापर आपसूकच साकारला. भू-वापराच्या विविध पर्यायांमध्ये, एरवी, बाजारपेठीय मागणी व पुरवठ्याच्या समीकरणांनुसार केले जाणारे अथवा होणारे वितरण शासनसंस्थेच्या हस्तक्षेपापायी खंडित होणे, ही या कार्यपद्धतीमधील सगळ्यांत कळीची उणीव.

अशा कार्यपद्धतीद्वारे साकारणारे भू-वाटप व त्यांतून निजपणारा भू-वापर हा पर्याप्त शाबीत न व्हावा, याचे मग काहीच आश्चर्य नाही. शहरीकरणाखाली आणलेल्या भूप्रदेशात शहरे वसवण्यासाठी ज्या पायाभूत सेवासुविधा पुरवणे अत्यावश्यक होते त्यांच्या निर्मितीसाठी चिनी प्रांतिक सरकारांनी कर्जरोख्यांद्वारे जोमदार कर्जे घेण्याचा सपाटा समांतर चालू केला. त्यांतून, प्रांतिक सरकारांच्या माथ्यावरील कर्जांचा बोजा फुगण्यास सुरुवात झाली. तिसरे, म्हणजे जमिनींच्या उपलब्धतेनुसार प्रांताप्रांतांमधील शासनसंस्थांच्या महसूल उभारणी क्षमतेमध्ये तफावत सक्रिय बनून त्यांद्वारे एक नवाच असमतोल चीनच्या प्रांतोप्रांती बळावू लागला. कोणत्याही देशात कोणत्याही काळात जमिनीचा पुरवठा मर्यादितच असतो. बांधकामांसाठी जमिनींना असणारी मागणी जितकी व जशी लवचीक असते तितका जमिनीचा पुरवठा, निदान 'शॉर्ट टर्म'मध्ये तरी, लवचीक बनू शकत नाही. त्यांपायी जमिनींच्या बाजारपेठांत जमिनींच्या किमतींमध्ये तात्कालीक फुगवटे निर्माण होतात. चौथे म्हणजे, मुदलात जमिनींची खुली बाजारपेठ कार्यान्वितच नसल्याने प्रांतिक शासनसंस्था आणि खासगी विकसक यांच्यादरम्यान होणाऱ्या जमीनविषयक व्यवहारांमध्ये नाना प्रकारच्या अनियमितता घडाव्यात हेदेखील ओघानेच आले. या सगळ्या प्रक्रियेत, अधिकाधिक जमीन विकसकांकडे भाडेतत्वांवर हस्तांतरित करण्याच्या असोशीपायी पिकांखालील उपजाऊ जमिनी प्रांतिक सरकारे संपादन करून बिगर शेती वापराकडे वळवू लागले. यांतून लागवडीखालील क्षेत्रामध्ये सातत्याने व झपाट्याने घट चालू होऊन त्याचा फटका यथावकाश चीनमधील अन्नसुरक्षेला बसण्याचा धोका बळावू लागला. तिसरीकडे, शेतकऱ्यांकडून त्यांच्या वहितीखालील जमिनी बळाने संपादन करण्याच्या प्रांतिक शासकांच्या खाक्यापायी शेतकरी वर्ग आणि स्थानिक शासनसंस्था यांच्यादरम्यान संघर्षाचे प्रसंग वारंवार उद्भवून त्यांपायी एकंदर सामाजिक शांतता व स्थैर्यही धोक्यात येऊ लागले. शहरी वाढविस्तारासाठी जमिनींचे संपादन करण्याचा

उपक्रम सुरू केलेल्या शासनसंस्थेशी संपादित क्षेत्रांचा मोबदला मिळण्यासंदर्भातील व्यावहारिक वाटाघाटी करण्याचा पर्यायही शेतकऱ्यांना चीनमध्ये उपलब्ध नसल्याने चिनी शेतकऱ्यांच्या धुमसत्या असंतोषाला अधिकच खतपाणी मिळत राहिले.

जोपर्यंत सगळे काही सुरळीत चालू होते तोवर हे सगळे असंतोष, निर्माण झालेले असमतोल धकून गेले मात्र 'कोविड-१९'चा फेरा आला आणि सगळे चित्रच एकदम पालटले. सगळ्यांच पातळीवरील बाजारपेठा ठप्प झाल्या. बेकारी आणि अर्धबेकारी एकदम सर्वत्रच वाढली. सर्वसाधारण क्रयशक्ती प्रचंड घटली. त्याचा परिणाम मागणीवर झाला. जी काही पुंजी हाताशी होती ती जपून वापरण्याकडे सर्वसामान्यांचा कल झपाट्याने वळला. या सगळ्याचा तीव्र फटका बसला तो चीनमधील बांधकामक्षेत्राला. घरांची मागणी एकदम घसरली. परिणामी, नरम मागणी आणि तिच्या सापेक्ष अतिरिक्त पुरवठा अशी परिस्थिती घरांच्या बाजारपेठेत निर्माण झाली. बांधकामाच्या क्षेत्रात धडाक्याने गुंतवणूक केलेल्या विकसकांच्या पुढ्यात कसर लागलेल्या मागणीपायी समस्या उभ्या ठाकल्या. सदनिकांची विक्रीच बाधित झाल्याने विकसकांनी वित्तसंस्थांकडून उचललेल्या कर्जांची देणी थकू लागली. शहरीकरणाचा वेग भविष्यात असाच अप्रतिहत वाढत राहील, अशा अंदाजाने जमिनी भाडेपट्ट्याने देऊन महसूल गोळा करणाऱ्या चिनी प्रांतिक सत्ताही या परिस्थितीमुळे अडचणीत आल्या. घरांची मागणीच मंदावल्याने नवीन बांधकामे कागदावरच राहू लागली. जमिनींना असणारी मागणी साहजिकच मंदावली. जमिनींच्या भाडेपट्ट्यांचा महसूल सतत मिळत राहील या अपेक्षेने क्षमतेपलीकडे कर्जे उभारलेली चिनी प्रांतिक सरकारे त्यांमुळे आजघडीला डोईजड कर्जांच्या भाराखाली आहेत. ही परिस्थिती हाताबाहेर जाईल याचा अंदाज आल्यानंतर चिनी केंद्रीय नेतृत्वाने प्रांतिक सरकारांना नव्याने कर्जरोखे उभारण्यास मनाई करण्याचे पाऊल उचलले.

आजघडीचा चीन या साऱ्या समस्यांचा सामना करतो आहे. १९७८-७९ सालापासून अवलंबलेल्या निर्यातप्रधान विकासाच्या प्रारूपाची उपयुक्तता बदलत्या काळानुसार आता ओसरल्याने देशी मागणीवर तोललेले विकासाचे 'मॉडेल' साकारण्यासाठी २०१०-११ सालापासून चीन धडपडतो आहे. आर्थिक विकासासाठी अवलंबलेल्या पर्यायांचा अवलंब केल्यानंतर अनपेक्षित अशा काही निसर्गदत्त व मानवनिर्मित अकल्पित घटनांपायी आर्थिक प्रगतीबरोबरच एकंदर सामाजिक स्वास्थ्यासंदर्भात कशा प्रकारच्या दुर्धर अडचणी उद्भवू शकतात, याचा काही एक अदमास या चिनी चित्रावरून यावा. ■■

# परराष्ट्रधोरण

## चिनी परराष्ट्र धोरणातील वाक्वळणे

कोणत्याही व्यक्तीचे जगाशी अथवा समाजाशी कशा प्रकारचे नाते जोडले जाते ते दोन बाबींवर अवलंबून राहते. त्या व्यक्तीची 'स्व'बद्दलची धारणा अथवा कल्पना नेमकी कशी आहे, हा ठरतो या संदर्भात सर्वांत कळीचा मुद्दा अथवा पैलू. त्याला कारणही तसेच आहे. स्वत:बद्दलची त्या त्या व्यक्तीची नेमकी जी काही कल्पना असेल ती तिच्या वागण्याबोलण्यातून बाहेरच्या जगात उमटत राहते. साहजिकच, बाह्य जग त्यानुसार त्या व्यक्तीला प्रतिसाद देत राहते. व्यष्टी आणि समष्टीच्या नात्याचा पोत निश्चित करणारी ही ठरते दुसरी बाब. आणि या अशा देवाणघेवाणीद्वारेच आपल्या आणि जगाच्या नातेसंबंधांचा गोफ विणला जातो. जो न्याय व्यक्तीला तोच न्याय एखाद्या देशालाही लागू पडतो. 'जे पिंडी ते ब्रह्मांडी', ही मराठी भाषेतील म्हण म्हणजे त्याच वास्तवाचा उच्चार. आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाला १९७८-७९ पासून सुरु वात केलेल्या चीनच्या परराष्ट्रविषयक धोरणामध्ये आजवर साकारत आलेल्या वाकवळणांनाही हेच सूत्र लागू पडते. चीनची स्वत:बद्दलची, चिनी नागरिकांची आपल्या देशाबद्दलची आणि या दोहोंचीही भवतालातील जगाबद्दलची जाण अथवा आकलन आजवरच्या प्रवासादरम्यान विविध टप्प्यांवर बदलत गेलेले दिसते. त्या त्या वळणावर चीनचे स्वत:बद्दलचे आणि पर्यायाने जगाबद्दलचे बदललेले भान त्याच्या परराष्ट्रधोरणामध्ये प्रतिबिंबित होत आलेले आहे. त्या वाकवळणांचा मागोवा घेणे मोठे उद्बोधक शाबीत होते.

त्यासाठी सुरुवात करावयास हवी ती चीनची स्वत:बद्दलची प्रतिमा कशी होती इथपासूनच. त्यासाठी डोकवून बघावयास हवे ते सुदूर भूतकाळात. सर्वसाधारण चिनी नागरिक आणि पर्यायाने चिनी समाज स्वभावत:च परंपराप्रिय आहे. जगाबद्दल आणि या जगराहाटीमध्ये चिनी समाज व चीन हे राष्ट्र यांच्या स्थानाबद्दलदेखील चिनी नागरिकांच्या पूर्वापार घडत आलेल्या आणि परिणामत: घट्ट बनलेल्या काही

श्रद्धा आहेत. त्या धारणाश्रद्धांच्या चष्म्यातूनच सर्वसामान्य चिनी नागरिक जगाचे व जगाबरोबर चीनच्या असलेल्या नात्यांचे विश्लेषण करत राहतो, आजवर करत आलेला आहे.

चीनमधील सांस्कृतिक क्रांतीचे उद्‌गाते आणि प्रवर्तक गणल्या जाणाऱ्या माओ यांच्यानंतर चिनी सत्तेची सूत्रे आली डेंग यांच्याकडे. चीनमध्ये १९६६ ते १९७६ अशी दहा वर्षे सांस्कृतिक क्रांतीचा माहौल गाजला. माओ यांच्या प्रेरणेने सर्वसामान्य चिनी जनतेने चिनी कम्युनिस्ट पक्षाविरुद्ध केलेल्या त्या उठावास 'सांस्कृतिक क्रांती' असे जरी संबोधण्यात येत असले तरी प्रत्यक्षात तो होता तीव्रतर असा पक्षांतर्गत सत्तासंघर्ष. आपल्या नेतृत्वावर कोणतीही आच येऊ नये, या हेतूने माओ यांनी सांस्कृतिक क्रांतीचे ऐलान केले आणि जुन्या प्रथा, पुराण्या संकल्पना, कालबाह्य संस्कृती आणि जुनाट सवयी मोडून काढण्याच्या नावाखाली कम्युनिस्ट पक्षातील आपल्या विरोधकांवर कुरघोडी करण्याचा प्रयत्न निकराने मांडला. १९५०च्या दशकात चीनमध्ये अवतरलेल्या भयाण दुष्काळापायी सत्तेवरील सैल झालेली आपली मांड पुनश्च एकवार बळकट करण्याचा माओ यांचा मनसुबा त्या उलाढालीच्या मुळाशी होता. मात्र, दशकभराच्या त्या अस्वस्थ, अस्थिर पर्वाची जबर किंमत चिनी जनता आणि चिनी अर्थव्यवस्था अशा दोघांनाही मोजावी लागली. चिनी अर्थव्यवस्था प्रचंड प्रमाणावर भरडून निघाली आणि सर्वसाधारण विकासाच्याबाबतीत चीन जवळपास दोन दशके मागे रेटला गेला.

माओ यांच्या १९७६ साली झालेल्या निधनानंतर चिनी सर्वोच्च सत्तेची सूत्रे हाती घेतलेल्या डेंग यांच्या पुढ्यात, साहजिकच, बिकट आव्हान होते ते चीनची पुरती विस्कटलेली घडी पूर्ववत सावरण्याचे. त्यांमुळे, डेंग यांनी त्यांच्या साऱ्या प्रयत्नांचा आणि धोरणांचा भर एकवटला तो चीनच्या अंतर्गत पुनर्बांधणीवर. त्या लक्ष्यपासून नजर भरकटू नये यासाठी देशांतर्गत वा देशाच्या सीमांबाहेर कोणत्याही प्रकारचे नवे तंटेबखेडे उद्‌भवू नयेत याला डेंग यांनी सर्वोच्च प्राधान्य दिले. चिनी अर्थव्यवस्था आणि सर्वसाधारण चिनी नागरिक यांच्या सर्वंकष सक्षमीकरणाला डेंग यांनी सर्वाधिक प्राधान्य दिले. कारभाराचा, 'आपण बरे आणि आपले काम बरे', असा सावध पवित्रा अंगीकारत डेंग यांनी, कोणताही गाजावाजा न करता चीनच्या पुनरुत्थानासाठी कंबर कसली. कवचाखाली आपली सारी गात्रे आवरून घेणाऱ्या कासवासारखा चीन डेंग यांच्या कारकिर्दीदरम्यान, बाह्य जगापासून शक्यतो अलिप्त राहात आपल्या क्षमतांचे संवर्धन-संगोपन विनाविघ्न करण्यात मग्न राहिला.

**अपौरू षेय आणि म्हणून अनादी अस्तित्व**

चीन नावाचे एक घटित निसर्गसिद्ध न्यायाने अनादी काळापासून नांदत आलेले आहे, अशी खुद्द चिनी समाजाची पूर्वापारची धारणा आहे. या धारणेपायी, चिनी नागरिकांच्या पिढ्यांचे भूतकाळाशी असलेले नाते विलक्षण आहे. गतकाळाशी चिनी समाज सर्वतोपरी घट्ट नाळेने आजही जोडलेला दिसतो. साहजिकच, वर्तमान आणि अतीत यांच्या सरमिसळीद्वारे प्रचलीत समस्या व आव्हानांचे आकलन करून घेत त्यांद्वारे तशाच संमिश्र पद्धतीने तोडगा शोधून प्रतिसाद देण्याची मानसिकता हे चिनी धोरणांचे असाधारण वैशिष्ठ्य राहिलेले आहे. देशी-विदेशी स्तरावर निर्माण होणाऱ्या समकालीन प्रश्नांना उत्तरे शोधतानादेखील, तशाच प्रकारच्या समस्यांवर सुदूर भूतकाळात कशा प्रकारचे तोडगे योजलेले होते त्याचे संदर्भ ध्यानी घेत आवश्यक ती उपाययोजना करण्याची मानसिकता चिनी धोरणकर्ते आजही जपताना दिसतात. सनातन तत्वांशी असलेली बांधिलकी जपणे, हा चिनी भावविश्वाचा विशेष होय. साहजिकच, भूतकाळ आणि वर्तमान यांच्यादरम्यान सलगतेचा सदृढ प्रवाह चिनी व्यवहारांत वाहत राहिलेला आहे.

'चीन' या नावाने निर्देशित केल्या जाणाऱ्या राष्ट्र-राज्याबद्दलच्या एकंदर लोकभावनादेखील वैशिष्ठ्यपूर्णच दिसतात. राष्ट्र-राज्य या संकल्पनांच्या अर्थांचे आधुनिक आयाम चीनच्यासंदर्भात थिटे ठरतात असेच केवळ नाही तर ते ठरतात अ-प्रस्तुतही. जगातील विविध राष्ट्रांच्या संदर्भात त्यांचा उगम, उत्कर्ष, अपकर्ष, जीवनप्रवासातील चढउतार... यांसारख्या काही पैलूंचा मागोवा बऱ्यापैकी घेता येतो. चीन मात्र याला अपवाद आहे. चीनचे अस्तित्व अज्ञात आणि अनादी आहे, अशी धारणा चिनी समाजाने शतकानुशतके जपलेली आहे. या अर्थाने चीन स्वयंभू व स्वयंसिद्ध आहे. त्याचा कोणीही निर्माता नाही, हीच बाब शतकानुशतके प्रत्येक पिढीला आजवर पढवली गेलेली आहे. चिनी समाज आणि पर्यायाने चीन हे राष्ट्र आजवर उत्कर्षापकर्षांच्या लाटांवर हिंदोळे खात, त्या चढउतारांचे आनषंगिक धक्के पचवतच इथवर आलेले आहे, या वास्तवाच्या खाणाखुणा सापडतात. परंतु, चीनचा जनक अथवा संस्थापक कोण, हे मात्र कोठेच नमूद नाही. भारतीय परिभाषेचा वापर करावयाचा झाला तर मग चीनला 'अपौरूषेय' हे बिरूद प्रस्तुत अथवा योग्य ठरावे. उन्नतीच्या शिखरावरून काळाच्या ओघात अवनतीच्या गर्तेमध्ये लोटल्या गेलेल्या चीनला, त्याच्या प्रवासाच्या विविध टप्प्यांवर, ज्यांनी ज्यांनी सावरले त्यांचे तपशील चिनी इतिहासात गवसतात. कारणपरत्वे प्रसंगवशात ढासळलेल्या चीनचे पुनर्निर्माण

अथवा पुनरुत्थान साध्य करणाऱ्यांचे नावनिशीवार संदर्भ गवसतात. परंतु, चीनचा संस्थापक कोण, हा प्रश्न मात्र आजवर अनुत्तरीतच राहिलेला आहे.

अनादिसिद्ध अस्तित्वाप्रमाणेच वैश्विक व्यवस्थेतील चीनचे स्थानदेखील त्याच्या उगमापासूनच अ-साधारण गणले गेलेले दिसते. प्रत्येक काळातील उतरंडप्रधान अशा वैश्विक राजकीय व्यवस्थेच्या शीर्षस्थानी विराजमान होण्याचा जणू अ-लिखित ताम्रपटच चिनी सम्राटाला बहाल करण्यात आलेला दिसतो. खुद्द चिनी सम्राटांचीच तशी भावना राहिल्याचे चीनचा इतिहास सांगतो. केवळ इतकेच नाही तर, चीनच्या परिसरातील राजवटींनी चिनी सम्राटांचे सार्वभौम वर्चस्व निसर्गदत्त म्हणून मान्य केल्याचेही दाखले दिले जातात. भवतालातील राजवटींनी चिनी सम्राटाचे प्रभुत्व विनातक्रार मान्य करावे असा व इतका व्यापक दबदबा चीनने प्रदीर्घ काळ प्रचंड भू-भागावर गाजवल्याचे इतिहास सांगतो. चिनी साम्राज्यात प्रविष्ट होणाऱ्या, झालेल्या अथवा सामील करून घेतलेल्या राजवटी स्वत:ला चीनचे मांडलिक समजण्यात धन्यता मानत. चिनी भाषा, रीतीरिवाज, संस्कृती यांचा अंगीकारदेखील मांडलिक राजसत्ता मग क्रमाने करत राहात.

एकसंध चीनचा उदय ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकात झाल्यापासून ते क्विंग राजवटीचे पतन थेट १९१२ साली होईपर्यंत संपूर्ण पूर्व आशियाई वैश्विक व्यवस्थेच्या केंद्रस्थानी चीन अढळ होता. 'चीन'नामक राष्ट्र-राज्य अनादी, अनंत आणि म्हणून चिरंजीव असल्याची जी एक व्यापक धारणा पूर्वापार नांदत आलेली आहे तिचाच हा एक परिपाक. किंबहुना, चीन हा उभ्या विश्वाचे केंद्र असून चीनकेंद्री वैश्विक व्यवस्था अनादी काळापासून अस्तित्वात असल्याची प्रबळ धारणा चिनी मानसिकतेमध्ये खोलवर रु जलेली आहे आणि आजवरच्या यच्चयावत सगळ्या चिनी पिढ्यांनी ती मनोमन जपलेलीदेखील आहे. गंमत म्हणजे, 'चीन' या संज्ञेचा चिनी भाषेतील अर्थच मुळात, 'मध्यवर्ती राज्यसत्ता' (मिडल् किंग्डम) अथवा 'मध्यवर्ती राष्ट्र' असा आहे!

चीन हे चिरंतन असे नैसर्गिक घटित होय, अशीच धारणा आजवर सातत्याने परिपुष्ट बनवत जपली गेलेली आहे. आजही ती तशीच आहे. पृथ्वी, त्यावरील मानवसमूह आणि अंतरिक्षातील सर्वशक्तिमान व सर्वश्रेष्ठ अशी देवसत्ता यांच्यादरम्यानचा सेतू अथवा मध्यस्थ म्हणून चिनी सम्राट ईश्वरी संकेतानुसार कामकाज करत असतो, अशी श्रद्धावजा धारणा चिनी मन प्राचीन काळापासून जपत आलेले आहे. त्यांमुळे, चीनकेंद्री अखिल विश्वातील सर्व देश व तेथील राज्यकर्ते चिनी

सम्राटाचे अंकित होत, हाच भाव चिनी मानसिकतेमध्ये पूर्वापार दृढ झालेला आहे. ईश्वरी संकेतानुसार कार्यरत असलेला चिनी सम्राट आणि चिनी समाज हा निसर्गत:च सर्वश्रेष्ठ असल्यामुळे त्याचे पृथ्वीवरील अन्य समाजांशी बरोबरीच्या नात्याने व्यवहार स्वरूपत:च असंभव ठरतात, हे मग स्वयंसिद्ध गृहीतक प्रस्थापित होते. चिनी समाज वगळता अन्य समाज हे उत्क्रांतीच्या निम्न स्तरावरच नांदत असून चिनी भाषा व चिनी संस्कृती यांच्या सिंचनाद्वारे अशा ‘रानटी’ लोकसमूहांचा ‘उद्धार’ करण्याचे उत्तरदायित्व चीनवर आहे, असाच श्रद्धाधारित आविर्भाव चिनी विचारविश्वात अनादी काळापासून नांदत आला. सर्वश्रेष्ठत्वाची जाणीव चिरकालीक बनल्याचा एक स्वाभाविक परिणाम असा झाला की, बाहेरील विश्वात काय चालू आहे, अन्य देश व अन्य मानवसमूह किती, कसे व केव्हा झपाट्याने बदलले अथवा पुढे गेले या बाबी चिनी राज्यकर्ते आणि चिनी समाज या दोघांच्या खिजगणतीतही नव्हत्या.

‘परराष्ट्रीय संबंध’ या एका विशाल आणि विलक्षण गुंतागुंतीच्या प्रांतासंदर्भातील काही एका सुसंघटित, मूलभूत आकलनाची रुजवण पश्चिमी राष्ट्रांच्या विचारविश्वात घडून आली ती १६व्या-१७व्या शतकादरम्यान. ते पर्व होते युरोप खंडाचे रंगरू प पालटण्याचे. सामर्थ्याच्या दृष्टीने जवळपास समपातळीवर असलेल्या स्वायत्त, स्वतंत्र व सार्वभौम अशा राष्ट्रांची निर्मिती त्या पर्वादरम्यान युरोपभरात साकारली. सर्वशक्तिमान या कोटीत गणले जाण्यासारखे त्या राष्ट्रमेळात कोणीच नव्हते. त्यांमुळे सर्वशक्तिमान सत्ताकेंद्राचे सार्वभौमत्व मान्य करू न त्याचे अंकित बनून अन्य राष्ट्रांनी राहणे यांसारख्या बाबी त्या वास्तवात अप्रस्तुत ठरल्या म्हणण्यापेक्षाही तिथे कधी उद्‌भवल्याच नाहीत. विविध स्वायत्त राष्ट्रांच्या साहचर्याद्वारे अस्तित्वात आलेला सत्तातोल सांभाळत राहणे हेच, त्यांमुळे आपसूकच, तत्कालीन परराष्ट्रीय संबंधांचे गमक प्रस्थापित झाले. त्यांतूनच, प्रत्येक राष्ट्र हे स्वतंत्र, स्वायत्त आणि सार्वभौम असण्याबरोबरच न्यायिकदृष्ट्या सर्व राष्ट्रे समान होत, ही धारणा परराष्ट्रीय संबंधांचे अधिष्ठान साहजिकच ठरली. याच्याबरोबर उलटे चित्र नांदत होते व राहिले चीनच्याबाबतीत. चीनच्या समतुल्य संस्कृती व आकारमान असणाऱ्या एकाही शक्तीशी तिथवर चिनी सम्राटांचा संबंध कधीच आलेला नव्हता. त्यांमुळे, किमान समतेच्या पायावर अन्य देशांशी व्यवहार करण्याची कार्यपद्धती चीनच्या गावीदेखील त्या वेळी नव्हती. चिनी साम्राज्याचे त्याच्या अंमलाखालील भूप्रदेशावर नांदणारे स्वामित्व हा जणू काही निसर्गदत्त न्याय अथवा कायदाच होय, अशी चिनी समाज आणि चिनी राज्यकर्ते यांची पक्की धारणा होती. चिनी सम्राटांचे चीनच्या अंकित असणाऱ्या प्रदेशावरील प्रभुत्व ही जणू

स्वर्गातील दैवी सत्तेने सम्राटाकडे सुपूर्त केलेली जबाबदारीच होय, अशी चिनी समाजाची व्यापक धारणा त्या सगळ्या पर्वात दृढपणे नांदत होती. साहजिकच, चीनचे सार्वभौमत्व हे सर्वोच्च होय, ही जाणीव चिनी मानसिकतेमध्ये सखोल रुजल्यामुळे एक प्रकारची प्रगाढ आत्ममग्नता चिनी भावविश्वात व्यापक स्तरावर रुजलेली राहिली.

एवढी प्रगाढ आत्ममग्नता जोपासल्यामुळे बाहेरील जगाशी व्यापारी संबंध प्रस्थापित करण्याची आवश्यकताच चिनी सम्राटांना कधी भासलीच नाही. साहजिकच, जगातील अन्य देशांबरोबर कोणत्याही स्वरूपाचे राजनैतिक संबंध निर्माण करण्याकडेही चिनी सत्ताधीशांचा कल प्रदीर्घ काळ जवळपास नव्हताच. असलाच तर चीनबाहेरील 'असंस्कृत', 'रानटी' समाजांचे उन्नयन घडवून आणण्याची दैवदत्त जबाबदारी चीनची आहे, याच भूमिकेतून चिनी सत्ताधीश, प्रसंग येईल तेव्हा, जगातील अन्य देशांबरोबर वागत राहिले. चीनच्या सार्वभौमत्वाचा विनातक्रार स्वीकार आणि चिनी संस्कृतीचा अंगीकार परिसरातील जे देश ज्या प्रमाणात करतील त्या प्रमाणात त्यांच्याबरोबर संबंध राखण्याची चिनी सत्ताधीशांची कार्यपद्धती याच मानसिकतेची फलश्रुती ठरली. परराष्ट्रांबरोबरील चीनच्या नातेसंबंधांची चौकट याच साऱ्या मानसिकतेद्वारे प्रगट होत राहिली. चीनच्या सीमावर्ती प्रदेशातील, चिनी समाजाच्या लेखी गणल्या जाणाऱ्या 'रानटी' जनसमूहांची सत्ता, त्यांच्या त्यांच्या परीघात नांदत असे. प्रसंगी, चीनच्या अंतर्भागातदेखील, जमेल तेव्हा, घुसखोरी करण्याचा त्यांचा उद्योग राजरोस चालत राही. या समूहांना लष्करी शक्तीच्या बळावर काबूत ठेवणे चिनी सम्राटांना कधीच पूर्णतया शक्य बनले नाही. या डोकेदुखीपायीच साम्राज्याच्या रक्षणासाठी सीमेवर महाकाय भिंत बांधण्याची कल्पना राबविली गेली. चीनपासून दूरवर नांदणाऱ्या अन्य 'रानटी' समूहांना अथवा सत्तांना युक्तीने परस्परांत झुंजत ठेवून त्यांना काबूत राखण्याची अथवा वेळोवेळी त्यांच्याशी व्यापारी स्वरू पाचे संबंध प्रस्थापित करून स्वत:ची प्रभुसत्ता टिकवून धरण्याची कार्यशैली चिनी सत्ताधीश वेळोवेळी राबवत राहिले.

परंतु, १९व्या शतकाच्या पूर्वार्धातील पश्चिमी सत्तांच्या चढाईसमोर नांगी टाकावी लागल्याने, 'परराष्ट्र मंत्रालय'सदृश्य काही एक स्वतंत्र यंत्रणा चिनी प्रशासकीय व्यवस्थेचे एक अंग म्हणून विकसित करणे चिनी सत्ताधाऱ्यांना भाग पडून तशी व्यवस्था चीनमध्ये १८६१ साली प्रथम साकारली. तिच्याकडेदेखील, प्रथम, 'तात्पुरती व्यवस्था' म्हणूनच तिथे बघितले गेले. पश्चिमी राष्ट्रांसमोर पत्करावा लागलेल्या

शरणागतीपायी उद्‌भवलेले संकट सरले की त्या ‘हंगामी व्यवस्थे’ची बोळवण करण्याचाच चिनी सत्ताधीशांचा मानस होता. काळाच्या ओघात जे काही चिनी परराष्ट्रीय धोरण साकारत राहिले तसेच त्यांत वेळोवेळी जी वाकवळणे उद्‌भवली त्यांचा मागोवा घेत असताना प्रदीर्घ काळ चीनमध्ये नांदत राहिलेली ही आत्मकेंद्री वृत्ती आणि तिच्यातून निपजलेली आत्ममग्नता यांचा पार्श्वपट आपल्याला मनामध्ये जागता ठेवावा लागतो. विशेषत:, शी जिनपिंग यांनी चिनी सत्तेची सूत्रे पेलल्यापासून आंतरराष्ट्रीय पटलावर चीन उत्तरोत्तर अधिकाधिक ठाम, अ-लवचीक, जोरकस व अरेरावीची भूमिका घेताना जो दिसतो आहे त्याच्या त्या वर्तनाची उपपत्ती अन्यथा नीटपणे समजावून घेता येणार नाही. काही अभ्यासकांच्या मते चीनचे हे बदललेले वर्तन म्हणजे शी यांच्या कणखर नेतृत्वाची परिणती होय. तर, काही विश्लेषकांच्या मते, दुसऱ्या महायुद्धानंतर जगभरात नांदत आलेल्या सत्तातोलास आव्हान देण्याचा चिनी पवित्रा त्यांतून दृग्गोचर होतो.

गंमत म्हणजे, वैश्विक पटलावर चीनच्या या बदलत्या वर्तणुकीची उपपत्ती खुद्द चीन वेगळ्याच प्रकारे विदित करतो. चीनच्या लेखी, अलीकडील काळात आंतरराष्ट्रीय रंगमंचावरील त्याचे हे अधिकाधिक आग्रही, ठाम बनत चाललेले वर्तन म्हणजे वैश्विक व्यवस्थेतील त्याच्या गतकालीन रास्त, निसर्गदत्त स्थानाची पुनर्प्राप्ती करून घेण्याकडे चालू झालेला प्रवास होय. चिनी राज्यकर्त्यांच्या आणि समाजाच्या मते, जागतिक सत्तातोलाचे आणि परराष्ट्रीय व्यवहारांच्या व्यवस्थेचे नैसर्गिक केंद्र म्हणून एके काळी चीनचे जे स्थान होते ते स्थान पुन्हा प्राप्त करून घेण्याच्या ध्येयाकडे चीनच्या चालू असलेल्या प्रवासाचा हा एक भाग होय. सन १८४०-४२ दरम्यानच्या अफू युद्धामध्ये पश्चिमी राष्ट्रांकडून स्वीकाराव्या लागलेल्या पराजयाचा सल चिनी मानसिकतेला आजही सलताना दिसतो. अफू युद्धानंतरचा जवळपास शतकभराचा कालावधी चीनच्या लेखी उदंड मानहानीचा आणि अंतर्गत दुफळ्यांचा शाबीत झाला. वैश्विक सत्तेचे निसर्गसिद्ध अधिकेंद्र हा चीनचा पूर्वापारचा लौकिक त्यांपायी पूर्णत: धुळीस मिळाला. ती जखम चिनी मनोविश्वात आजही सलसलतेच आहे. जागतिक सत्तापटलावरील चीनचे निसर्गदत्त असे केंद्रस्थानी त्याला पुनश्च प्राप्त करून देणे, हा जणू अलिखित करारच चिनी जनतेने तेव्हापासून नियतीशी केला. १९२१ साली अस्तित्वात आलेल्या चिनी कम्युनिस्ट पक्षानेदेखील याच सर्वसाधारण चिनी भावविश्वाला सतत फुंकर घालत आपल्या ध्येयधोरणांचे संघटन त्याच मध्यवर्ती सूत्राभोवती गेले शतकभर गुंफलेले दिसते. चिनी परराष्ट्र धोरणाची बैसकादेखील

त्याच करारावर बेतलेली आहे. चीनचा पूर्वगौरव त्याला पुन्हा एकवार मिळवून देणे, हेच उद्दिष्ट, त्यांमुळे, चीनच्या एकंदरच धोरणदृष्टीचा गुरुत्वमध्य राहिलेला आहे. माओ यांच्या मृत्युनंतर १९७८ साली डेंग यांची कारकीर्द चालू झाल्यापासून चिनी धोरणदृष्टीची आजवर साकारलेली वाटचाल आपल्याला याच सगळ्या पार्श्वभूमीवर समजावून घ्यावी लागेल.

इथे विशेषत्वाने नोंदविण्यासारखी बाब म्हणजे, डेंग यांच्यापासून ते आजच्या शी जिनपिंग यांच्यापर्यंत चिनी धोरणदृष्टीमागील प्रेरणा अविचल, अढळ राहिलेली दिसते. पश्चिमी सत्ता चीनला सतत दाबून ठेवण्याचा प्रयत्न करत असून जागतिक व्यवस्थेतील चीनचे रास्त स्थान त्याला पूर्ववत मिळू नये हा त्यामागील डाव असल्याचे कथन चिनी कम्युनिस्ट पक्ष सतत करत असतो व आहे. पश्चिमी राष्ट्रांच्या या कारस्थानाला तोंड देण्यास एकटा चिनी कम्युनिस्ट पक्षच काय तो समर्थ असल्याची पुष्टीही त्या कथनाला सतत जोडली जाते. चीनचे गतवैभव, पूर्व आशियातील त्यांचे मध्यवर्ती महत्व आणि वैश्विक स्तरावरील एक बलवान सत्ता म्हणून त्याचा उदय ही तीनही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी चिनी नागरिकांनी प्रयत्नांची पराकाष्ठा सातत्याने करावी, असा धोशा चिनी कम्युनिस्ट पक्ष सतत लावत आलेला आहे. १९७०च्या दशकातील अंतिम पर्वापासून ते अगदी २१व्या शतकातील दुसऱ्या दशकाच्या मध्यापर्यंत चिनी अर्थव्यवस्थेने जी विस्मयकारक प्रगती साध्य केली त्यांमुळे तर चीनला त्याचे रास्त स्थान वैश्विक व्यवस्थेमध्ये पुन्हा मिळवून देण्याची जबर प्रेरणा चिनी मानसिकतेमध्ये आताशा ठासून भरलेली दिसते. शी जिनपिंग त्याच भावनेला उभारी देत सत्ता राबवत आहेत. या सगळ्या प्रक्रियेची सुरुवात, माओ यांच्या पश्चात डेंग यांनी सत्ता हाती घेतल्यापासून झाली. या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी वेळोवेळी अंगीकारली गेलेली धोरणात्मक चौकट काय ती काळाच्या त्या त्या टप्प्यावरील परिस्थिती व आव्हाने यांनुसार रंगरूप पालटत आलेली आहे, एवढेच.

माओ यांच्या नेतृत्वाखालील चीनचे परराष्ट्रविषयक धोरण बव्हंशी विचारप्रणालीच्या पायावर बेतलेले राहिले. रशियाबरोबर सलोख्याचे संबंध प्रस्थापित करणे, दक्षिण कोरिया व उत्तर कोरिया यांच्यादरम्यान उद्भवलेल्या युद्धात सहभागी होणे ही चीनची त्या पर्वादरम्यानची पावले त्याचे द्योतक ठरते. परंतु, सांस्कृतिक क्रांतीपश्चात देशात उफाळून आलेली अंतर्गत अशांतता, रशियाकडून पदरात पडलेली निराशा यांपायी चिनी परराष्ट्रसंबंधांच्या तिथवरच्या वाटचालीचा रोख पालटू लागला. नेमक्या त्याच पोकळीचा लाभ अचूक उचलत अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष रिचर्ड निक्सन

यांनी चीनबरोबर संबंध प्रस्थापित करण्याचे ऐतिहासिक पाऊल उचलत १९७२ साली चीनला भेट दिली. माओ त्या वेळी चीनचे सर्वेसर्वा होते.

माओ यांच्यानंतर चीनच्या सर्वोच्च नेतेपदी आलेल्या डेंग यांनी त्यांच्या एकंदरच धोरणदृष्टीचा झोत स्थिर केला तो चीनच्या आर्थिक सक्षमीकरणावर. साऱ्या शक्ती डेंग यांनी एकवटल्या त्या चिनी अर्थव्यवस्थेच्या बळकटीकरणावर. बाहेरील अथवा/आणि सीमेशेजारील देशांबरोबर भूतकाळात निर्माण झालेले झगडे अथवा विसंवाद अधिक गंभीर वा व्यापक बनू नयेत यांवर डेंग यांच्या परराष्ट्रविषयक धोरणदृष्टीचा भर राहिला. या विचारधारेचा धागा जुळलेला होता तो चीनसंदर्भातील त्यांच्या अंतर्गत धोरणप्रणालीशी. चिनी अर्थव्यवस्थेच्या मजबुतीकरणाद्वारे एकंदरच चीनला बुलंद बनवणे हा डेंग यांच्या धोरणांचा गाभा होता. अन्य देशांबरोबर कुरबुरी वाढल्या अगर शेजारी राष्ट्रांबरोबरच्या पूर्वापार वादांनी तोंड काढले तर चीनच्या अंतर्गत सक्षमीकरणावरून लक्ष अन्यत्र ढळेल, अशी धास्ती डेंग यांना वाटत असे. किचकट असे परराष्ट्रविषयक कटकटीचे विषय सध्यापुरते तरी बासनात गुंडाळून ठेवावेत आणि सर्वतोपरी प्रयत्नांचा भर चीनच्या सर्वंकष मजबुतीकरणावर स्थिर करावा, ही डेंग यांची त्या धोरणदिशेमागील विचारप्रणाली होती. चिनी क्षमतांची एकदा का सर्वांगांनी भक्कम बांधणी झाली की बाह्य राष्ट्रांबरोबरील चिनी संबंधांचा पोतही आपसूकच गुणात्मकरीत्या उंचावेल ही डेंग यांची अटकळ या धोरणदिशेच्या मुळाशी होती. त्यांमुळे, बाहेरील शक्तींच्या डोळ्यावर येणार नाही अशी खबरदारी घेत चीनच्या क्षमतांचे संगोपन-संवर्धन नेटाने करण्यावर डेंग यांच्या कार्यपद्धतीचा भर राहिला. शेजारील अथवा आशिया खंडातील अन्य देशांबरोबर चीनचे जे काही बखेडे असतील त्यांचा निपटारा करण्याचे काम भविष्यकालीन चिनी नेतृत्वावर सोपवायचे, हा डेंग यांचा विचार त्या काळात सतत राहिला. एकदा का चीनचे सामर्थ्य सर्व आघाड्यांवर वाढले की परराष्ट्रसंबंधविषयक वाटाघाटींदरम्यान चीनच्या वाढलेल्या सामर्थ्याचा दबाव समोरील पक्षावर आपोआपच पडेल, असा धोरणी पवित्रा या विचारसरणीच्या मुळाशी होता.

डेंग यांची ही विचारधारा आणि त्याबरहुकुम अंगीकारली गेलेली धोरणदिशा ध्रुवताऱ्याप्रमाणे पुढील तब्बल तीन दशके चीनच्या परराष्ट्रसंबंधविषयक व्यूहरचनेच्या क्षितिजावर स्थिर राहिली. कासव ज्या प्रमाणे आपली सगळी गात्रे कवच्याखाली झाकून घेते त्याच न्यायाने १९७८ सालानंतरची पुढील सलग ३० वर्षे चीन आपल्या अंगभूत क्षमता सुप्तपणे बळकट बनवत राहिला. जगाच्या डोळ्यावर न येता आपले

सक्षमीकरण सर्वांगांनी सातत्यशील राखण्याचे चीनचे त्या संपूर्ण काळातील धोरण म्हणजे डेंग यांच्या एकंदर व्यवस्थापनदृष्टीचा केंद्रीभूत गाभा होता. तो पवित्रा चीनने अंमळ बदलायला सुरुवात केली ती २००८ सालाच्या आगेमागे. त्यालाही दोन घटना कारणभूत अथवा पूरक-उपकारक ठरल्या. २००८ साली उद्भवलेले वैश्विक वित्तीय अरिष्ट ही होय त्यांतील पहिली. तर, २००८ सालीच बीजिंग येथे चीनने केलेले ऑलिम्पिक स्पर्धांचे दिमाखदार आणि यशस्वी आयोजन. अमेरिकी सबप्राइम कर्जांचा फुगा फुटल्यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेत सर्वत्र फैलावलेल्या वित्तीय अरिष्टाने पश्चिमी राष्ट्रांच्या खुल्या बाजारपेठीय भांडवलशाहीप्रधान आर्थिक धोरणांचा वर्ख पार उतरवून टाकला. तर, ऑलिम्पिक स्पर्धांच्या यशस्वी आयोजनाद्वारे चिनी क्षमतांबद्दल वैश्विक समुदाय विस्मित होण्याबरोबरच स्वत:च्या क्षमतांबाबतचा विश्वास चिनी मानसिकतेमध्ये लसलसला. धोरणात्मक अलिप्ततेचा आजवर जाणीवपूर्वक अवलंबलेला पवित्रा क्रमाक्रमाने सोडून देत बाहेरील जगाबरोबर चीनने आता अधिक सघनपणे व्यवहार करावेत अथवा नाही, यांबाबत त्या पर्वादरम्यान चीनमध्ये उच्चस्तरावर व्यापक चिंतनमंथन घडले. परस्परविरोधी मतांना त्या चर्चेदरम्यान तोंड फुटले. परंतु, जागतिक पटलावर अधिक अर्थपूर्ण व महत्वाच्या जबाबदाऱ्या पेलून त्या निभावून नेण्याबाबत चीनची अद्याप पुरेशी तयारी नाही, असा त्या व्यापक चर्चेचा निष्कर्ष निघाला. डेंग यांचे, ''अ-लक्षित राहा आणि/परंतु सामर्थ्य बुलंद बनवण्याचा शिरस्ता जारीच राखा'', हेच धोरण यापुढेही चालू ठेवावे, या निर्णयाच्या बंदराला त्या साऱ्या विचारविनिमयाचे तारू अखेर येऊ न मग थांबले.

परंतु, चीन आता जागा होऊ लागलेला आहे, याचा काहीसा सुगावा बाहेरील अथवा परिसरातील देशांना लागावा अशा काही क्रिया-प्रतिक्रिया चीनच्या वर्तनाद्वारे बाह्य विश्वात उमटायला लागलेल्या होत्या. परराष्ट्रसंबंधांच्या संदर्भात आपण आता हलकेच कूस पालटत आहोत याची चुणूक चीनने त्या काळात जपान आणि फिलिपिन्स या दोन देशांना दाखवून दिली. मासेमारीविषयक जारी असलेल्या आपल्या देशाच्या मार्गदर्शक तत्वांचा चीनबरोबरील वादग्रस्त सागरी सीमाभागात भंग केल्याबद्दल फिलीपिन्सने मासेमारी करणारी एक चिनी नाव डांबून घातली. फिलिपिन्सच्या या कारवाईची शिक्षा म्हणून फिलिपिन्समधून चीनमध्ये आयात केल्या जाणाऱ्या काही जिनसांवर चीनने बंदी जारी केली. हाच खाक्या चीनने मग अवलंबला जपानच्याबाबतीत. चीनबरोबरील वादग्रस्त अशा सागरी हद्दीमध्ये सागरी वाहतुकीसंदर्भातील कायद्यांची अंमलबजावणी जारी केल्याची शिक्षा म्हणून काही

दुर्मिळ खनिजांच्या जपानला केल्या जाणाऱ्या निर्यातीवर चीनने पाबंदी लागू केली. आग्नेय आशियातील शेजारी देश चीन दावा करत असलेल्या सागरी क्षेत्राबाबत ज्या प्रमाणात आक्षेप घेतील अथवा न घेतील त्या प्रमाणात संबंधित देशांकडे चिनी गुंतवणूक वळवण्याचेही धोरण चीन आताशा अवलंबतो आहे. चीनच्या हितसंबंधांवर गदा आणण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना अद्दल घडवण्याइतपत चीनचे सामर्थ्य आता वाढलेले आहे, या वास्तवाचे द्योतन या साऱ्या घटना घडवतात. या ठिकाणी आणखी एक गंमतीदार बाब नोंदवावयास हवी. याच पर्वादरम्यान चीनमध्ये 'सोशल मीडिया'चा प्रसार व फैलाव चालू झालेला होता. सर्वसामान्य चिनी नागरिकांच्या मनोविश्वात डोकवण्याचा एक झरोकाच जणू त्यांद्वारे चिनी सत्ताधीशांच्या हाताशी आला. परराष्ट्रसंबंधांसंदर्भातील धोरणामध्ये चीन हळूहळू अवलंबत असलेल्या दंडशक्तीच्या प्रयोगांना व तिच्या उपयोजनाला अनुकूल असा प्रतिसाद सर्वसामान्य चिनी मानस देते आहे, याची पावती चिनी धोरणकर्ते व सत्ताधीश या दोहोंनाही 'सोशल मीडिया'वर नागरिकांच्या व्यक्त होणाऱ्या प्रतिक्रियांच्याद्वारे मिळू लागली.

# पुरवणी

## भक्तीचळवळ आणि राजकीय मूल्यव्यवस्था

'मध्ययुगीन राजकीय विचार', या मध्यवर्ती सूत्राभोवती विणलेल्या राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करून शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागाने एका अतिशय महत्वाच्या अभ्यासविषयास हात घातला आहे. भारतासारख्या खंडप्राय देशातील विविध प्रांतांत प्राचीन काळापासून अंमल गाजवीत आलेल्या भिन्न भिन्न राजवटींच्या माध्यमातून कशा प्रकारच्या राजकीय संस्कृती इथे निरनिराळ्या काळात नांदत आल्या, याचा साधा आलेख चितारावयाचे म्हणले तरी तोदेखील एक व्यापक असा अभ्यासप्रकल्प ठरतो. ते काम सोपे नाही. कारण, एक तर वेगवेगळ्या प्रांतांत काळाच्या निरनिराळ्या बिंदूंवर कारकीर्द राबविलेल्या राजकीय व्यवस्थांची पार्श्वभूमी, राज्यकारभाराच्या प्रेरणा, राजकीय संस्कृती, व्यवस्था, सत्तारूढ राजघराणी, त्या त्या राजघराण्यांनी अंगीकारलेली कारभाराची मार्गदर्शक तत्वे व सूत्रे... अशा सगळ्यांचबाबतीत उदंड वैविध्य असावे, हे स्वाभाविक ठरते. अशा परिस्थितीत, त्या त्या राजवटींच्या कार्यपद्धतींचा अभ्यास करत त्यांतून दृग्गोचर होणारा त्या त्या राजवटीचा राजकीय विचार प्रथम निश्चित करून मग त्याच्या प्रवासाची वाकवळणे समजावून घेणे, ही गुंतागुंतीची बाब ठरावी. त्यासाठी प्रथम, कदाचित, 'राजकीय विचार' म्हणजे नेमके काय, त्याचे घटकावयव कोणते, तो प्रतिबिंबित करणारी माध्यमे कोणती याची सूत्रबद्ध निश्चिती करणे अत्यावश्यक ठरते. कारण, राज्यकारभारादरम्यान प्रगटलेला त्या त्या राजवटीचा राजकीय विचार हा संबंधित राजवटीने अंगीकारलेली धोरणे, राबविलेले कार्यक्रम व उपक्रम, जारी केलेले कायदेकानून, दिलेले आदेश, स्वीकारलेले दंडविधान, अंमलबजावणी केलेली राजकोषीय व्यवस्था, परराष्ट्रांसंदर्भात जोपासलेली भूमिका व नीती अशांसारख्या बाबींद्वारे प्रगट होत राहावा, हे तर्कशुद्ध ठरते. अशा सगळ्या पैलूंचा सांगोपांग धांडोळा घेत प्रत्येक काळातील राजवटींचा राजकीय विचार निश्चित करणे, हा मग

आंतरविद्याशाखीय अध्ययन-संशोधनाचा विषय बनतो. त्यासाठीदेखील, प्रथम, अशा अभ्यासासाठी व संशोधनासाठी आवश्यक असणाऱ्या आधारभूत आणि विश्वसनीय साधनांचे संकलन, परिचय आणि विश्लेषण अनिवार्य शाबीत होते. किंबहुना, आधारभूत साहित्याचा अंतर्बाह्य परिचय, हा पुढील अध्ययन-संशोधन यांचा पाया ठरतो.

मध्ययुगीन महाराष्ट्रातील राजकीय विचार जाणून घ्यावयाचा तर हाच क्रम स्वीकारणे क्रमप्राप्त ठरते. 'महाराष्ट्र' नावाचे १ मे १९६० या दिवशी आकारास आलेले भू-राजकीय एकक आणि 'महाराष्ट्र' या अभिधानाने मध्ययुगात निर्देशित केला जाणारा भूभाग ही दोन्ही एकच भौगोलिक एकके नव्हेत, ही वस्तुस्थिती प्रथम त्यासाठी नीट समजावून घ्यावी लागेल. केवळ इतक्यानेच भागत नाही. 'मध्ययुग' या संकल्पनेचा काळाच्या संदर्भात आरंभबिंदू व सांगताबिंदूदेखील आपल्याला अशा अभ्यासासाठी सारासारविचाराने निश्चित करावा लागेल. मध्ययुगात ज्या ज्या राजवटी तत्कालीन महाराष्ट्रात निरनिराळ्या काळात व निरनिराळ्या भूभागांवर अंमल गाजवत होत्या त्यांच्या संदर्भातील उपलब्ध दस्तऐवजांचे शोधन, संकलन, वर्गीकरण, वाचन, विश्लेषण या साऱ्या टप्प्यांनंतरच आपल्याला त्या कालखंडातील राजकीय विचाराचे अथवा राजकीय विचारांचे रंगरूप समजावून घेणे शक्य बनेल.

अर्थात, उपलब्ध होणाऱ्या विश्वसनीय दस्तऐवजांचे केवळ वाचन व परिशीलन केल्यानेच मध्ययुगीन महाराष्ट्रातील राजकीय विचार एकसंध स्वरूपात साकारेल, असे अनुमान बांधणेदेखील अवघडच ठरते. कारण, मध्ययुगीन राजकीय व्यवहारासंदर्भातील जे काही विश्वसनीय संदर्भ, दस्तऐवज हाती येतील त्यांत नोंदविलेल्या तत्कालीन राजकीय पर्यावरणासंदर्भातील निर्देशांनाच त्या त्या राजवटीचा 'राजकीय विचार' म्हणणे असंयुक्तिक ठरेल. अशा त्या दस्तऐवजांमधील, तत्कालीन राजकीय व्यवस्था व पर्यावरण यांचे काही कवडसे प्रतिबिंबित करणारे जे तपशील गवसतील ते निर्देश म्हणजे त्या राजवटीदरम्यानचा राजकीय विचार समजावून घेण्याची कच्ची सामग्री ठरेल. या कच्च्या सामग्रीच्या परिशीलनाद्वारे त्या त्या काळातील त्या त्या राजवटीचा राजकीय विचार सूत्रबद्ध शिस्तीने निश्चित करण्याच्या काही गमका हस्तगत होऊ शकतील. अशा विविध राजकीय विचारांचा लघुत्तम साधारण विभाजक म्हणजे 'मध्ययुगीन महाराष्ट्रातील राजकीय विचार', असे म्हणता येईल.

जो काही राजकीय विचार मध्ययुगीन महाराष्ट्रामध्ये व्यवहारात साकारला त्या विचाराच्या उत्क्रांतीमध्ये संतांच्या कार्य-विचारांचे योगदान काही होते का आणि

असलेच तर त्याचे नेमके स्वरूप काय होते, असा प्रश्न या चर्चाविश्वात उपस्थित होणे हे एका अर्थाने संयुक्तिक व स्वाभाविकही ठरते. 'द राइज ऑफ द मराठा पॉवर', या विख्यात प्रबंधाद्वारे न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी मध्ययुगीन महाराष्ट्रातील भागवतधर्मप्रणीत वारकरी संतांचे कार्य आणि शिवरायांनी उभारलेला स्वराजनिर्मितीचा भव्य उद्योग या दोहोंतील आंतरिक नातेसंबंधाचा ढोबळ आलेख पूर्वीच चितारलेला आहे. परंतु त्याचा आशय हा मुख्यत: सामाजिक आहे. मध्ययुगीन महाराष्ट्रातील राजकीय व्यवस्थांद्वारा या भूमीत साकारलेल्या राजकीय विचाराच्या उत्क्रांतीद्वारे जी मूल्ये एतद्देशीय समाजव्यवहारात निर्माण झाली त्यांच्या जडणघडणीत संतांच्या चळवळीचे योगदान किती व कोणत्या स्वरूपाचे होते, या प्रश्नाचा उहापोह करण्यासाठी, प्रथम, संतांनी जे समाजजागरण घडवले त्याच्या संदर्भात 'राजकीय कृती' या संकल्पनेची व्याख्या सिद्ध करणे क्रमप्राप्त ठरते. कारण, प्रस्थापित अशा तत्कालीन समाजव्यवस्थेत काळाच्या गरजांशी सुसंगत असे परिवर्तन घडवून आणण्यासाठी संतांच्या चळवळीने जो कर्मयज्ञ मांडला त्यांतून समाजव्यवहारात ज्या मूल्यांची प्रतिष्ठापना झाली त्यांचा आणि तत्कालीन राजकीय व्यवहाराद्वारे निर्माण झालेल्या मूल्यांचा परस्परांशी काय संबंध होता याचा बोध आपल्याला त्यांखेरीज होणार नाही.

हे करायचे तर, प्रथम, आपल्याला संतांच्या चळवळीचे स्वरूप यथायोग्य आकलन होणे अगत्याचे ठरते. 'चळवळ' या शब्दात परिवर्तन अनुस्युत आणि अपेक्षित आहे. जी काही प्रस्थापित घडी व्यवहारात नांदत असते तिच्यातील अनुचित व कालविसंगत अंश निपटून काढत समाजप्रवाहाला कालसुसंगत असे वळण देण्यासाठी जी काही धडपड केली जाते तिला 'चळवळ' असे सर्वसाधारणपणे आपण म्हणतो. त्या धडपडीद्वारे अपेक्षित असे परिवर्तन व्यवहारात साकारेलच याची काही शाश्वती देता येत नाही. त्यांमुळे, कोणतीही चळवळ या अर्थाने दरवेळी यशस्वी होतेच, असे छातीठोकपणे सांगता येत नाही. एखाद्या चळवळीची परिणती परिवर्तनामध्ये घडून आली नाही तर ती चळवळ फसली अथवा अपयशी ठरली असे आपण म्हणतो. परंतु, परिवर्तन घडवून आणणे हा कोणत्याही चळवळीचा गाभाहेतू असतो, हे मात्र कोणीच अमान्य करणार नाही. या दृष्टीने मध्ययुगीन संतांच्या कामगिरीचे स्वरूप नीट न्याहाळणे गरजेचे ठरते.

'शिवप्रभूंच्या स्वराज्य-नीतीवरील सूत्रग्रंथ' असे डॉ. रा. चिं. ढेरे ज्या 'आज्ञापत्र' या रामचंद्रपंत अमात्यलिखित अमोल दस्तऐवजाचा निर्देश करतात त्या 'आज्ञापत्रा'तील

एक वाक्य या संदर्भात अतिशय कळीचे शाबीत होते. स्वराज्यनिर्मितीचा जो अपूर्व असा पराक्रम शिवरायांनी रचला त्याचे अतिशय मार्मिक व अचूक मर्म रामचंद्रपंत अमात्य यांनी 'आज्ञापत्रा'च्या प्रथम प्रकरणाच्या अखेरीस, 'केवल नूतन शृ(सृ)ष्टीच निर्माण केली', अशा अन्वर्थक शब्दांत मांडलेले आहे. 'नूतन सृष्टीच निर्माण केली', या शब्दरचनेद्वारे अमात्य सूचित करतात एका नवीन जगाची निर्मिती. याचा सखोल व सघन अर्थ नीट समजावून घ्यायला हवा. शिवरायांनी, त्यांच्या काळात प्रचलीत असलेल्या सृष्टीमध्ये परिवर्तन घडवून आणले, असे अमात्यांना इथे सुचवायचे नाही. तर, एका नवीन सृष्टीची, पर्यायाने नवीन व्यवस्थेची उभारणी हे शिवरायांच्या स्वराज्यनिर्मितीच्या महद्योगाचे गाभातत्व होय, हे अमात्यांचे प्रतिपादन आहे. ज्या व्यवस्थेची प्रेरणा, स्वरूप, कार्यपद्धती, कायदेकानून, नीतीनियम, मार्गदर्शक तत्वे, अधिष्ठानमूल्ये व उद्दिष्टे सर्वस्वी निराळी आहेत, अशी व्यवस्था म्हणजे शिवरायनिर्मित स्वराज्य, हा ठरतो 'नूतन सृष्टीच निर्मिली' या प्रतिपादनाचा सारांश. १७व्या शतकात शिवरायांनी 'नूतन सृष्टी' उभी करण्याची जी अजोड कर्तृत्वशक्ती प्रगट केली तिचा आणि १३व्या शतकापासून भागवतधर्मी संतमंडळाने मराठी भूमीमध्ये साकारलेले नवजीवन यांच्या स्वरूपात व प्रेरणांमध्ये जैविक स्वरूपाचा आंतरिक संबंध आहे. तो संबंध व्यवस्थित आकलन झाला की, तत्कालीन समाजवास्तवात मूलभूत स्वरूपाचे निर्णायक परिवर्तन घडवून आणण्यासाठी वारकरी संतांनी जी पावले उचलली त्यांना 'राजकीय कृती' असे का व कसे संबोधायचे याचा उलगडा व्यवस्थित व्हावा. त्यासाठी, 'राजकीय हेतूंच्या पूर्ततेखातर राजकारण पुढे रेटण्यासाठी केलेली व्यूहरचना' हा 'राजकीय कृती' या संकल्पनेला आज जो मर्यादित अर्थ प्राप्त झालेला आहे, तो बाजूला ठेवणे क्रमप्राप्त ठरते.

**सत्तातोल आणि प्रस्थापित हितसंबंध**

कोणतीही सामाजिक रचना म्हणजे, व्यवहारात, एक विलक्षण गुंतागुंतीचा असा सत्तातोल असतो. किंबहुना, वेगवेगळ्या स्तरांवर नांदणाऱ्या सत्तांमधील आंतरसंबंधांचा तो एक विशाल असा पट ठरतो. त्या जाळ्यामधील विविध घटकांमध्ये नांदणारा सत्तातोल परस्परांच्या हितसंबंधांची जपणूक करण्याच्या निसर्गदत्त प्रेरणेद्वारे जपला जात असतो. प्रचलीत समाजरचनेमध्ये विविध स्तरांवर सत्तेच्या विभागणीची जी व्यवस्था नांदत असते तिच्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल घडवून आणण्यास त्या व्यवस्थेमधील घटक सहसा अनुत्सुकच असतात. कारण, तसे करणे हे त्यांच्या लेखी स्वत:च्या हाताने स्वत:च्या पायावर धोंडा पाडून घेण्यासारखे ठरते. स्थिरपद

झालेल्या व्यवस्थेत दृढ झालेले आपले सत्तासंबंध व त्यांची काळाच्या ओघात भक्कमपणे विणली गेलेली वीण उसवण्यास कारणभूत ठरणाऱ्या कोणत्याही बाबीला अथवा घटिताला व्यवस्थेतील प्रस्थापित कडोविकडीचा विरोध करत राहतात. सत्तेच्या विभागणीची प्रचलीत व्यवस्था शक्यतो अभेद्य राखण्याकडेच तिच्यातील प्रस्थापितांचा कल सर्वस्वी झुकलेला असतो.

समाजव्यवहारात प्रचलीत असणाऱ्या सत्तेच्या विभागणीत ज्या समाजस्तरांना त्यांचा रास्त वाटा अथवा अवकाश नाकारला गेलेला असतो, अशा वंचितांची त्या पर्यावरणात घुसमट होत राहावी, हे मग ओघानेच येते. प्रचलीत व्यवस्थेने ज्या समाजघटकांना दरवाजे बंद केलेले असतात अशा समाजघटकांना त्यांचे रास्त स्थान त्या व्यवस्थेमध्ये मिळवून देण्यासाठी समाजधुरीण जी व्यूहरचना करतात तिला 'राजकीय कृती' असे त्या संदर्भात संबोधणे संयुक्तिक ठरते. भागवत धर्मविचाराची विचारपताका खांद्यावर पेललेल्या संतमंडळाने १३व्या शतकात महाराष्ट्रामध्ये जे जागरण आरंभले त्याचा निर्देश आपल्याला, मग, 'राजकीय कृती' या संबोधनाने करता येईल. त्या घुसळणीचा आरंभ व पायाभरणी घडवून आणतात ज्ञानदेव. या वस्तुस्थितीचा सूक्ष्म पुरावा आपल्याला सापडतो ज्ञानदेवनिर्मित 'ज्ञानेश्वरी'च्या उपसंहारात. श्रीमद्भगवद्गीतेवर प्राकृतात प्रतिपदटीका रचण्याच्या ज्ञानदेवांच्या त्या कृतीला या अर्थाने 'राजकीय' परिमाण लाभते. त्या अक्षरश्रमांद्वारे कोणत्या प्रकारचे व्यवस्था परिवर्तन ज्ञानदेवांच्या नजरेपुढे होते, हे नीट समजावून घेतले की त्यांच्या त्या महत्कार्याला 'राजकीय' परिमाण कसे जडते ते स्पष्ट व्हावे.

तो उलगडा करून घेण्याची वाट खुद्द ज्ञानदेवांनीच 'महाभारत'कार व्यासांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव मांडत 'ज्ञानेश्वरी'मध्येच प्रशस्त बनवलेली आहे. अर्जुनाला कर्तव्यसन्मुख बनविण्यासाठी जो गीताबोध श्रीकृष्णमुखातून कुरुक्षेत्रावर प्रगटला तो महर्षी व्यासांनी शब्दबद्ध करून 'महाभारता'तील 'भीष्मपर्वा'मध्ये घनीभूत केला. विश्वावर उपकार करण्याच्या उदात्त हेतूने व्यासांनी तो सारा शब्दव्यापार उभारला हे तर खरेच, परंतु, कृष्णबोलांना अक्षररूप बहाल करण्याच्या त्या खटाटोपाच्या केंद्रबिंदूस्थानी, तत्कालीन समाजव्यवहारातील दोन पराकोटीच्या उपेक्षित घटकांच्या उत्थानाची प्रबळ प्रेरणा होती अथवा आहे, असे ज्ञानदेव सूचित करतात. **तैसें शब्दें जें न लभे । तें घडुनियां अनुष्टुभें । स्त्रीशूद्रादी प्रतिभें । सामाविलें** हे ज्ञानदेवांचे त्या संदर्भातील उद्गार अतिशय मार्मिक आणि तितकेच अर्थगर्भ आहेत. व्यासांनी श्रीमद्‌भगवद्गीतेची रचना अनुष्टुभ छंदात केलेली आहे. 'शब्द' या संज्ञेला ज्ञानदेवांच्या

काळात एक विशेष असा सांकेतिक अर्थ होता. 'शब्द' या संज्ञेने त्या काळात निर्देश केला जात असे वेदविद्येचा. पारंपरिक श्रद्धेनुसार वेदांना आत्मविद्येचे साधन गणले जात असे. वेदविद्येचा अधिकार तत्कालीन समाजव्यवस्थेने बहाल केलेला होता त्रैवर्णिकांमधील केवळ पुरूषांनाच. शूद्र आणि चारही वर्णांतील स्त्रियांना तत्कालीन धर्मव्यवस्थेने वेदविद्येचा अधिकार नाकारलेला होता.

मग, चारही वर्णांमधील स्त्रिया आणि शूद्रवर्णीय गणला जाणारा समाजघटक यांच्या आत्मिक उन्नयनाचे काय, या प्रश्नाला भिडतात महर्षी व्यास. वेदांचा अधिकार नाकारलेल्या समाजघटकांच्या उन्नयनासाठी श्रीकृष्णबोलांना अक्षररूप देण्यास व्यासमहर्षी सरसावले, अशी ग्वाही ज्ञानदेव उपरोक्त ओवीद्वारे देतात. म्हणजे, तत्कालीन कर्मठ धर्मप्रधान व्यवस्थेने श्रुतींचा अधिकार नाकारलेल्यांच्या आंतरिक उद्धारासाठी अपार करूणा मनीमानसी वागविणाऱ्या व्यासांनी 'श्रीमद्‌भगवदगीता' नामक स्मृती निर्माण केली, अशी उपपत्ती इथे साकारते. आपल्या स्मृतिमध्ये साठविलेला कृष्णबोध त्रिकालज्ञानी व्यासांनी शब्दांकित करून महाभारतातील 'भीष्मपर्वा'मध्ये समाविष्ट केलेला असल्यामुळे श्रीमद्‌भगवदगीता ही आपल्या पारंपरिक ज्ञानव्यवस्थेमध्ये स्मृती ठरते. श्रुतींचा अधिकार त्रिवर्णांतील केवळ पुरूषांनाच परंपरेने बहाल केलेला असला तरी स्मृतींचे तसे नाही. स्मृतींच्या प्रांगणात चारही वर्ण आणि स्त्रियांना प्रवेश असल्यामुळेच समाजमनस्क व्यासांनी श्रीमद्‌भगवदगीतेच्या रचनेद्वारे स्त्री-शूद्रादिकांच्या आध्यात्मिक उन्नतीचा राजमार्ग खुला केला, हे ज्ञानदेवांचे कथन आहे. अध्यात्माच्या सर्वसमावेशक प्रांतात, ज्ञानसंपादनाद्वारे आत्मोद्धार साध्य करण्याचा समानाधिकार समाजव्यवस्थेतील सर्व घटकांना बहाल करणाऱ्या आध्यात्मिक लोकशाहीची पायाभरणी महर्षी व्यासांनी अशा प्रकारे द्वापारयुगात केली, हे ज्ञानदेव इथे स्पष्ट करतात.

व्यासांचा तोच वारसा आपण आता कलीयुगात त्याच व्यासांनी संस्कृत भाषेत अक्षरबद्ध केलेला गीताबोध प्राकृतामध्ये रूपांतरित करून पुढे नेत आहोत, ही भावना ज्ञानदेवांनी, **तरीं व्यासाचा मागोवा घेतू । भाष्यकारातें वाट पुसतु,** अशा शैलीदार शब्दकळेद्वारे 'ज्ञानदेवी'मध्ये व्यक्त केलेली आहे. श्रीमद्भगवद्गीता म्हणजे कंजुष वेदांचे 'सुसेव्य' रूप होय, अशी ज्ञानदेवांची त्या संदर्भातील धारणाही मननीय ठरते. व्यासकालीन समाजव्यवस्था आणि ज्ञानदेवकालीन समाजव्यवस्था या दोहोंत अधिकारभेदाच्या उतरंडीमध्ये गुणात्मक फरक काहीच नव्हता. चारही वर्णांतील स्त्रिया आणि शूद्रांना १३व्या शतकातील कर्मठ धर्मव्यवस्थेने ज्ञानसंपादनाचा

अधिकार आणि उतरंडप्रधान व्यवस्थेतील रास्त अवकाश नाकारलेलाच होता. त्या अवहेलनेने, उपक्षेने आणि स्वत्वहानीने आत्मखूण संपूर्णतया गमावून बसलेल्या स्त्री-शूद्रादी समाजघटकांना आत्मस्वर प्राप्त करून देण्याचे दुष्कर कार्य करण्यास ज्ञानदेव पुढे सरसावतात ते 'ज्ञानेश्वरी'च्या निर्मितीद्वारे.

**उपेक्षा, विद्रोह आणि वेदना**

तत्कालीन संकुचित धर्मव्यवस्थेने स्त्रिया आणि शूद्रवर्णीयांना नाकारलेल्या त्यांच्या रास्त अधिकारांचा सल त्या उभय समाजघटकांच्या मनीमानसी किती खोलवर आणि कसा शल्यदायी रीतीने रुतून बसला होता त्याचे दोन पुरावे भागवतधर्मीय संतमंडळातील दोन विभूतिमत्वांच्या जळजळीत उद्‌गारांद्वारे हाती येतात. त्यांतील एक व्यक्तिमत्त्व आहे ज्ञानदेवांच्या समकालीन, म्हणजे १३व्या शतकातील. तर, दुसरे व्यक्तिमत्व आहे उत्तरकालीन, म्हणजे १७व्या शतकातील. ज्ञानदेवांना समकालीन असणारे विभूतिमत्व म्हणजे मंगळवेढावासी चोखोबा आणि त्यांची धर्मपत्नी सोयराबाई यांचा मुलगा कर्ममेळा. तर, उत्तरकालीन व्यक्तिमत्व म्हणजे तुकोबांना देहूग्रामी प्रत्यक्ष बघितलेल्या त्यांच्या स्वप्नोपदिष्ट शिष्या बहेणाबाई सिऊरकर.

चोखोबा आणि सोयराबाई या दांपत्याचा मुलगा असणारा कर्ममेळा म्हणजे धगधगत्या आत्मखुणेचा रोकडा आविष्कार होय. आज उपलब्ध असणाऱ्या त्यांच्या अभंगांची संख्या अत्यल्पच आहे. परंतु उपलब्ध असणाऱ्या त्या मोजक्या अभंगांतील प्रत्येक शब्दाशब्दातून उसळताना दिसतो उग्र विद्रोह. तत्कालीन समाजव्यवस्थेने पदरी लादलेल्या अपमानित व उपेक्षित जिण्याचा कर्ममेळा यांच्या ठायी धुमसत असलेला प्रचंड संताप त्यांनी खुद्द विठ्ठलालाच उद्देशून काढलेल्या उद्‌गारांमध्ये ठसठशीतपणे प्रतिबिंबित झालेला आपल्याला दिसतो. समकालीन संकुचित धर्मव्यवस्थेने बहाल केलेले अवनत सामाजिक अस्तित्व आणि त्यांपायी भोगाव्या लागणाऱ्या अनंत यातना यांचा उद्वेग, कर्ममेळा, **आमुची केली हीन याती । तुज कां न कळे श्रीपती,** अशा शब्दांत विठ्ठलापाशी व्यक्त करतात. परंतु, ते इथेच थांबत नाहीत. तत्कालीन समाजव्यवस्थेने त्यांच्यावर लादलेल्या अवमानित जीवनराहाटीचा व तिच्यात अनुस्युत असणाऱ्या हीन व्यवहाराचा जाब, विठ्ठलाचे निमित्त करून कर्ममेळा भवतालातील विषमतापूर्ण व शोषक व्यवस्थेला, **जन्म गेला उष्टे खातां । लाज न ये तुमचे चित्ता,** अशा जळजळीत बोलांद्वारे रोखठोकपणे विचारतात.

स्वप्नावस्थेमध्ये तुकोबांचे शिष्यत्व पत्करलेल्या बहेणाबाई सिऊरकर यांची वेदना कर्ममेळा यांच्याइतकीच सघन-सखोल आहे. धर्मव्यवस्थेने भाळी बांधलेले

परंपरागत दुय्यम अस्तित्व आणि कठोर पुरुषी वर्चस्वाने व्यापलेल्या जगराहाटीपायी वाट्याला आलेली नवऱ्याची छळवणूक यांच्या दुहेरी काचामध्ये बहेणाबाई जगत होत्या. 'स्त्री म्हणजे पुरुषाच्या प्रगतीमधील धोंड', या पुराणमतवादी पुरुषीसत्तेच्या आपमतलबी दृष्टीपायी, ज्ञानसंपादनाद्वारे आत्मोन्नतीचे दरवाजे समस्त स्त्री-वर्गासाठी कुलुपबंद करणाऱ्या व्यवस्थेच्या बळी ठरलेल्या बहेणाबाई, **वेद हाका देती पुराणें गर्जती । स्त्रियेच्या संगती देव कैचा,** अशा शब्दांत ती व्यथा एका अभंगात नेमस्तपणे शब्दबद्ध करतात. परंतु, त्याच अभंगाच्या पुढील चरणात, **मी तो सहज स्त्रियेचाचिं देह । परमार्थाची सोय आतां कैची,** अशा बोलांद्वारे भवतालातील पुरुषी व्यवस्थेला आत्मशोधनासाठी आवाहनदेखील करतात. मध्ययुगीन कर्मठ धर्मव्यवस्था आणि तिच्या अंकित असणारी समाजव्यवस्था यांनी नाकारलेल्या या दोन समाजघटकांच्या वेदना ज्ञानदेवांनी जवळून बघितलेल्या-अनुभवलेल्या होत्या.

उतरंडप्रधान समाजव्यवस्थेने मोकललेल्या तथाकथित शूद्रांना आणि चारही वर्णांनी उपेक्षिलेल्या स्त्रीवर्गाला व्यवस्थेतील त्यांचे रास्त स्थान व अवकाश प्राप्त करून देण्यासाठी ज्ञानदेवांनी उचललेले पहिले पाऊल म्हणजे गीताटीकेची निर्मिती. परमार्थाच्या अथवा अध्यात्माच्या क्षेत्रात महाराष्ट्रामध्ये १३ व्या शतकात लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी भागवतधर्मी संतमंडळाने पंढरीच्या वाळवंटात चळवळीची पताका उभारली, असे जे म्हणले जाते त्याचा अर्थ हाच. परिवर्तनाच्या त्या चळवळीला संतांनी प्रारंभ केला अध्यात्माच्या क्षेत्रापासून. श्रीमद्भगवद्गीतेवर टीका साकारण्याच्या निमित्ताने ज्ञानदेव, एका अर्थाने, ऐलान करत होते सम्यक् परिवर्तनाचे. सर्वसमावेशकता आणि समानाधिकार या दोन मूल्यांचे अधिष्ठान लाभलेल्या लोकशाहीचे बीजारोपण अध्यात्माच्या क्षेत्रात घडवून आणणे, हा होता केवळ पायाभरणीचा टप्पा. त्या पायाभरणीद्वारे लोकव्यवहारात निर्माण होणाऱ्या नवजाणिवांमधून जी नूतन मूल्यव्यवस्था उपजेल ती परंपरागत, बंदिस्त, शोषक आणि संकुचित व्यवस्थेला सशक्त पर्याय निर्माण करणारी असेल, या ऊर्मीने ज्ञानदेव गीताभाष्याच्या निर्मितीस प्रवृत्त होतात. समाजातील सर्व घटकांच्या आत्मोन्नतीस साधनभूत होणारा असा जो ज्ञानसाठा संस्कृतात बंदिस्त होऊन पडलेला आहे तो लोकभाषेच्या माध्यमातून सर्वांना सुसेव्य बनवत त्यांद्वारे एकंदर परिवर्तनाचे चक्र गतिमान बनवणे, हे संतांच्या कार्याचे आद्य गमक होय. म्हणजेच, गीताभाष्याची निर्मिती ही प्रारंभ-कृती असली तरी त्या उपक्रमामागील मूळ उद्दिष्ट होते ते त्यापेक्षाही किती तरी व्यापक. त्या परिवर्तनाच्या प्रेरणेला मूल्यात्मक अधिष्ठान पुरविणारा परंपरेला मान्य आणि शिरोधार्य गणला

जाणारा आणि यच्चयावत समाजघटकांना 'सुसेव्य' असणारा ग्रंथ श्रीमद्भगवदगीता हाच असल्यामुळे त्याच्यावर प्रतिपद टीका रचण्याच्या निमित्ताने ज्ञानदेवांनी अध्यात्माच्या प्रांतातील लोकशाहीची जणू राज्यघटना निर्माण करण्याचा उपक्रम हाती घेतला.

खुद्द ज्ञानदेवच त्यांच्या त्या व्यापक परंतु अप्रगट हेतूचे सूचन त्यांच्या ग्रंथामध्ये मांडतात. ते सूचन कमालीचे सूक्ष्म असल्यामुळे त्याच्याकडे आपले लक्ष फारसे जातच नाही. ज्ञानसंपादनाद्वारे आंतरिक उन्नयनाची ऊर्मी ज्यांच्या ज्यांच्या म्हणून अंत:करणात दाटलेली आहे, अशा सगळ्या आर्तांच्या उन्नतीसाठी शांतरसामध्ये अंतर्बाह्य भिजवलेल्या 'ज्ञानेश्वरी'नामक या ग्रंथाची निर्मिती करण्यास माझे सद्गुरू श्रीनिवृत्तिनाथ यांच्या कृपाप्रसादरूपी प्रेरणास्फूर्तीने मी प्रवृत्त झालो, असे प्रतिपादन ज्ञानदेवच करतात. **मग आर्तांचेनि वोरसें । गीतार्थग्रंथनमिसें । वर्षला शांतरसें । तों हा ग्रंथु,** ही ज्ञानदेवांची १८व्या अध्यायाच्या अखेरीस अवतरलेली ओवी, या संदर्भात अतिशय मनोज्ञ, मार्मिक आणि तितकीच कळीची होय. ज्या व्यापक पुनर्मांडणीसाठी आम्ही सिद्ध आहोत त्या परिवर्तनाच्या प्रारंभाचे केवळ निमित्तमात्र इतकेच श्रीमद्भगवद्गीतेचे इथे प्रयोजन आता आहे, हे ज्ञानदेव निखालसपणे सांगून टाकतात.

अध्यात्माच्या प्रांतात लोकशाही समाजव्यवस्था निर्माण करण्याच्या महत्-प्रकल्पाला वैचारिक तसेच मूल्यात्मक अधिष्ठान प्राप्त करून देण्यासाठी श्रीमद्भगवद्गीतेवर प्रतिपद टीका करण्यास तत्पर बनणे, ही, या दृष्टीने बघितले तर ज्ञानदेवांची अमोघ अशी व्यूहरचना ठरते. कृष्णकथित आणि व्यासलिखित (संस्कृतातील) गीताबोध लोकभाषेमध्ये आणणे हा ज्ञानदेवांचा केंद्रवर्ती हेतू असला तरी, जीवनव्यवहाराच्या निदान एका प्रांतात तरी उतरंडप्रधान अधिकारश्रेणीच्या व्यवस्थेची पुनर्रचना आरंभणे ही त्यामागील आद्य व प्रधान प्रेरणा होती. 'गीता' हे त्यासाठीचे केवळ 'निमित्त' (मिष) होते! गीताबोधाच्या जोडीनेच ज्ञानदेवांनी त्यांच्याकडे नाथसंप्रदायाच्या ज्ञानपरंपरेतून संक्रमित होत आलेले शांभवाद्वयाचे तत्वदर्शन 'ज्ञानदेवी'च्या माध्यमातून समाजमानसाच्या पुढ्यात सादर करावे, यांतही एक सूक्ष्म सूचन दडलेले आहे.

ज्या लौकिक-भौतिक विश्वामध्ये आपण जगतो-राहाटतो ते जग म्हणजे मायावादप्रणीत केवळ भ्रम नसून ते विशुद्ध ज्ञानमय शिवतत्वाचे विलसन आहे, असा चिद्विलासवाद उच्चरवाने विदित करत ज्ञानदेवांनी जगराहाटीकडे बघण्याची एक अ-पूर्व व विशुद्ध ऐहिक जीवनदृष्टी मराठी विचारविश्वामध्ये प्रस्थापित करण्याचा

श्रीगणेशा गीतेवर प्रतिपदटीका रचण्याच्या माध्यमातून मोठ्या प्रभावी कुशलतेने केला. स्त्रिया आणि तथाकथित शूद्रवर्णीय समाज या, तत्कालीन समाजव्यवहाराने उपेक्षिलेल्या, अवनत जीवनराहाटी पदरी घातलेल्या दोन आर्त अशा समाजघटकांच्या उन्नयनाची तळमळ आणि त्या तळमळीमधून उमलणारा प्रेमाचा उमाळा या दोहोंच्या कुशीतून गीताटीकेचा जन्म झालेला आहे. प्रस्थापित सत्ताव्यवस्थेने त्या दोन घटकांना नाकारलेले त्यांचे रास्त स्थान त्यांना मिळवून देण्यासाठी आरंभलेल्या उपक्रमाचे ते होते केवळ पहिले पाऊल. मात्र, एक नवीन, बदलत्या लोकमानसाच्या गरजांना कालोचित प्रतिसाद देणारी मूल्यव्यवस्था समाजव्यवहारात प्रस्थापित करणे, ही होती त्या अक्षरश्रमामागील मूळ प्रेरणा. साहित्यिक कृती अथवा निर्मिती हे जरी 'ज्ञानदेवी'च्या रचनेचे दृश्यस्वरूप गणले जात असले तरी, ज्ञानदेवांचे तेच कार्य राजकीय परिमाण लाभलेली कृतीदेखील ठरते अथवा म्हणावी लागते ती अशी व या अर्थाने. या त्यांच्या कृतीद्वारे एकंदर संतचळवळीच्या कुशीतून जे मूल्यसंचित साकारले त्याने तत्कालीन प्रस्थापित व्यवस्थेच्या एका प्रांतात नवप्रेरणा, नवमूल्ये आणि नवोर्मी यांना जन्म दिला. या प्रेरणा व ऊर्मींनी समता, स्वातंत्र्य, बंधुता... यांसारख्या विद्यमान लोकशाही व्यवस्थेचे आधारस्तंभ असणाऱ्या मूल्यांचा पहिलावहिला हुंकार इथल्या व्यवस्थेमध्ये कसा जागवला याचा मागोवा घेणे केवळ रोचकच नव्हे तर उद्बोधक ठरते.

**आत्मखूण आणि आत्मस्तर**

समाजाचा एक सन्मान्य घटक म्हणून प्रत्येक व्यक्तीला काही एक किमान प्रतिष्ठा प्राप्त करून देत स्वत:ची आत्मखूण जपण्याचा पूर्ण अवकाश तिला बहाल करणे, हा ठरतो लोकशाही राज्यव्यवस्थेचा गाभा. उतरंडप्रधान, विषमतापोषक आणि वर्णवर्चस्ववादी धर्मविचाराने बंदिस्त बनवलेल्या मध्ययुगीन समाजव्यवहाराने समूळ लोप घडवून आणलेला होता तो स्त्रिया आणि शूद्रवर्णीय या दोन समाजघटकांच्या आत्मखुणेचाच. पूर्णत: गमावलेली ती आत्मखूण आणि तिच्या ओळखीद्वारे फुटणारा आत्मस्वर त्या दोन समाजघटकांना पुन्हा प्राप्त करून देणे, हे होते ज्ञानदेवप्रणीत पुनर्रचना पर्वातील आद्य आव्हान. ते आव्हान अंगीकारले व तडीस नेले ज्ञानदेवांचेच समकालीन असणाऱ्या नामदेवरायांनी. '**आह्मी दैवाचे दैवाचे । दास पंढरीरायाचे**', हा त्यांचा उद्गार त्याच वास्तवाची साक्ष पुरवितो. ज्या नवसृष्टीच्या रचनेची मूल्यात्मक पायाभरणी ज्ञानदेवांनी केली त्या सृष्टीचे घटक असणाऱ्या प्रत्येकाला त्याची सार्वभौम व स्वायत्त अशी आत्मखूण बहाल करणाऱ्या घटनेच्या प्रास्ताविकेचे, हा अभंगचरण

म्हणजे, जणू आद्य विधानच! 'आम्ही भारताचे नागरिक', हे भारतीय राज्यघटनेच्या प्रास्ताविकातील पहिले विधान प्रत्येक भारतीयाच्या सार्वभौम व स्वायत्त अस्तित्वाचे जे व जसे ऐलान करते, जणू तेच ऐलान त्याच प्रभुसत्तेने, '**आह्मी दैवाचे दैवाचे। दास पंढरीरायाचे**', ही नामदेवरायांची अभंगपंक्ती करते.

'समता' हे लोकशाही राज्यव्यवस्थेमधील पायाभूत मूल्य नामदेवरायांच्या या पुकाऱ्यामध्ये अध्याहृत आहे आणि अनुस्युतही. जात-धर्म-वर्ण-भाषा-प्रांत-लिंग अशा नानाविध घटकांच्या आधारे व्यवहारात द्वैत नांदते ठेवले जात असले तरी, राज्यघटनेसमोर आणि राज्यघटनेच्या लेखी प्रत्येक नागरिक हा समानच असतो व गणला जातो. अगदी त्याच न्यायाने, पंढरीच्या घटनापीठाचा सर्वोच्च घटनादत्त अधिपती असलेल्या पंढरीरायाच्या ब्रह्मांडव्यापी प्रेमसृष्टीचे त्याला शरण गेलेले सगळे घटक – लौकिक सृष्टीमधील त्यांची पतप्रतिष्ठा काहीही असली तरी – एकसारखे दैववान असल्यामुळे समानच होत, हे नामदेवराय स्पष्टपणे सांगत आहेत. त्या सृष्टीची निजखूण असणारी समताप्रधान प्रेममुद्रा एकदा का अस्तित्वावर उमटविली की, तिच्या प्रभावाद्वारे प्राप्त होणाऱ्या आत्मबळामुळे लौकिक सृष्टीतील व्यवहाराने लादलेले तथाकथित हीनदीनपण निःस्तेज आणि अप्रस्तुत ठरते, असा ज्ञानदेवांचा निखालस सांगावा आहे. हे सूत्र स्पष्ट करण्यासाठी ज्ञानदेवांनी दृष्टान्त योजलेला आहे तो राष्ट्रध्वजाचा.

ज्ञानदेवांचा एक अभंग या संदर्भात अतिशय मननीय ठरतो. एरवी कोणाचेही सहसा ध्यान न वेधणारे असे एखादे मळकट-कळकट चिरगुट घरामध्ये कोणत्या तरी कोपऱ्यात पडलेले असते. परंतु, कालौघात, समजा त्याच फडक्यावर राजमुद्रा उमटविली गेली तर त्याला एकाएकी प्रतिष्ठा प्राप्त होते राजध्वजाची. राजाचे सारे वैभव, सामर्थ्य त्या ध्वजाशी मग जोडले जाते. राजध्वजाची प्रतिष्ठा ही राजगादीची प्रतिष्ठा गणली जाऊ लागते. आणि मग, त्या प्रतिष्ठेचे रक्षण करण्यासाठी राजाला आणि राज्यसेवकांना त्यांचे सर्वस्व सतत पणाला लावावे लागते. **पाहे पां ध्वजेचे चिरगुट। रायां जतन करितां कष्ट,** अशा शब्दांमध्ये ज्ञानदेव तो सारभूत गाभा मोठ्या खुबीने मांडतात. अगदी याच न्यायाने, लौकिक सृष्टीमधील लोकव्यवहारात आमचा वर्ण अथवा आमची जात कितीही हीन, पतीत गणली जात असली तरी, एकदा का पांढरीफडाची (पंढरपूर) मुद्रा आमच्या अस्तित्वावर उमटली की पांढरीफडाचा प्रमुख असणाऱ्या पंढरीरायाचे अवघे सामर्थ्य त्या आम्हां मुद्रांकितांचे रक्षण-वर्धनाकरण्यासाठी सिद्ध बनते, हा संदेश व्यक्त करणारे, **तैसा मी एक पतित। परि तुझां मुद्रांकित,** हे ज्ञानदेवांचे उद्गार त्याच वास्तवाकडे संकेत करणारे आहेत. अशी

विलक्षण आत्मखूण तत्कालीन समाजव्यवहाराने उपेक्षिलेल्या आणि म्हणून आत्मगौरव हरवून बसलेल्या समाजघटकांना बहाल करणे ही, गीताभाष्यनिर्मितीला लाभलेल्या राजकीय कृतीच्या परिमाणाची अतिशय मूलभूत अशी परिणती ठरते. असे सारे मुद्रांकित, साहजिकच, मग लौकिक जगात समताधिष्ठित व्यवहार करणारे असावेत हे ओघानेच येते.

ज्ञानदेव ज्या मुद्रेचा निर्देश त्यांच्या अभंगात करतात ती मुद्रा तरी नेमकी कशाची आहे, याचे आकलन झाले की लोकव्यवहारात समतेचे अधिष्ठान दृढ होण्याची पूर्वअट त्या मुद्रेद्वारे कशी सिद्ध होते, याचा उलगडा अगदी सहज व्हावा. वारकरी संप्रदायामध्ये 'गुरुपरंपरेचे अभंग' अशा शीर्षकाचा एक अभंग गट आहे. त्यांत, ज्ञानदेवांचे सद्गुरू श्रीनिवृत्तिनाथ यांचा एक अभंग आहे. नाथसंप्रदायाच्या आगमतत्वाचे अंकुरण कसे व कोठे झाले याचे विवरण निवृत्तिनाथ तिथे मांडतात. नाथसंप्रदायाचे आदिपीठाधीश असणाऱ्या भगवान शंकरांनी स्वमुखाने त्यांच्या अर्धांगिनीला केलेल्या अद्वयबोधाच्या निरूपणाद्वारे नाथसंप्रदायाचे तत्वबीज अंकुरले, असे निवृत्तिनाथांचे कथन आहे. मुदलात, नाथसंप्रदाय हा योगप्रधान संप्रदाय. तेव्हा, उपासनेच्या प्रांगणात नाथसंप्रदायाचा आचारविधी योगमुद्रांकित असावा, हे स्वाभाविक ठरते. भगवान शंकरांच्या माध्यमातून प्रगटलेले शांभवाद्वयाचे तत्वदर्शन मच्छिंद्रनाथांच्या व्यक्तिमत्त्वात स्थिर झाले. मात्र, भगवान शिवशंभुकृत योगमुद्रांकित तत्वबीज मच्छिंद्रांकडे हस्तांतरित होते वेळी एक विलक्षण मूलगामी आणि तितकेच निर्णायक स्थित्यंतर तिथे साकारले, असा निवृत्तिनाथांचा दाखला आहे. आचारविधीच्या प्रांतातील अंगीकारण्यास कठीण व कष्टसाध्य असणारी योगमुद्रा मच्छिंद्रांच्या ठायी स्थिर करतेवेळी, विश्वावर कृपा करणे हाच ज्याचा स्थायीभाव आहे अशा आदिनाथ शंकरांनी तिचे अवस्थांतर, सर्व समाजघटकांना सुसेव्य ठरणाऱ्या प्रेममुद्रेमध्ये घडवून आणले, असे निवृत्तिनाथांचे प्रतिपादन आहे. तीच प्रेममुद्रा, पुढे मग, मच्छिंद्रांनी त्यांचे शिष्यत्व पत्करलेल्या गोरक्षांकडे हस्तांतरित केली, ही सारी प्रक्रिया, **तेंचि प्रेममुद्रा गोरक्षा दिधली । पूर्ण कृपा केली गहिनीनाथा,** अशा शब्दांत विदित करतात निवृत्तिनाथ. प्रेमाचे अधिष्ठान लाभल्याखेरीज समतेच्या मूल्याची रुजवण व्यवहारात संभवतच नाही. याच प्रेममय समतेचे पाठ उभ्या विश्वाला पढविण्यासाठी योगमूर्ती पांडुरंग भीमातटी समचरण आणि समदृष्टी विटेवर अक्षय उभा आहे, हेच तत्व तुकोबा **समचरणदृष्टी विटेवरी साजिरी,** अशा शब्दयोजनेद्वारे आपल्याला स्पष्ट करून सांगतात. तर, याच अभंगपंक्तीच्या, **तेथें माझी हरि वृत्ति राहो,** या उत्तरार्धाद्वारे विठ्ठलचरणी लीन होताना

त्याच्याकडून कोणत्या मूल्यांचा वसा स्वीकारावयाचा, याचे भानही आपल्याला आणून देतात. प्रेम आणि समता ही दोन मूल्ये केवळ भक्तीच्या प्रांतापुरतीच नव्हे तर आपले लौकिक जीवनही उन्नत व निकोप-निरामय बनविण्यासाठी उपकारक व म्हणूनच प्रस्तुत ठरतात, याकडे इथे सूक्ष्म संकेत करतात तुकोबा.

समाजातील प्रत्येक घटकाच्या स्वातंत्र्याच्या रक्षणाची हमी लोकशाही राज्यव्यवस्था देत असते. लोकव्यवहारात समता नांदत नसेल तर स्वातंत्र्याच्या मूल्याला काहीच अर्थवत्ता लाभत नसते. माझे स्वातंत्र्य माझ्या लेखी जितके व जसे सर्वोच्च मूल्यवान आहे अगदी तसेच व तेवढेच मूल्यवान समोरच्यालाही त्याचे स्वातंत्र्य आहे, ही जाणीव व्यवहारात मुरण्यासाठी त्या समाजमानसावर प्रथम समतेच्या मूल्याचे सिंचन अनिवार्य ठरते. समाजव्यवस्थेतील कोणाही घटकाच्या स्वातंत्र्याची पायमल्ली करण्याचा कोणालाच अधिकार नाही, ही संवेदनशीलता त्यांतून उमलते व साहजिकच समाजव्यवहारात विषमतेचा आणि विषमताजन्य शोषणाचा प्रादुर्भाव फैलावण्याच्या शक्यता मुळातूनच खुडल्या जातात.

लौकिक विश्वातील प्रत्येक अस्तित्वाचे स्वातंत्र्य हे जन्मजात व स्वायत्त आहे, हा संतविचाराचा सांगावा त्याच्या मुळाशी असणाऱ्या तत्वदृष्टीमधून अंकुरलेला आहे. त्या तत्वदृष्टीला अधिष्ठान लाभलेले आहे ते ज्ञानदेवांच्या चिद्विलासाचे. अवघ्या दृश्य सृष्टीचे आदिकारण असणारे आणि विश्वरूपाने प्रकटलेले 'शिव' हे आदितत्व, चिद्विलासाच्या तत्वविचारानुसार 'स्व-तंत्र' आहे. त्याचे तसे स्व-तंत्र असणे हेदेखील स्वयंभू, स्वयंसिद्ध व स्वायत्त आहे. ते त्याला अन्य कोणी बहाल केलेले नाही. असे ते स्व-तंत्र शिवतत्वच जगरूपाने प्रकटलेले असल्यामुळे, कार्यकारणभावानुसार, विश्वातील प्रत्येक जीव हा स्वरूपत:च स्व-तंत्र असतो आणि त्याचे ते स्वातंत्र्यदेखील स्वयंसिद्ध व स्वायत्त शाबीत होते. **तुका ह्मणे आह्मीं विधिचें जनिते । स्वयंभु आइतें केलो नव्हो,** हे तुकोबारायांचे वचन म्हणजे त्याच जन्मजात व निसर्गदत्त स्वायत्ततेच्या तेजस्वी जाणिवेचे शब्दरूप होय. परावलंबन द्योतन करते खुजेपणाचे. असीम व्यापकत्व हे निरालंबच असते. आकाशाला आधाराचे टेकू पुरविणारे खांब कोणी बघितले आहेत का? 'स्व-तंत्र' असणे हा 'स्व'चा स्थायीभाव होय. 'स्व'चा स्व-भाव असणाऱ्या स्वातंत्र्याची अनुभूती चाखण्यासाठी 'स्व'चा पैस असीम बनवावा लागतो. आपल्या अस्तित्वातील स्व-कल्पित असे खुजेपण झटकून टाकणे हे सहजसोपे नसते. त्यासाठी प्रचंड असे आंतरिक समर मांडावे लागते. '**आपुलाचि वाद आपणांसी**', असे तुकोबा जे म्हणतात त्याचा इत्यर्थही

हाच. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर स्वातंत्र्याची अनुभूती येण्यासाठी संघर्ष उभारावाच लागतो. त्याला भिऊन चालत नसते. भागवत धर्माने प्रवर्तित केलेल्या भक्तीला लाभलेले संघर्षप्रवणतेचे अस्तर हे असे आहे. परंतु, उदंड संघर्षांती एकदा का ते सीमित अस्तित्व लयाला गेले की संपादन झालेल्या व्यापकपणाद्वारे सर्व प्रकारचे परावलंबन आपसूकच गळून पडते. मुळात या विश्वातील प्रत्येक अस्तित्व हे स्व-तंत्र आहे आणि ते स्वातंत्र्यदेखील कोणी बहाल केलेले नाही तर ते स्वयंभू व स्वायत्त आहे, याची प्रचिती येते. हे सगळे ऐकायला आध्यात्मिक वाटेलही एक वेळ, परंतु या आंतरिक परिवर्तनाद्वारे जे संक्रमण व्यक्तीच्या जीवनव्यवहारात प्रवर्तते त्यांतून लौकिक लोकव्यवहारातील तिच्या चलनवलनात स्वाभाविकपणेच एक आगळा आत्मविश्वास प्रगटतो. **सर्वात्मकपण । माझें हिरोनि नेतो कोण,** हे तुकोबांचे बुलंद आत्मस्वराने रसरसलेले उद्गार म्हणजे त्याच स्वायत्त, स्वयंसिद्ध स्वातंत्र्याच्या जाणिवेचा हुंकार होय. अगदी ढोबळ मानाने, 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे', या लोकमान्यांनी पुढे १९व्या शतकात कंठरवाने केलेल्या घोषामध्ये त्याच स्वरूपसिद्ध, स्वायत्त आणि स्वयंसिद्ध स्वातंत्र्यमूल्याचा पडसाद आपल्याला जाणवतो. विश्वव्यवहाराचे आकलन मायावादाच्या चौकटीत मांडण्याऐवजी चिद्विलासाच्या अधिष्ठानावर त्याचे स्वरूप समजावून घेण्यासाठी गीताभाष्यामध्ये, अवकाश उपलब्ध होईल तेव्हा व तसे, ज्ञानदेवांनी शांभवाद्वयाचे गाभादर्शन सादर करण्याची जी तात्त्विक व्यूहरचना स्वीकारली तिचा हा व्यावहारिक परिपाक होय.

**जागृती आणि आत्मविश्वास**

समता आणि स्वातंत्र्य या दोन मूलभूत मानवी मूल्यांच्या उद्घोषाद्वारे आत्मखुण आणि तिच्याद्वारे आत्मस्वर गवसलेल्या समाजघटकांमध्ये यथावकाश जागृत झालेल्या आत्मविश्वासाचे प्रतिबिंब आपल्याला गवसते ते पैठणवासी एकनाथमहाराजांच्या अभंगरचनांमध्ये. इ. स. १२९६ हे ज्ञानदेवांच्या समाधीचे वर्ष. तर, त्यांचे समकालीन असणारे नामदेवराय इ. स. १३५० मध्ये विठ्ठलस्वरूप झाले. या दोघांच्या नंतर जवळपास दोन शतकांनी एकनाथमहाराज येतात. इ. स. १५३३ ते १५९९ असे ६६ वर्षांचे लौकिक जीवन नाथांना लाभले. ज्ञानदेव आणि नामदेवराय या दोघांनी १३-१४व्या शतकात आरंभलेल्या स्थित्यंतरपर्वाची परिणती, तथाकथित शूद्रातिशूद्रच केवळ नव्हे तर, अंत्यज गणल्या जाणाऱ्या तत्कालीन समाजघटकांमध्ये जागृती आणि आत्मविश्वास जागविण्यात कशा प्रकारे घडून आली अथवा येत होती, याचा दाखला नाथांच्या एका अभंगात आपल्याला पुरेपूर गवसतो.

नाथांचा तो अभंग म्हणजे आहे एका संवादाचे शब्दरूप. हा संवाद आहे एक शास्त्री आणि महार समाजातील एक व्यक्ती यांच्यादरम्यानचा. परमार्थाच्या क्षेत्रातील ज्ञान समाजातील सर्व घटकांना गीताभाष्याच्या माध्यमातून सुसेव्य बनविण्याच्या ज्ञानदेवांच्या कामगिरीमुळे आध्यात्मिक ज्ञानप्राप्तीद्वारे सक्षमीकरण घडून अंत्यजासारख्या तत्कालीन समाजव्यवस्थेने पार गावकुसाबाहेर मोकललेल्या समाजघटकांमध्ये तर्कशुद्ध वादविवाद करण्याचे सामर्थ्य कसे झिरपले होते, याचा वस्तुपाठ म्हणजे नाथांचा हा अभंग ठरावा. अभंगात नाथांनी शब्दबद्ध केलेला शास्त्री आणि महार समाजातील एक व्यक्ती यांच्यादरम्यानचा संवाद खरोखरच झडला होता की नाथांनी ते केवळ कल्पनेने रचलेले आहे, याचा पत्ता लागणार नाही. त्याची गरजही नाही. इथे मुद्दा आहे तो तत्कालीन समाजव्यवस्थेने नाकारलेल्या घटकांमध्ये जागृत व्हायला लागलेल्या आत्मभानाचा. कोणत्याही प्रांतातील का होईना परंतु ज्ञानव्यवहाराचा स्पर्श घडल्याने व्यक्तीचे जे सक्षमीकरण घडून येते त्यांद्वारे एकंदर समाजातील लोकव्यवहारामध्ये असणाऱ्या तिच्या सहभागाचा पोत गुणात्मकरीत्या कसा बदलतो, याचा दाखला आपल्याला या अभंगात मिळतो.

आधीची दोन शतके ज्या प्रकारचे समाजमंथन तत्कालीन मराठी विश्वात सुरू झालेले होते आणि त्यामुळे समाजव्यवस्थेतील उच्चवर्णीयांमध्ये कशा प्रकारची अस्वस्थता निर्माण झालेली होती याची चुणूक अभंगाच्या प्रथम चरणातच आपल्याला दिसते. भेट झालेल्या महार समाजातील एका व्यक्तीला शास्त्रीबुवा, 'कां रे महारा बदमस्ता?', अशा शब्दांत टोकतात. या ठिकाणचा 'बदमस्त' हा नाथांनी योजलेला शब्द अतिशय सूचक आहे. 'गर्वाने मस्त झालेला', 'धुंद', 'उन्मत्त' हे अर्थ तर 'बदमस्त' या शब्दाला असल्याचे शब्दकोश सांगतोच. परंतु, त्या शिवाय, 'बंडखोर' हाही 'बदमस्त' या शब्दाचा अर्थ आपल्याला शब्दकोशात सापडतो. समाजातील प्रस्थापित उच्चवर्णीयांकडून पदरी लादले गेलेले अवमानित जिणे शतकानुशतके निमूटपणे सोसणाऱ्या समाजघटकांमध्ये, १३-१४व्या शतकानंतर जागृत होऊ लागलेल्या आत्मभानापायी, प्रस्थापित व्यवस्थेतील विषमताजन्य पिळवणुकीबाबत प्रश्न उभे करण्याची जी बंडखोर वृत्ती क्रमाने मूळ धरत होती तिच्याबद्दलचा उच्चवर्णीयांच्या मनातील धुमसता संताप शास्त्रीबुवांच्या तोंडी 'बदमस्त' हे विशेषण घालून नाथ अभंगात मोठ्या खुबीने व्यक्त करतात.

शास्त्रीबुवांच्या त्या दरडावणीने अणुमात्रही विचलित न झालेला महार त्यांना, 'कां हो शास्त्रीबावा भलतेंच बोलतां!', अशा शब्दांत त्यांच्या उद्दामपणाची जाणीव

करून देतो. त्यांमुळे बिचकलेले शास्त्रीबुवा, त्यांवर, ‘तुझें बापाचें भय काय?’, असा चढा पवित्रा धारण करतात. अतिशय शांतपणे, मग, ‘माय बाप तुमचें आमचें एकच हाय!’, असे प्रत्युत्तर महार देतो. केवळ इतकेच नाही तर, एकाच निर्गुण ब्रह्मतत्वापासून आपल्या सगळ्यांची उत्पत्ती झालेली आहे, हेही तो शास्त्रीबुवांना बजावतो. एकाच मायबापाची आपण सारी लेकरे असल्यामुळे आपल्या उभयतांमधील समता स्वरूपसिद्ध आणि जन्मजात आहे, हे तत्वदर्शन तो महार अचूक शब्दांत शास्त्रीबुवांच्या पुढ्यात मांडतो. विश्वातील यच्चयावत जीवमात्रांचे ‘माय-बाप’ म्हणून नाथांच्या अभंगातील महार ज्या एकाच निर्गुण तत्वाचा निर्देश करतो त्याच नेमक्या तत्वाचा निर्देश ‘सार्वजनिक सत्य धर्म’ या आपल्या प्रबंधात ‘निर्मिक’ अशा संज्ञेने करत महात्मा जोतीराव फुले पुढे १९व्या शतकात समाजव्यवहारातील जातिजन्य विषमतेवर आसूड ओढतात. सारी मनुष्यमात्रे एकाच निर्मिकाची लेकरे असल्यामुळे त्यांच्यात उच्चनीच भावाने भेद करणे म्हणजे निर्मिकाशी जणू द्रोहच करणे होय, अशी भूमिका जोतीराव त्यांच्या प्रबंधात मांडतात.

एवढ्यानंतरही शास्त्रीबुवा भानावर काही येत नाहीत. ‘निर्गुण तुला काय ठावें?’, असे ते महाराला पुढे विचारतात. आत्मस्वरूप शोधून बघितलेत की तुम्हांला त्याचा उलगडा होईल, असा सल्लेवजा खुलासा, त्यांवर, महार करतो. इथे मात्र शास्त्रीबुवांची पंचाईत झाल्याचे नाथ सांगतात. कारण, ‘आत्मस्वरूप आह्मा कळेना’, अशी सपशेल कबुली शास्त्रीबुवा देऊन टाकतात. तत्कालीन धर्ममार्तंडांच्या पोपटपंचीचे आणि परिणामत: अनुभूतीशून्य पांडित्याचे पितळ उघडे पाडण्याची नाथांची अजोड व्यूहरचना इथे अशी सिद्ध होते! आत्मस्वरूपाचे ज्ञान करून घेण्यासाठी संतांना शरण जाण्याची गरज मग तो महार हतबुद्ध शास्त्रीबुवांना विदित करतो. या सगळ्या जाबसालांनी विस्मित झालेले शास्त्रीबुवा, **‘हें ज्ञान तुला कोणापासून प्राप्त झालें?’**, असा प्रश्न अखेर महाराला विचारतात. तेव्हा, संतांच्या प्रसादामुळे हे ज्ञान मला प्राप्त झाले, असे उत्तर तो महार देतो. अभंगाच्या नामखुणेमध्ये नाथांनी ते श्रेय त्यांच्या सद्‌गुरूंना, म्हणजे, जनार्दनस्वामींना दिलेले आहे.

परमार्थ हे जीवनव्यवहाराचे केवळ एक क्षेत्र होय. परंतु, त्या क्षेत्रातील ज्ञानसंपादनाच्या किल्ल्या गीताभाष्याच्या माध्यमातून समाजातील सर्व जातिवर्णांच्या हाती दिल्यानंतर जे जागरण व जे आत्मभान उपेक्षित, वंचित, अवमानित, अलक्षित समाजघटकांमध्ये साकारले, त्याचा पुरावा म्हणजे नाथांचा हा अभंग होय. ज्ञानव्यवहाराचे लोकशाहीकरण हे सर्वसामान्यांच्या सक्षमीकरणाचे अमोघ साधन

कसे बनते, याचा वस्तुपाठ सादर करत असतानाच, व्यक्तीच्या सक्षमीकरणास कणभरही हातभार न लावणाऱ्या घटा-पटांच्या पोथिग्रस्त झटापटीचे वैयर्थ्यही नाथ इथे अधोरेखित करतात.

आता, या संदर्भात कोणी एक शंका उपस्थित करील. नाथांचा हा अभंग म्हणजे तत्कालीन समाजव्यवहारात नव्याने निपजत असलेल्या प्रेरणा-प्रवाहांचे वास्तव शब्दरूप मानायचे की ती नाथांची केवळ कविप्रतिभा होय, अशी रास्त आशंका मुखर करण्यास वाव निश्चित आहे. दुसऱ्या भाषेत सांगावयाचे तर, पैठणसारख्या वैदिक धर्मव्यवस्थेचे बलशाली सत्ताकेंद्र असलेल्या नगरात महार समाजातील एखादी व्यक्ती वेदशास्त्रसंपन्न शास्त्रीबुवांशी बरोबरीच्या भूमिकेवरून सवाल-जबाब करण्यास १६व्या शतकात खरोखरच धजावेल का अथवा धजावला असती का, ही शंका वास्तविक ठरावी. म्हणजे, या भारूडाच्या माध्यमातून नाथांनी रंगवलेला तो प्रसंग हे निखळ कल्पनाचित्र आहे, असा प्रतिवाद कोणी केला तर तो थेट धुडकावून लावताही येणार नाही. कारण, संतांनी निर्मिलेल्या अभंगकृतीला लाभलेली लौकिक व्यवहाराची चौकट आणि तो अभंग स्फुरण्याच्या वेळी त्या त्या संतांची असलेली अंतरंगस्थिती व त्या क्षणीची त्यांची अनुभूती यांबद्दल आपण पूर्ण अनभिज्ञ असतो. ज्या नवमूल्यांचे जागरण तत्कालीन लोकव्यवहारात घडविण्यासाठी भागवतधर्मी संतपरंपरा कार्यतत्पर बनलेली होती ती मूल्यरचना व्यवहारात खरोखरीच साकारल्यानंतर, समतेचे अधिष्ठान दृढ झालेल्या त्या समाजव्यवस्थेत मुक्त झालेल्या ज्ञानव्यवहाराच्या माध्यमातून उपेक्षितांचे सक्षमीकरण साध्य बनून त्यांद्वारे कनिष्ठ गणल्या गेलेल्या समाजघटकांच्या ठायीदेखील उच्चवर्णियांशी जाबसाल करण्याचे सामर्थ्य कसे निर्माण होऊ शकेल अथवा झालेले असेल, याचे संकल्पचित्रच जणू नाथ त्यांच्या या भारूडाच्या रूपाने तत्कालीन समाजमनासमोर चितारत होते, हाच या संदर्भातील पटण्यायोग्य खुलासा मानता येईल अथवा सांगता यावा. भागवतधर्मी संतांनी घडवलेल्या जागरणाद्वारे समता आणि स्वातंत्र्य या दोन मूल्यांच्या हातात हात घालून बंधुतेचे मूल्य सहजच उमलावे, याचे आता तरी आश्चर्य वाटू नये. **एक एका साह्य करूं । अवघे धरूं सुपंथ,** ही तुकोक्ती म्हणजे तर बंधुतेच्या त्या मूल्याचे प्रगट आविष्करण होय. समाजजीवनाच्या प्रवाहात जे समाजघटक, कोणत्याही कारणाने का होईना पण, पिछाडीवर पडलेले आहेत त्यांना मदतीचा हात देत त्यांचे सक्षमीकरण साध्य करणे, हा बंधुतेच्या तत्वाचा व्यावहारिक अर्थ ठरतो.

संतप्रणीत जागरणाद्वारे बंधुतेचे मूल्य व्यवहारात कसे साकारते, अथवा, कसे साकारणे अपेक्षित व गरजेचे आहे, याचे दर्शन ज्ञानदेवांनी त्यांच्या एका ओवीमध्ये

पाटातून वाहत पिकाखालील भूमी सिंचित करणाऱ्या पाण्याच्या दृष्टान्ताद्वारे घडवलेले आपल्याला दिसते. **निम्न भरलिया उणें । पाणी ढळोचिं नेणे । तेवीं श्रांता तोषोनि जाणें । सामोरेया,** ही 'ज्ञानेश्वरी'च्या १६व्या अध्यायातील ओवी या संदर्भात अतिशय सूचक ठरते. पाटाच्या पाण्याद्वारे वावर भिजवणाऱ्या शेतकऱ्याचे उदाहरण ज्ञानदेव इथे देतात. शेतकऱ्याने दार काढून दिले की पाटाने येणारे पाणी वापऱ्यातील पिकांची तहान भागविण्यासाठी प्रवाहित बनते. मोठे ढेकूळ निघाल्यामुळे वाटेत, समजा, एखादा खड्डा आला तर वाहणारे पाणी त्याच्या प्रवासाची दिशा अंमळ बदलून प्रथम त्या खड्ड्याकडे वळते, तो खड्डा भरते आणि पुनश्च एकवार आपला प्रवास पूर्वीच्या मार्गाने चालू करते, हा अनुभव आपल्या नित्य परिचयाचा आहे. पाटातील खड्डा सूचन करतो अभावग्रस्ततेचे. समाजव्यवस्थेतील वंचितांची अभावग्रस्तता दूर करण्यासाठी बंधुतेचे हेच मूल्य व्यवस्थेतील सक्षमांनी संवेदनशीलतेने जपायचे असते, या सकणव प्रवृत्तीचे सूचन ज्ञानदेव इथे घडवतात. अशा सहृदयतेचा घाऊक अभाव समाजव्यवस्थेतील सुस्थितांमध्ये असेल तर त्या व्यवस्थेतील प्रस्थापित आणि वंचित अभावग्रस्त यांच्यादरम्यानची विषमतेची दरी रुंदावत राहून परिणामी उभ्या व्यवस्थेची शांतीच धोक्यात येते, हा ज्ञानदेवांच्या या कथनातील अप्रगट संदेश ठरतो.

स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मूल्यत्रयी मी फ्रेंच राज्यक्रांतीकडून नव्हे तर आमच्या संतांकडून शिकलो, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर का म्हणतात, त्याचा उलगडा आता सहजपणे घडून यावा.

लोकशाही, मग ती मानवी लोकव्यवहाराच्या कोणत्याही प्रांतातील असो, तिच्यातील 'लोक' हे तत्व त्या व्यवस्थेत सर्वोच्च असते. 'लोक' हे तत्व समूहवाचक असल्यामुळे त्या व्यवस्थेत महत्ता चालते ती समूहाची. 'समाज'नामक लोकसंस्था विचारव्यूहाच्या केंद्रस्थानी असणे, हा भागवतधर्मी संतविचाराचा विशेष होय. **जे पुडुती पुडुती पार्था । हे सकल लोकसंस्था । रक्षणीय सर्वथा । म्हणोनियां,** ही 'ज्ञानेश्वरी'तील ओवी त्याच वास्तवाकडे निर्देश करते. अध्यात्माच्या प्रांतातील लोकशाहीचा उद्घोष करणाऱ्या संतविचाराने, म्हणूनच, आरंभापासून समूहकल्याणाची आस मनीमानसी जोपासलेली दिसते. विशुद्ध ऐहिकता हे मूलभूत मूल्य मानणाऱ्या या विचाराने, प्रथम, परंपरेने बहुमोल समजलेला मोक्ष प्रारंभापासूनच अवांछनीय ठरवलेला आहे. आणि समजा, मोक्षाची महत्ता जपायची असलीच तर, संतविचार, व्यक्तिगत मोक्षाऐवजी सामूहिक मुक्तीचा आग्रह धरतो, ही बाब अधोरेखित करावयास

हवी. **कहीं एकाधेन वैकुंठा जावें । तंव तिहीं वैकुंठचि हें केलें आघवें । माझेनि नामघोष गौरवें । धवळलें विश्व,** ही ज्ञानदेवांची ओवी अथवा, **तुका ह्मणें जनासकळांसहित । घेऊ अखंडित प्रेमसुख,** ही तुकोक्ती संतविचाराने शिरोधार्य मानलेल्या ‘लोक’तत्वाचा निखळ पुकारा करणारे दोन प्रातिनिधिक नमुने ठरतात.

‘ज्ञानेश्वरी’च्या माध्यमातून शैवागमाचा पाठ मराठी जनमानसाला शिकवणाऱ्या ज्ञानदेवांनी चिद्विलासाचे दर्शन पायाभूत म्हणून प्रतिष्ठित बनवल्याने ऐहिक जीवनाची आणि जीवसृष्टीची महत्ता निरपेक्षपणे समाजाच्या विचारविश्वात प्रवेशती झाली. सर्व प्रकारच्या विचारविकारांनी व सर्व वृत्ती-प्रवृत्तींनी साकारणाऱ्या लोकव्यवहाराचा पोत अधिकाधिक निरामय बनवत राहणे, ही समाजातील विवेकी विभूतींची अंगभूत जबाबदारी ठरते, हा मूल्यविचार त्या ऐहिक जीवनदृष्टीचाच परिपाक ठरतो. ‘‘लोकव्यवहार अधिकाधिक निकोप बनविण्यासाठी जो झटतो तो संत’’, ही ‘संत’ या कोटीची समाजसन्मुख व लोकाभिमुख अपूर्व अशी व्याख्या भागवतधर्ममूल्यांद्वारे साकारण्यामागील कार्यकारणभाव हा असा आहे. भागवत धर्मविचाराला अपेक्षित असणारी संतविभूती ही मूलत:, समाजपुरुषाचे बोट धरून त्याला मार्गदर्शन करणारा लोकशिक्षक गणली जाते व तेच कार्य तिच्याकडून निरंतर अपेक्षित असण्यामागील कारणही हेच होय.

**विवेकाचा पाया आणि नीतीमत्तेचे अस्तर**

कोणत्याही लोकव्यवस्थेचा व्यवहार सुरळीत, सुभगपणे व निरामयतेने चालण्यासाठी लोकमानसावर किमान नीतीमत्तेचे सिंचन अनिवार्यच असते. भागवतधर्मी संतविचाराने जे ‘भक्ती’तत्व गौरविले त्याचा पाया विवेकाचा असावा आणि त्याला नीतीमत्तेचे अस्तर जोडलेले असावे, यांत अनुस्युत असणारा केंद्रवर्ती विचार नैतिकतेच्या पायावर दृढपणे उभारलेल्या कल्याणकारी समाजाच्या निर्मितीचा आहे. **जयां भक्तीची येतुली प्राप्तीं । जे कैवल्यातें परौतें सर म्हणती । जयांचे लीलेमाजी नीती । जियाली दिसे,** ही ज्ञानदेवांची ओवी नैतिकतेच्या त्याच आग्रहाकडे स्पष्ट निर्देश करते. ज्या समाजात भक्तीचे माहात्म्य नांदत असते त्या समाजातील लोकव्यवहार नीतीमान असला पाहिजे, या मूलभूत परंतु अतिशय सूक्ष्म बाबीकडे ज्ञानदेव इथे संकेत करत आहेत. जी व्यक्ती स्वत:ला भक्तिवान समजते अथवा मानते ती नीतीवान असलीच पाहिजे, हे प्रमेय ज्ञानदेवांच्या संकेताद्वारे साकारते. दुसऱ्या बाजूने बघितले तर, लौकिक व्यवहारात नीतीचे आचरण करणारी व्यक्तीच भक्तिवान गणता येते अथवा येईल, हा ज्ञानदेवांच्या कथनाचा व्यत्यासही तितकाच रोखठोक शाबीत होतो. तर,

**तुका ह्मणें मना पाहिजे अंकुश । नित्य नवा दिस जागृतीचा,** हे तुकोबांचे वचन, नीतीचा पाया लाभलेल्या भक्तीतत्वाचे जीवनातील आचरण सुळावर बसून पोळी खाण्याइतके दुष्कर का आहे, याचा खुलासा करते. विवेकाच्या पायावर उभ्या नसणाऱ्या तथाकथित भक्तीचा उपहास तुकोबा, **जेथे पाहें तेथें देखींचा पर्वत । पायाविण भिंत तातडीची,** अशा तीक्ष्ण बोलांद्वारे करतात. नीतीयुक्त भक्तीचे आचरण भक्तीच्या नावाखालील दांभिक धर्माचरणाच्या फैलावास जसा आळा घालते तसेच ते एकंदर लोकजीवनाची नैतिक पातळी उंचावण्यासही उपकारक ठरत राहते, ही संतदृष्टी या सगळ्या तर्काच्या पाठीशी आहे.

त्याच वेळी, अशा नीतीयुक्त भक्तीचे आचरण करण्यासाठी लौकिक जीवनाशी पूर्णपणे विसंवादी गणल्या जाणाऱ्या विरागी जीवनराहाटीची आवश्यकता नसते, हे भानही संतविचार आपल्या मनावर बिंबवतो. शुद्ध राहणीमान आचरणारे लौकिक जीवन हे उन्नत अशा पारलौकिक जीवनाचे अधिष्ठान गणले जाते, ही संतप्रणीत दृष्टी या संदर्भात मननीय ठरते. **अर्जुना जयां ऐहिक धड नाहीं । तयांचें परत्र पुससीं काई । हें आणिक सांगु कां वांई । पंडुकुमरा,** हे ज्ञानदेवांचे उद्गार त्याच संकेताकडे स्पष्ट निर्देश करतात. पारमार्थिक जीवन म्हणजे लौकिक जीवनापेक्षा अतिशय वेगळे, कडेकोट नियमांनी बंदिस्त असे काही राहणीमान नव्हे, तर, निर्मळपणे राहाटलेले नीतीमान दैनंदिन जीवनच पारमार्थिक उंचीस प्राप्त होते, ही जाणीव समाजमनावर बिंबवतात चोखोबांची धाकटी बहीण निर्मळा. **परद्रव्य परान्न परनारीचा विटाळ । मानावा अढळ परमार्थी,** हे त्यांचे वचन त्याच वास्तवाचा उच्चार करते. **निंदा दोष स्तुती मान अपमान । वमनासमान लेखा आधी,** हे त्यांचे कथन म्हणजे पारमार्थिक जीवनसरणीचे अधिष्ठान ठरणाऱ्या विशुद्ध लौकिक जीवनासाठीची आदर्श आचारसंहिताच जणू.

कोणतीही समाजरचना आणि लोकव्यवहार निकोप राहण्यासाठी काही किमान नीतीमत्तेचे आचरण व्यक्तिगत तसेच सार्वजनिक जीवनात अनिवार्य ठरते. संतांनी मांडलेल्या परिवर्तनाच्या उपक्रमाचे घटनापीठ असणाऱ्या पंढरपुरात विटेवरी उभ्या ठाकलेल्या विठ्ठलदेवाने प्रवर्तित केलेली प्रेम-समता-बंधुता-करूणा या सर्वसमावेशक चतु:सूत्रीचे आचरण समाजव्यवहारात सतत घडत राहण्यासाठी तो मूल्यठेवा अंगीकारण्याबाबतची बांधिलकी आणि संस्कृती लोकमानसाने जपणे अगत्याचे ठरते. भागवतधर्माने शिरोधार्य मानलेल्या भक्तीला, त्यासाठीच, नीतीचे सघन अस्तर जोडले जाण्याबाबत संतमंडळाने मांडलेला अट्टहास या संदर्भात नीट जाणून घ्यायला

हवा. भक्तीला नीतीमत्तेचे अस्तर नसेल तर केवळ पोकळ आणि अर्थहीन शुष्क कर्मकांडाचा बडिवार माजून त्यापायी आध्यात्मिक व्यवहाराचा पोत ढासळण्याबरोबरच, नीतीतत्त्वाच्या अवहेलनेपायी एकंदर लोकजीवनाचा गुणात्मक दर्जाही खालावतो, याची जाण संतमंडळाला पुरेपूर होती, याचे अनेक दाखले आपल्याला मिळतात.

परंतु, अशा नीतीचे माहात्म्य केवळ पोथ्यापुराणांत अथवा कागदावर बहरून काहीच उपयोग नसतो. नीतीतत्वाच्या पालनाची संस्कृती जर लोकमानस जपणार नसेल तर व्यवहाराचा पोत सुधारणे अशक्यप्राय ठरते. भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीसाठी कार्यरत असलेल्या घटनासमितीचे अध्यक्षपद भूषविणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९५० साली केलेल्या एका भाषणादरम्यान अचूक बोट ठेवलेले दिसते ते नेमक्या याच पैलूवर. घटनेत अंतर्भूत असलेल्या मूल्यांची प्रतिष्ठा व्यवहारात जपण्याची घटनात्मक नैतिकताच जर समाजात नसेल तर घटनेची संहिता व्यवहारात अर्थशून्य बनते, असे अतिशय स्पष्ट प्रतिपादन बाबासाहेबांनी १० जून १९५० या दिवशी त्रिवेन्द्रम येथील त्यांच्या भाषणामध्ये केलेले दिसते. ज्ञानोबा-तुकोबांचा काळ हा राजेशाहीचा होता. लोकव्यवहारात नीतीमूल्यांचे पालन-आचरण किती कसोशीने व काटेकोरपणे केले जाते, हे राजेशाहीच्या युगात सर्वस्वी अवलंबून राहते ते सिंहासनस्थ असणारा सत्ताधीश राजा नीतीतत्वांची बूज कितपत राखतो यांवरच. समाजात नीतीतत्वांचे पालन सर्वसामान्यांकडून होत राहते अथवा नाही, हे राजा त्या संदर्भात किती दक्ष आहे त्यांवर ठरावे, हे स्वाभाविक होय. अनीतीपूर्ण वर्तनामुळे लोकव्यवहार नासून जात असेल तर संबंधित दांडग्यांना राजसत्तेने निर्ममपणे दंड करणे अपेक्षित असते. त्यासाठी, दंडनीतीचे पालन प्रथम राजसत्तेकडून दक्षपणे केले जाणे अगत्याचे ठरते. कारण, समाजव्यवहाराची निकोपता ही अंतिमत: राजाकडून राजधर्माचे पालन किती नीतीपूर्णपणे केले जाते यांवरच अवलंबून असते. परंतु, मुदलात राजधर्मच जर बिघडला तर सगळा लोकव्यवहारच ढासळतो, सगळी समाजव्यवस्थाच अवनतीच्या पंथाला लागते. १३व्या शतकापासून ते १७-१८व्या शतकापर्यंतच्या कालखंडात महाराष्ट्रातील राजसत्तांच्या व्यवहारासंदर्भात संतसाहित्यामध्ये कशा प्रकारचे (प्रत्यक्षाप्रत्यक्ष) निर्देश सापडतात याचा तपशीलवार धांडोळा घेणे या संदर्भात केवळ उद्‌बोधकच नव्हे तर आवश्यक ठरते.

तुकोबांच्या अभंगांतील दोन निर्देश या संदर्भात, केवळ वानगीदाखल, विचारार्ह ठरावेत. या ठिकाणी एक बाब आवर्जून नोंदवून ठेवणे गरजेचे आहे. तुकोबा त्यांच्या वयाच्या विशीमध्ये असताना शिवरायांचा जन्म झाला. आणि वयाच्या

१८व्या वर्षी, म्हणजे इ. स. १६४८च्या दरम्यान, स्वराज्यस्थापनेची शपथ रायरेश्वराच्या पुढ्यात शिवरायांनी घेतल्यानंतर अवघ्या दोन वर्षांतच तुकोबाराय वैकुंठगमन करते झाले. त्यांमुळे, खऱ्या अर्थाने शिवशाही अवतरली आणि बहरली ती तुकोबारायांच्या वैकुंठगमनानंतरच. साहजिकच, तत्कालीन राज्यव्यवहाराच्यासंदर्भात तुकोबांच्या अभंगांत जे दोन निर्देश गवसतात ते शिवपूर्वकालीन राजसत्तांच्या कार्यपद्धतीविषयक असले पाहिजेत, हे केवळ स्वाभाविकच नव्हे तर तर्कशुद्धही ठरते. केवळ सत्ताकारणात मश्गुल असणाऱ्या सत्ताधीशांच्या बदफैलीपायी आणि तिच्यातून स्वाभाविकपणेच निपजणाऱ्या नीतीहीनतेद्वारे समकालीन समाजव्यवहारात कशा प्रकारची सर्वंकष अनागोंदी आणि अनैतिक लोकाचारांचा फैलाव झालेला होता, याचे एक विलक्षण चित्रमय आरेखन तुकोबांनी त्यांच्या गाथेत एके ठिकाणी केलेले आहे. सत्तेची सूत्रे ज्याच्या हाती असतात तो राजाच त्याच्या अंगभूत जबाबदाऱ्यांकडे पाठ फिरवत असल्याबद्दलची मनीमानसी दाटलेली खंतवजा चीड, **बैसोनियां तक्तां । अन्नेंविण पिडीती लोकां**, अशा शब्दांत व्यक्त करतात तुकोबा.

या संदर्भात, एक अनुमान मांडण्यास या ठिकाणी जागा आहे. तुकोबा ऐन तारुण्याच्या उंबरठ्यावर असतानाच, म्हणजे, इ. स. १६२९ ते १६३१च्या दरम्यान सगळा पुणे प्रांत भीषण दुष्काळाच्या संकटातून पोळून निघत होता. सलग दोन–तीन वर्षांचा दुष्काळ आणि त्यांपायी झालेल्या सार्वत्रिक हानीचे चटके खुद्द तुकोबांच्या कुटुंबालाही बसले होते. त्यांची थोरली धर्मपत्नी आणि तिचा मुलगा त्या दुष्काळातील उपासमारीपायी मृत्यू पावल्याचा दाखला खुद्द तुकोबाच देतात. आज ज्या प्रकारच्या दुष्काळ निवारणाच्या योजनांची आखणी शासकीय स्तरांवरून होताना दिसते तशा काही उपायांची कल्पनादेखील त्या काळात असंभवच होती, हे मान्य केले तरी, दुष्काळाने पिडलेल्या जनतेच्यासंदर्भातील तत्कालीन राजसत्तेचा दृष्टिकोन किती अनुदार व बेफिकिरीचा होता अथवा असला पाहिजे, याची पुरेपूर कल्पना आपल्याला तुकोबांच्या शब्दांवरून येते. राजेशाहीच्या पर्वात सर्वसामान्य रयतेचे जगणे आणि त्या जगण्याची गुणवत्ता सर्वस्वी राजा किती कर्तव्यदक्ष आहे आणि राज्यकारभार तो किती नीतीने चालवतो, यांवर अवलंबून राहावा हे उघड आहे. त्यांमुळे, धर्मनीतीचा अंकुश राजसत्तेवर निरंतर राहावा, हा राजनीतीचा एक अनिवार्य संकेत गणला जात असे. खुद्द राजाच जर नीतीच्या पालनाबाबत बेफिकी र असेल तर त्या राज्यातील प्रजेच्या वाट्याला अन्याय व दुराचरणापोटी दु:खखेद यावा, हे स्वाभाविक ठरते. त्यांतही पुन्हा, राजाच प्रजेला पिडत असेल तर तशा राजवटीत अयोग्य वर्तन

करणाऱ्या प्रवृत्ती युक्तीप्रयुक्तीने आपले अनुचित वर्तन व स्वैराचार राजरोसपणे अबाधित चालू राखतात. परिणामी, अशा राजवटीमधील प्रजा खिन्न, उद्विग्न व उदास असावी यांतही काही नवल नाही. **राजा प्रजा पीडी । क्षेत्री दुश्चितासी तोडी** अशा शब्दांत तुकोबा तशा अवनत राजवटीचे शब्दचित्र रेखाटतात.

अनीतीपूर्ण अशा स्वैराचारी वर्तणुकीद्वारे लोकव्यवहाराचा पोत निकृष्ट बनविणाऱ्या शक्तींचा बंदोबस्त राजानेच कठोरपणे करावयाचा असतो, हेदेखील तुकोबा याच संदर्भात ठामपणे प्रतिपादन करतात. उत्तम पीक आलेल्या शेतातील तण जर वेळेवर वेचून निंदले नाही तर ते अवघ्या पिकाचाच घास घेते, हा रोकडा अनुभव तुकोबा या संदर्भात पुढे मांडतात. प्रजा आणि तिचे सुखसमाधान ज्या निरामय समाजव्यवहारावर निर्भर असते तो लोकव्यवहार निकोप राहावा यासाठी राजाचे वर्तन एखाद्या दक्ष शेतकऱ्याप्रमाणे असले पाहिजे, असा तुकोबांचा दंडक आहे. शेतकरी ज्या प्रमाणे पिकातील तणाचा नायनाट करतो अगदी त्याच धर्तीवर प्रजेला उपद्रव देणाऱ्या वृत्ती-प्रवृत्तींचा बीमोड करणे हे राजाचे अंगभूत कर्तव्यच होय, या संकेताचा उच्चार,

**अन्यायासी राजा जरि न करी दंड । बहु च ते लंड पीडिती जना ।। नें करी निगा कुणबी न काढितां तण । कैंचे येती कण हातासी ते,** अशा विलक्षण अर्थवाही शब्दशैलीत करतात. 'लुच्चा', 'दांडगा', 'बेगुमान', 'उन्मत्त', 'स्वैर', 'उनाड'... अशा 'लंड' शब्दाला निरनिराळ्या अर्थच्छटा आहेत. समाजव्यवहाराची गुणवत्ता खालावण्यास कारणभूत ठरणाऱ्या शक्ती-प्रवृत्तींना कठोरपणे वेळीच पायबंद घालण्यासाठी राजसत्तेला मुळात नीतीमत्तेची कदर असली पाहिजे, याबाबत तुकोबांचा असणारा कटाक्ष गाथेतील त्यांच्या अभंगांमध्ये असा प्रगटलेला दिसतो.

लोकव्यवहार उन्नत राहण्यासाठी नीतीशी असणारी आपली बांधिलकी राजसत्तेने दृढपणे जपली पाहिजे, या तुकोबांच्या प्रतिपादनाचा धागा थेट जाऊन भिडतो तो महर्षी व्यासांनी महाभारताच्या 'शांतिपर्वा'मध्ये मांडलेल्या राजनीतीच्या विवरणाशी. श्रीमद्भगवद्गीता आणि श्रीमद्भागवत हे वारकरी संप्रदायाचे दोन अधिष्ठान ग्रंथ होत. महर्षी व्यास हेच या उभय ग्रंथांचे कर्ते. श्रीमद्भगवद्गीतेचा अंतर्भावही व्यासांनी केलेला आहे महाभारताच्या 'भीष्मपर्वात'. हा अवघा अनुबंध बघता, राजसत्तेच्या व्यवहारासंदर्भात तुकोबांनी शब्दबद्ध केलेली विचारमूल्ये, महर्षी व्यासांनी महाभारतामध्ये विशद केलेल्या राजनीतीच्या मूलतत्वांशी सुसंवादी असावीत, यात असाधारण अथवा आश्चर्य वाटण्याजोगे काहीच नाही. धर्मराज युधिष्ठिराला राजनीतीचे मर्म उकलून सांगताना व्यासांनी महाभारतामध्ये जे तत्वचिंतन मांडलेले आहे, त्याचा थोडक्यात परिचय करून घेणे, या संदर्भात इथे उपयुक्त व उद्बोधक ठरावे.

कोणत्याही राष्ट्राचे अभ्युत्थान घडून यायचे तर त्यासाठी राजनीती सुरक्षित हवी, हा व्यासांच्या, राजनीती आणि तिचे राजसत्तेकडून अपेक्षित असलेले पालन, या संदर्भातील सगळ्या विचारविमर्शाचा केंद्रबिंदू होय. राजनीती जर सुरक्षित राखायची तर त्यासाठी प्रथम राजा नीतीमान, चारित्र्यवान, समर्थ आणि सर्वार्थाने सावधान हवा, हे सहजस्वाभाविक ठरते. व्यासांच्या प्रतिपादनानुसार, प्रत्येक राष्ट्राचा आणि पर्यायाने प्रत्येक समाजाचा म्हणून एक सामान्य धर्म असतो. तो सामान्य धर्म किती व कशा प्रकारे दैनंदिन व्यवहारात नांदतो आणि जपला जातो हे सर्वस्वी अवलंबून राहते शासनसंस्थेच्या दक्षतेवर आणि सुव्यवस्थेवर. कोणत्याही राजवटीतील सुव्यवस्थेचे प्रमाण अवलंबून राहते ते राजधर्माचे पालन शासनसंस्थेकडून किती काटेकोरपणे केले जाते त्यांवर. व्यासांच्या विश्लेषणानुसार मानवी जीवनव्यवहारांचे नियंत्रण व नियमन करणारे विविध धर्म हे अंतिमत: राजधर्माच्या अधीन असतात. या तर्कानुसार, एकदा का राजधर्माचेच चलनवलन बिघडले की सारे काही अधोगतीला लागते. राजधर्माचे पालन राजसत्तेकडून निगुतीने होण्यासाठी, प्रथम, राजाकडून दंडनीतीचे पालन यथायोग्य पद्धतीने होणे अनिवार्य ठरते. मानवमात्रांचे लौकिक जीवन आणि मुख्यत: भौतिक कल्याण चतुर्विध पुरुषार्थांपैकी तिसऱ्या पुरुषार्थावर, म्हणजे, अर्थावर विसंबून असतो. त्यांमुळे, राज्यशकट हाकतेवेळी राजाची भूमिका माळ्याप्रमाणे असावी, असे व्यासांचे प्रतिपादन आहे. राजाने कधीही कोळशाच्या व्यापाऱ्याप्रमाणे वर्तन करू नये, असे व्यास आग्रहपूर्वक बजावतात. वृक्षाची चांगली वाढ होऊन त्याला भरपूर फुले-फळे यावीत यासाठी माळी त्याची जोपासना निगुतीने करतो. तर, कोळशाचा व्यापारी तोच वृक्ष मुळापासून तोडून त्याचा कोळसा बनवतो. त्यांमुळे, राजसत्तेची कार्यपद्धती प्रजेला ओरबाडणारी नसावी, असे व्यासांचे कथन आहे.

प्रजेला मुळापासून न उच्छेदता तिला समृद्धीचा मार्ग राजाने दाखवावा आणि प्रजेने निर्माण केलेल्या समृद्धीमधील एक चतुर्थांश भाग राज्यकारभार चालविण्यासाठी राजाने कररूपाने वसूल करावा, असे मार्गदर्शक तत्वही महर्षी व्यास त्यांच्या राजनीतीनिरुपणात नमूद करतात. राजसत्तेच्या अर्थविषयक व्यवस्थापनाचे जे विवेचन आपल्याला महाभारतामध्ये सापडते जवळपास याच भूमिकेचा पुनरुच्चार, पुढे, चाणक्याने त्याच्या 'अर्थशास्त्र' या विख्यात प्रबंधात केलेला आढळतो. प्रजेवर जारी केलेल्या करआकारणीद्वारे करांचे संकलन करत असताना राजाचे वर्तन मधमाशीप्रमाणे असावे, असे चाणक्य म्हणतात. मधमाशी ज्या प्रमाणे फुलामधून अलगदपणे मध शोषून घेते, मधाचा आस्वाद घेतेवेळी फुलाला कोणत्याही प्रकारची

क्षती पोहोचू नये याची दक्षता ज्या प्रमाणे मधमाशी घेते अगदी त्याच न्यायाने, करआकारणीद्वारे प्रजेच्या धननिर्मिती क्षमतेची हानी होऊ नये परंतु त्याच वेळी राज्याच्या तिजोरीमध्ये पुरेसा महसूल जमा होत राहील याची खबरदारी राजसत्तेने घ्यायची असते, हा चाणक्यांच्या विवेचनाचा इत्यर्थ होय. कल्याणकारी अर्थशास्त्राच्या सैद्धान्तिक बैठकीतील एका मूलभूत अशा आधुनिक प्रमेयाचे पडसाद व्यास आणि चाणक्य यांच्या उपरोक्त भूमिकांमध्ये आपल्याला स्पष्टपणे ऐकू येतात. अखेर, माणूस व त्याचे कल्याण हाच कोणत्याही व्यवस्थेचा केंद्रबिंदू असावयास हवा, हे कल्याणकारी अर्थविचाराचे केंद्रवर्ती प्रमेय होय.

आणि, मनुष्य हाच महाभारतामध्ये उमटलेल्या व्यासदर्शनाचाही केंद्रबिंदू होय. राजनीतीचे आणि पर्यायाने राजधर्माचे व्यासकृत अवघे विवेचन मनुष्यकेंद्री आहे. मनुष्याहून या जगामध्ये दुसरे काहीही श्रेष्ठ नाही, असे व्यासांचे नि:संदिग्ध प्रतिपादन आपल्याला 'शांतिपर्वा'मध्ये आढळते. व्यासप्रणीत तत्वविवेचन हे या अर्थाने निखळ 'सेक्युलर' म्हणजे ऐहिक अथवा इहवादी ठरते. मनुष्यमात्रांच्या ऐहिक समूहजीवनाद्वारे साकारणाऱ्या 'समाज' नावाच्या पुरातन लोकसंस्थेचा व्यवहार निरामय ठरायचा तर व्यक्तिगत तसेच सार्वजनिक जीवनात काही किमान नीतीमत्तेचे पालन ही त्याची अनिवार्य अशी पूर्वअट ठरते. तशा किमान नैतिकतेला सोडचिठ्ठी देणे हे मनुष्यपणाला केवळ काळीमा फासणारेच नव्हे तर मनुष्यपणाची हानी करणारे असते, हीच भागवतधर्माचीही धारणा आहे. अरबट-चरबट चरणे, रागराग करणे, लोकरीतीशी विपरीत पोषाख परिधान करणे, द्युत अथवा जुगारासारख्या व्यसनांच्या आधीन जाणे... अशी निरंकुश जीवनराहाटी असणाऱ्यांचा उपहास, **तुका म्हणे त्यांनीं । मनुष्यपणा केली हानी,** अशा शेलक्या शब्दांत तुकोबा करतात, हे या संदर्भात विलक्षण बोलके आहे. तर, माणसाच्या जन्माला आल्यानंतर केवळ शारीरिक-भौतिक सुखलोलुपतेमध्येच आनंद मानत पशुवत जीवन जगणे हे मनुष्याला निसर्गत: प्राप्त झालेल्या अन्य सरस क्षमतांचा अपव्यय करण्यासारखे आहे, याची जाणीव ज्ञानदेव, **दुर्लभुरे दुर्लभुरे दुर्लभु संसारू तुम्हीं कां नेणां । आहारनिद्रेसाठीं दवडितां का माणुसपणा,** अशा शब्दांत करून देतात. एकंदरीने, ऐहिकातील मानवी जीवन समृद्ध व कल्याणप्रद असावे, हा व्यासप्रणीत संदेश आणि भागवतधर्मी संतमंडळाने जोपासलेले मूल्यसंचित या दोहोंतील एकवाक्यता इतकी व अशी सघन आहे. इहलोकातील व्यक्तिगत तसेच सार्वजनिक जीवन नासवून टाकणाऱ्या निकृष्ट वृत्ती-प्रवृत्ती आणि त्या प्रवृत्ती-प्रेरणांच्या चलनवलनाद्वारे साकारणाऱ्या अवनत

लोकव्यवहाराचा पोत मुळापासून बदलण्यासाठी त्या व्यवस्थेत निर्णायक हस्तक्षेप करून प्रस्थापित सत्तासमीकरणांची फेरमांडणी करण्यासाठी भागवतधर्मी संतमंडळाने केलेल्या परिवर्तनाचे स्वरूप या अर्थाने 'राजकीय' म्हणता येईल.

पारमार्थिक ज्ञानठेवा समाजातील सर्व वर्णांच्या स्त्री-पुरुषांना 'सुसेव्य' बनविण्यासाठी भागवतधर्मी संतमंडळाने १३व्या शतकापासून प्रचलीत धर्मव्यवस्थेत आणि पर्यायाने धर्मनियंत्रित समाजव्यवस्थेत जो हस्तक्षेप केला त्यांतून व्यवहारात निपजलेल्या मूल्यांनी तत्कालीन तसेच उत्तरकालीन लोकव्यवहाराचा पोत आमूलाग्र पालटवून टाकणाऱ्या प्रेरणांना जो अवकाश प्राप्त करून दिला त्याचा साधारणपणे ढोबळ आलेख चितारावयाचा म्हणले तर तो असा दिसेल अथवा असा दिसतो. परमार्थाच्या प्रांतातील लोकशाही व्यवस्थेच्या पायाभरणीस आरंभ करून पंढरीच्या वाळवंटात आध्यात्मिक समतेची रेषा संतमंडळाने रेखली १३-१४व्या शतकात. तर, 'एक व्यक्ती एक मत', या मूल्यावर बेतलेल्या लोकशाही राजकीय व्यवस्थेच्या प्रांतात समतेची रेषा पुढे २०व्या शतकात रेखाटली ती भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीद्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी.

आता, या टप्प्यावर एका महत्वाच्या परंतु सूक्ष्म आणि मूलभूत पैलूचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते. संकुचित, भेदप्रवण, उतरंडप्रधान अशा शोषक धर्मसत्तेचे पोलादी संरक्षण हजारो वर्षे लाभलेल्या व्यवस्थेतील कुंठित कोंडी फोडण्यासाठी भागवतधर्मी संतमंडळाने जो हस्तक्षेप केला त्याच्या वर्णनासाठी, आजवर, 'चळवळ' या शब्दाची योजना आपण करत आलेलो आहोत. प्रचलीत व्यवस्थेमधील कालबाह्य, अनिष्ट, रोगट अंशाचे निराकरण करत तिच्यामध्ये परिवर्तन घडवून आणणे हे कोणत्याही चळवळीचे आद्य उद्दिष्ट असते. ज्या उद्देशाने चळवळीची निर्मिती झालेली असते त्यांची पूर्तता झाली की संबंधित चळवळीचे प्रयोजन संपुष्टात येते आणि साहजिकच त्या चळवळीची प्रस्तुतताही संपून जाते. अपेक्षित असलेले परिवर्तन घडवून आणण्यात काही चळवळी यशस्वी ठरतात तर काही अपयशी. मग, भागवतधर्माने १३व्या शतकात मराठी मुलुखामध्ये जे नवजागरण प्रवर्तित केले त्याचे आकलन व वर्णन 'व्यवस्था परिवर्तनाची चळवळ' या शब्दसंहतीपेक्षाही 'समांतर व्यवस्थेची उभारणी' अशी करणे अधिक संयुक्तिक व अर्थवाही ठरते किंवा कसे, त्याचा अधिक सखोल विचार करावयास हवा.

**समांतर व्यवस्थेची उभारणी**

व्यासप्रणीत भागवतधर्मविचाराची सांगड, मराठी भूमीतील विठ्ठलोपासनेशी आणि

आदिशिवापासून उगम पावलेल्या नाथसंप्रदायाच्या तत्वविचाराशी घालत ज्ञानदेव आणि नामदेवरायांनी तत्कालीन प्रचलीत कर्मठ धर्मप्रधान व्यवस्थेला समांतर अशी जी जीवनविषयक तत्वदृष्टी प्रवाही बनवली तिच्या अधिष्ठानापासूनच त्या चिकित्सेचा प्रारंभ करणे संयुक्तिक ठरावे.

वर्णवर्चस्ववादी आणि जन्माधिष्ठित श्रेष्ठ-कनिष्ठ भावभावना जोपासणारा श्रेणीमयुक्त, उतरंडप्रधान, कर्मकांडमय अशा तथाकथित वैदिक धर्मविचाराचे अधिष्ठान मध्ययुगीन समाजव्यवस्थेला लाभलेले होते. एकीकडून तिला धर्मसत्तेचा आधार होता तर दुसरीकडून तिला राजसत्तेचे कवच लाभलेले होते. या व्यवस्थेने नाकारलेल्या अथवा आश्रय नाकारलेल्या समाजघटकांच्या आशा-आकांक्षांची तड लावण्यासाठी तिला आव्हान देण्याचे प्रयत्न सनपूर्व सहाव्या, पाचव्या शतकापासून जैन, बौद्धादिकांनी सुरू केले होते. पुढे, त्या व्यवस्थेला धडका देऊन तिचा चिरेबंदीपणा ढिला करण्याचे प्रयत्न महानुभावांनीदेखील केले. ज्ञानदेवादिकांना तो सारा इतिहास उत्तम प्रकारे ज्ञात होता. वारंवार धडका मारूनही एखादी व्यवस्था दाद देत नसेल तर, मध्ये उपटलेला अडथळा दूर करण्यासाठी निकराचे प्रयत्न करूनही हाती काहीच लागत नसेल तर त्या अडथळ्याला वळसा घालून पर्यायी पंथ अनुसरणाऱ्या पाण्याच्या प्रवाहाचे उदाहरण डोळ्यांसमोर ठेवत, विठ्ठलोपासकांनी, वैदिक व्यवस्थेला समांतर अशी पर्यायी वारकरी व्यवस्था भागवतधर्मविचाराचे अधिष्ठान पुरवत निर्माण करण्याचा उपक्रम अंगीकारला, असे म्हणण्यास भरपूर अवकाश दिसतो आणि गवसतो.

तथाकथित वैदिक व्यवस्थेला अधिष्ठान होते ते ज्ञानराशी गणल्या जाणाऱ्या वेदांचे तर वारकरी व्यवस्थेने अधिष्ठान स्वीकारले ते भागवतधर्मविचार स्वमुखाने प्रतिपादन करणाऱ्या भगवान श्रीकृष्णाच्या अवताररूपाचे -श्रीविठ्ठलाचे. इथेदेखील ज्ञानदेवांनी केलेली व्यूहरचना नीट समजावून घ्यावयास हवी. वेद हे अपौरूषेय आणि परिपूर्ण ज्ञानराशी गणली जात असल्याने वेदविहित व्यवस्थादेखील परिपूर्ण आणि म्हणूनच अपरिवर्तनीय होय, असा वैदिकांचा दावा आणि त्यांचेच धर्मव्यवस्थेवर आणि पर्यायाने धर्मप्रधान तत्कालीन समाजव्यवस्थेवर नियंत्रण व वर्चस्व. आता, तशा बलशाली व्यवस्थेला पर्यायी परंतु समांतर व्यवस्था निर्माण करायची तर तिचे अधिष्ठानदेखील तितकेच निरपवाद श्रेष्ठ असणे अगत्याचे आणि अत्यावश्यक ठरते. या संदर्भात 'ज्ञानेश्वरी'च्या पहिल्या अध्यायातील एक आणि उपसंहारादरम्यान १८व्या अध्यायात ज्ञानदेवांनी समाविष्ट केलेल्या तीन अशा एकंदर चार ओव्या विलक्षण महत्त्वाच्या आणि मार्मिक ठरतात. वैदिक व्यवस्थेचे अधिष्ठान असणारा

ज्ञानराशी वेद ज्या सर्वेश्वराच्या घोरण्याद्वारे निर्माण झाला तो सर्वेश्वरच कुरुक्षेत्रावर अर्जुनाला गीताबोध करता झाला, ही वस्तुस्थिती परंपरा नाकारत नाही. **हा वेदार्थु सागरू । जेया निद्रिताचा घोरू । तो स्वयें सर्वेश्वरू । अनुवादला,** अशा शब्दांत ज्ञानदेव गीतामहिमा वर्णन करतात 'ज्ञानेश्वरी'च्या पहिल्या अध्यायात. तर, तेच वास्तव, किंचित निराळया शब्दशैलीत ज्ञानदेव मांडतात १८व्या अध्यायात. **तरी जयाचां निश्वासीं । जन्म झालें वेदराशी । तो सत्यप्रतिज्ञ पैजेसीं । बोलिला स्वमुखें,** ही ज्ञानदेवांची १८व्या अध्यायातील ओवी पहिल्या अध्यायातील कथनच अधोरेखित करते. खरी गंमत पुढेच आहे. अंकुरल्यानंतर विशाल विस्तार पावणारा एखादा शाल्मली वृक्ष त्याच्या बीजामध्ये अव्यक्तपणे वास करत असतो अथवा सामावलेला असतो. अगदी त्याच न्यायाने, श्रीमद्‌भगवद्‌गीता हे ज्ञानराशी वेदांचे बीजरूप होय, असे ज्ञानदेवांचे प्रतिपादन होय. **म्हणौनि वेदाचें बीज । श्रीगीता होये हें मज । गमे आणि सहज। दिसतही आहे,** हा ज्ञानदेवांचा युक्तिवाद विलक्षण सामर्थ्यवान ठरतो. त्यांमुळे, वेदांचे मूळसूत्र ठरणारे आणि ज्याच्या घोरण्याद्वारे वेदांची निर्मिती झाली त्या सर्वेश्वराने स्वमुखाने कथन केलेले गीताशास्त्र हे वेदादिकांपेक्षाही पवित्र होय, अशी कडी, ज्ञानदेव, **एवं वेदाचें मूळसूत्र । सर्वाधिकारैकपवित्र । श्रीकृष्णें गीताशास्त्र। प्रकट केलें,** अशा शब्दांत त्यापुढे करतात. श्रीमद्‌भगवद्गीता आणि श्रीमद्‌भगवत हे भागवतधर्मविचार विदित करणारे दोन्ही ग्रंथ कृष्णनिर्मित आणि व्यासरचित होत. त्यांमुळे, प्रत्यक्ष सर्वेश्वराने प्रगट केलेले, ज्ञानराशी वेदांचे मूळसूत्र गणले जाणारे गीताशास्त्र यांचे तात्विक ग्रंथात्मक अधिष्ठान आणि द्वापारयुगात कुरुक्षेत्रावर गीताशास्त्राचा उपदेश करणारे आणि पुढे भीमेच्या तीरावर विठ्ठलरूपाने विटेवर उभे ठाकलेले विष्णु-कृष्ण तत्व अधिष्ठानदैवतरूपात स्वीकारत ज्ञानदेव आणि नामदेवराय या उभयता धुरिणांनी वैदिक व्यवस्थेला पर्यायी असा समांतर भागवतधर्माधिष्ठित वारकरी विचारव्यवस्थेचा प्रवाह १३व्या शतकापासून पुढे प्रवाहित बनवला.

वैदिक व्यवस्थेसारख्या तत्कालीन बलशाली वास्तवाशी पूर्णपणे संघर्षाची भूमिका स्वीकारली तर काय भागधेय पदरी येते, याची वारकरी धुरिणांना अचूक जाण असावी, हे या व्यूहरचनेवरून स्पष्ट दिसते. आपण निर्माण करत असलेल्या नवीन व्यवस्थेला अधिष्ठान असा मूल्यग्रंथ आणि अधिष्ठान दैवतही वारकरी व्यवस्थेने असे योजले की ते वैदिक व्यवस्थेपेक्षा गुणात्मकरीत्या निराळे परंतु तिच्याशी जैविक धागा जुळणारे असेच असावे. त्यांमुळे, वर्चस्वशाली वैदिक व्यवस्थेला, एका मर्यादेपलीकडे, या नवीन व्यवस्थेला पार बहिष्कृत करून टाकणे अथवा हद्दपार

करणेदेखील अशक्यप्राय ठरले. एक समर्थ अशी पर्यायी व्यवस्था उभी राहिल्याने बिचकलेल्या वैदिक व्यवस्थेच्या वारकरी व्यवस्थेबरोबर ज्या ठिणग्या उडल्या त्यांचे विविद विभ्रम आपल्याला वारकरी परंपरेतील संतांच्या साहित्यामध्ये विपुल प्रमाणात आढळतात. परंतु, मूळ अधिष्ठान दैवत आणि आधारभूत अधिष्ठान तत्वग्रंथ हे दोन्हीही, वैदिक व्यवस्थेने वहिवाटलेल्या जीवनमूल्यांपेक्षा आणि लोकव्यवहाराकडे बघण्याच्या दृष्टीपेक्षा मूलभूतरीत्या भिन्न असल्यामुळे, वैदिक व्यवस्थेने नाकारलेल्या तसेच परीघाबाहेर राखलेल्या समाजसमूहांना वारकरी व्यवस्थेच्या रूपाने सशक्त पर्याय खुला झाला, हे नि:संशय. या दोन व्यवस्थांच्या माध्यमातून निर्माण झालेल्या मूल्यचौकटींमध्ये किती व कसा अतिशय मूलभूत असा गुणात्मक फरक होता, त्याचे तपशील नीट समजावून घ्यायला हवेत. सर्वसमावेशकता, रसरशीत अशी निखळ ऐहिक दृष्टी, समता, बंधुता, प्रेम, करूणा, परोपकार यांसारख्या, मानवी जीवन निकोप बनविणाऱ्या जीवनमूल्यांची निपज भागवतधर्मविचार रुजविणाऱ्या वारकरी व्यवस्थेमधून कशी निष्पन्न होत राहिली याचे आकलन त्यांखेरीज होणार नाही.

भागवत धर्मविचाराचे अधिष्ठान लाभलेल्या पर्यायी व्यवस्थेने अंगीकारलेले अधिष्ठान दैवत आणि अधिष्ठान ग्रंथच इतके आगळे होते की, त्यांच्या जागरणाद्वारे आपसूकच, वैदिक व्यवस्थेने पुरस्कारलेल्या जीवनदृष्टीपेक्षा गुणात्मकरीत्या भिन्न जीवनदृष्टी लोकव्यवहारात साकारण्याचे प्रवाह खुले बनले. श्रीमद्‌भगवद्‌गीतेने पुरस्कारलेल्या लोकसंग्राहक निष्काम कर्मयोगाच्या तत्वदर्शनाशी सुलभ आणि सुगम सुसंवाद साधणारे ऐहिक जीवनविषयक तत्वज्ञान ज्ञानदेवांच्या शांभवाद्वयाद्वारे लोकव्यवहारात अवतरण्यास ‘श्रीविठ्ठल’ या अधिष्ठान दैवताचे कर्मयोगीरूप सहजाधार ठरले. वैदिकांच्या यज्ञीय देवतांपेक्षा भागवतधर्म व्यवस्थेचा मूलाधार असणाऱ्या विठ्ठलदेवाच्या रूपाने, यज्ञभावनेने आचरलेल्या लौकिक-भौतिक कर्मांचा आदर मनोभावे जपणारे आगळे दैवततत्व समाजपुरुषाच्या पुढ्यात साकारले. कोणाचेही पारिपत्य करणे हे अवताराचे प्रयोजनच नसल्यामुळे, रुद्र अथवा इंद्र या शस्त्रधारी वैदिक देवतांपेक्षा प्रेम व समता आणि या दोहोंच्या मीलनाद्वारे साकारणारी सर्वसमावेशक जीवनदृष्टी प्रसृत करणारे विठ्ठलतत्व त्याच्या साकार रूपाद्वारे अहिंसा आणि निर्वैरता यांचे दर्शन घडवत भीमातटी उभे ठाकले. रोजचे नित्यकर्मच निष्काम वृत्तीने व यज्ञभावनेने आचरावयाचे असल्याने वैदिकांचा सशास्त्र यज्ञविधी व त्यांतील मंत्रोच्चारणाची जागा वारकरी व्यवस्थेत नामोच्चारणाने घेतली. भौतिक व लौकिक जग हा वेदान्तप्रणीत जीवनदृष्टीनुसार ‘अध्यास’ न शाबीत होता परतत्वाचा ‘विलास’

गणला जाण्याने संन्यासाश्रमाच्या माहात्म्याऐवजी प्रतिष्ठा स्वीकारली गेली ती नीतीयुक्त जबाबदार प्रापंचिक जीवनराहाटीची. उभे विश्वच परतत्वाचे आविष्करण होय, हे पायाभूत दर्शन मान्य झाल्याने वेदान्त्यांचे सर्वोच्च जीवनमूल्य गणल्या जाणाऱ्या मोक्षाची महत्ता लयाला जाऊन पुनर्जन्म गर्हणीय मानणाऱ्या जीवनदृष्टीचा लय घडून आला. एकांतात एकेकट्याने मोक्षसाधना करण्याच्या पठडीला छेद जाऊन समूहभक्तीसाधना गणमान्य ठरू लागली. साहजिकच, एकांतवासापेक्षा महती सरस ठरू लागली समाजाभिमुखतेची. यंत्रवत केल्या जाणाऱ्या कर्मकांडांचा दरारा ओसरून अधिमान्यता लाभू लागली विश्वरूपाने नटलेल्या भगवंताच्या लोकसेवेद्वारे साधलेल्या सेवेला. लौकिक प्रपंच ही त्याज्य वस्तू समजून संन्यासाद्वारे तिच्याकडे पाठ फिरवणारी जीवनरीत श्रेष्ठ, या धारणेस ओहोटी लागून, समाजजीवनातील निकृष्ट निवडून काढण्यासाठी कर्तव्यतत्पर होण्याची जबाबदार ऐहिकता समाजमानसात हळूहळू प्रतिष्ठा पावू लागली. भौतिक विश्व हे परतत्वाचे अधिष्ठान गणले जाण्याने तथाकथित आध्यात्मिक साधनेद्वारे व्यक्तिगत मुक्तीचा पाठलाग करण्याची असोशी लयास जाऊन, नीतीयुक्त समाजाभिमुख कर्मप्रधान भक्तितत्वाच्या आचरणाद्वारे लौकिक व्यवहारातील सामूहिक जीवनाचा पोत मूल्यात्मकदृष्ट्या उंचावण्याची जीवनदृष्टी समाजमानसात रुजू लागली. मठा-आश्रमांच्या बंदिस्त व्यवस्थेमधून साकारणाऱ्या वर्जनवादी ज्ञानव्यवस्थेला वाळवंटातील कीर्तनासारख्या खुल्या व्यासपीठाद्वारे प्रवाहित होणाऱ्या ज्ञाननिर्मिती व ज्ञानप्रदान संस्कृतीचा सक्षम व सर्वसमावेशक पर्याय उभा ठाकला. सर्वसामान्यांच्या सर्वांगीण उन्नयनाचे आद्य ध्येय पायाभूत असल्याने लोकभाषा आणि लोकमाध्यमांचा स्वीकार या नवीन ज्ञानप्रसार संस्कृतीचा सहजस्वभाव ठरला. जीवनाचा गुणात्मक दर्जा उंचावण्यासाठी अनिवार्य असणारा ज्ञानसाठा लोकभाषेच्या माध्यमातून प्रवाहित करायचा म्हणल्यानंतर, 'मऱ्हाटी'सारख्या लोकभाषेचे रूपांतर ज्ञानभाषेमध्ये घडवून आणण्यासाठी तिचे सक्षमीकरण घडवत राहणे, हे वारकरी सांप्रदायिक संतविभूतींचे अंगभूत कर्तव्य ठरले. ते त्यांनी निरलस निष्ठेने आणि निगुतीने पार पाडलेदेखील. मुदलात, लेखन-वाचनाची मक्तेदारी काहीच समाजवर्णांच्या कडोसरीला जखडलेली असल्यामुळे ज्ञानप्रसारासाठी मौखिक अभिव्यक्तीचा स्वीकार सहज स्वाभाविक ठरला. उतरंडप्रधान व्यवस्थेत वर्चस्व गाजवणाऱ्या वाचिक पांडित्यापेक्षा अंत:शुद्धीच्या कसावर व्यक्तीच्या समाजमान्यतेची प्रतवारी ठरू लागली. बोलक्या अध्यात्माचा बडिवार ओसरावयास लागून रोकड्या प्रचितीचे माहात्म्य वर्धिष्णू बनले. सर्वसामान्यांचे उत्थान हे गाभामूल्य सर्वोच्च

गणण्याने अंत:शुद्धीस उपकारक ठरणारे आणि लौकिक जीवनराहाटीशी अविरोध साधणारे नामचिंतनासारखे सुलभ आणि सर्वसमावेशक साधन प्रतिष्ठित बनले. वन-कानन सेवन करून एकदेशी अशा व्यक्तिगत स्थितिज साधनेची जागा, वारीसारख्या समूहरूपातील गतिज (चल्) उपासनापद्धतीने घेतली.

भागवत धर्माची पताका खांद्यावर घेतलेल्या संतमंडळाने १३व्या शतकापासून पुढे मराठी लोकविश्वात हे जे स्थित्यंतर प्रवर्तित केले तिचे सम्यक् वर्णन 'चळवळ' या संज्ञेपेक्षाही 'समांतर व्यवस्था' या शब्दसंहतीने करणे अधिक समर्पक व योग्य का ठरावे, याचा उलगडा या साऱ्या उहापोहाद्वारे आता व्हावा, अशी अपेक्षा आहे. ज्या वर्जनवादी व वर्चस्वप्रधान तथाकथित वैदिक व्यवस्थेने ज्या समाजघटकांना समाजव्यवस्थेतील त्यांचे स्थान व अवकाश नाकारलेला होता, अशा समाजसमूहांना एक विलक्षण सशक्त पर्याय भागवतधर्मी वारकरी प्रवाहाने उपलब्ध करून दिला. लौकिक जीवनाकडे बघण्याची एक संपूर्णतया नवीन दृष्टी, तिचा परिपोष करणारे जीवनविषयक पर्यायी तत्वदर्शन व मूल्यसंचित, ते मूल्यसंचित प्रगट करणारे दैवत, त्या मूल्यसंचिताचे विवरण करणारे अधिष्ठान ग्रंथ, मूल्यप्रसारासाठी लोकसन्मुख माध्यमे व व्यासपीठे, अध्ययन-अध्यापन पद्धती, उपासना विधी... असे, 'समांतर व्यवस्था' ही शब्दसंहती यथार्थ ठरविण्यासाठी आवश्यक असणारे सगळे घटकावयव वारकरी पंथाचे जागरण घडविणाऱ्या संतमंडळाने सिद्ध केले. आणि हे सगळेही पुन्हा कसे तर, तत्कालीन समाजमानसावर प्रगाढ प्रभाव गाजविणाऱ्या बलशाली वैदिक परंपराप्रधान व्यवस्थेला थेट झुगारून न देता अथवा तिला आक्रमकपणे न नाकारता. इथे दाखला उचित ठरावा बादशहा आणि बिरबलाच्या गोष्टींमधील एका गोष्टीचा. हातातील काठीने वाळूवर ओढलेल्या आपल्या रेघेला स्पर्शही न करता तिची लांबी कमी करून दाखविण्याचे, तिला थोटी शाबीत करण्याचे आव्हान बादशहाने बिरबलाला दिले होते, तिचा संदर्भ इथे अचूक लागू पडतो. बादशहाने आखलेल्या रेघेशेजारी तिच्या लांबीपेक्षा अधिक लांबीची रेघ बिरबलाने काठी हाती घेऊन आखली आणि बादशहाचे आव्हान संपुष्टात आणले. संकुचित व वर्जनवादी अशा तथाकथित वैदिक धर्मव्यवस्थेच्या प्रस्थापित रेघेशेजारी भागवत धर्मप्रधान व्यवस्थेची उदार, सर्वसमावेशक अशी रेघ रेखाटत संतमंडळाने प्रस्थापित व्यवस्थेतील वैगुण्ये अधोरेखित करत असतानाच त्या वैगुण्यांचे चटके सहन करत आलेल्या समाजसमूहांसाठी एक सशक्त असा पर्यायही उभा केला. भागवत धर्मविचार प्रवाहित करून रु जविणाऱ्या संतपरंपरेच्या कार्याचे 'राजकीय' परिमाण या पद्धतीने समजावून

घेता येईल. जुलमी, अन्यायी व निबर अशा परकी राजसत्तांच्या जोखडाखालून मुक्त होण्याच्या प्रेरणेने, 'स्वराज्य' या संकल्पनेचा उद्घोष करत आणि 'रयतेचे राज्य' हे राज्यकारभारामागील केंद्रवर्ती सूत्र जपत-जोपासत गुणात्मकरीत्या अतिशय भिन्न प्रेरणा, दृष्टी, कारभारपद्धती आणि विधियंत्रणा अंगीकारत शिवप्रभूंनी १७व्या शतकात एका आगळ्या व्यवस्थेची निर्मिती केली. भक्तीच्या अथवा अध्यात्माच्या क्षेत्रात नवव्यवस्था निर्माण करण्यासाठी भागवतधर्मी संतमंडळाने १३व्या शतकात आरंभलेला उपक्रम आणि छत्रपती शिवरायांनी निर्मिलेली 'नूतन सृष्टी' यांचा अंतरंग संबंध हा असा जैविक स्वरूपाचा आहे.

संतपरंपरेच्या या दृष्टीचे व कार्याचे मर्म अचूक जाणलेला आधुनिक काळातील एकमेव महामानव म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. येथील प्रस्थापित अशा बलशाली व्यवस्थेने व परंपरेने आपला संकुचितपणा व वर्जनवादी व्यवहार विसर्जित करावा यासाठी शक्य होते तेवढे सारे उपाय करून झाल्यानंतर, वाटेतील अडथळा दूर करण्यासाठी बराच काळ झुंजल्यानंतर त्याला वळसा घालून पुढे गतिमान होणाऱ्या पाण्याच्या प्रवाहाचे उदाहरण डोळ्यांसमोर ठेवत, वारकरी संप्रदायाने भागवत धर्माच्या अंगीकाराचा पर्याय चोखाळला. अगदी त्याच पद्धतीने, तथाकथित अस्पृश्यतेचा शिक्का मारत गावकुसाबाहेर मोकललेल्या समाजघटकांना त्यांचे रास्त स्थान हिंदू समाजव्यवस्थेने प्रदान करावे म्हणून संघर्षमय प्रयत्नांची पराकाष्ठा केल्यानंतर, अंतिमतः, १४ ऑक्टोबर १९५६ या दिवशी बाबासाहेबांनी बौद्ध धर्माच्या अंगीकाराचा पर्याय व्यवहारात साकारला. बौद्ध धर्माच्या माध्यमातून वंचित समाजसमूहांना एक समांतर अशी सशक्त पर्यायी व्यवस्था इथे बाबासाहेबांनी निर्माण केली. वैदिकांना प्रिय असणाऱ्या विष्णूंचा अवतार गणल्या जाणाऱ्या विठ्ठलाचा अधिष्ठान दैवत म्हणून अंगीकार करत, वैदिक परंपरेला समांतर प्रवाह वारकरी संप्रदायाने मध्ययुगात प्रवाही बनवला. तर, त्याच विष्णूंच्या दहा अवतारांमध्ये अंतर्भाव असणाऱ्या भगवान बुद्धांचे अधिष्ठान स्वीकारत बाबासाहेबांनी २०व्या शतकात बौद्ध धर्माचा समांतर प्रवाह बलिष्ठपणे गतिमान बनवला. मानवी जीवनाच्या काही अंगांमध्ये तरी किमान समता व बंधुता नांदावी यासाठी कार्यप्रवण बनलेल्या या दोन प्रवाहांनी त्या त्या काळातील प्रचलीत लोकव्यवहाराला प्रदान केलेले योगदान या अर्थाने 'राजकीय' होते व ठरतेही.

भक्तीच्या अथवा परमार्थाच्या प्रांतात तरी संकुचित, भेदप्रवण आणि विषमतापूरक जातविचार अप्रस्तुत ठरत तिथे समता, बंधुता आणि प्रेम या जीवनमूल्यांचा माहौल

नांदावा यासाठी सर्वसमावेशक लोकव्यवहाराचे प्रवर्तन घडविणाऱ्या भागवतधर्मविचाराची पहिली रेखा पंढरीच्या वाळवंटात रेखत प्रस्थापित वैदिक समाजव्यवस्थेला समर्थ पर्याय निर्माण करण्याचा हस्तक्षेप संतपरंपरेने मध्ययुगात केला. तर, 'एक व्यक्ती एक मत' या पायाभूत तत्वाचा उद्घोष करत भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून लोकव्यवहाराच्या राजकीय क्षेत्रात समता प्रस्थापित करण्याचा मार्ग राज्यघटनेच्या स्वीकाराद्वारे १९५० साली खुला झाला. पंढरीच्या वाळवंटाला भक्तीच्या प्रांतातील समतेचे आद्यपीठ आणि कीर्तनाच्या माध्यमातून खुल्या ज्ञानप्रसाराचे ज्ञानपीठ बनविणारे नामदेवराय १३५० साली विठ्ठलचरणी लीन झाल्यानंतर पुऱ्या सहा शतकांनी राजकीय जीवनातील समतेचा पुकारा करणारी दुसरी रेषा आखली गेली. तत्कालीन समाजव्यवहारात प्रस्थापित असणारा सत्तातोल, निदान भक्तीच्या प्रांतात तरी अप्रस्तुत ठरविण्यासाठी भागवतधर्मी संतमंडळाने अंगीकारलेल्या 'राजकीय' कृतीमागील प्रेरणा आज कालविसंगत ठरतात का अथवा त्या प्रेरणा प्रचलीत वास्तवाच्या चौकटीत कालबाह्य झाल्या आहेत का, या मुद्याचा विचार या टप्प्यावर आता प्रस्तुत ठरतो.

इथे, या संदर्भात, प्रकर्षाने आठवण होते ती घटनानिर्मितीकरिता नियुक्त केलेल्या मसुदा समितीचे अध्यक्षपद भूषविलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी, २५ नोव्हेंबर १९४९ या दिवशी मसुदा समितीच्या अंतिम सभेत केलेल्या भाषणादरम्यान मांडलेल्या एका अतिशय कळीच्या मुद्याची. संविधानाचा मसुदा संमत करण्यासाठी भरलेल्या त्या सभेमध्ये बोलताना बाबासाहेब म्हणतात, "२६ जानेवारी १९५०ला आपण एका विसंगतीयुक्त जीवनात प्रवेश करणार आहोत, राजकारणात आपल्याकडे समता राहील परंतु सामाजिक आणि आर्थिक जीवनात विषमता राहील. राजकारणात प्रत्येकाला एक मत आणि प्रत्येक मताचे समान मूल्य या तत्वाला आपण मान्यता देणार आहोत. आपल्या समााजिक आणि आर्थिक जीवनात मात्र, सामाजिक आणि आर्थिक संरचनेमुळे, प्रत्येक माणसाला समान मूल्य हे तत्त्व आपण नाकारित राहाणार आहोत. अशा परस्परविरोधी जीवनात आपण आणखी किती काळ राहाणार आहोत? आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात आपण आणखी किती काळ समता नाकारणार आहोत? आपण जर ती अधिक काळपर्यंत नाकारत राहिलो, तर आपली राजकीय लोकशाही आपण धोक्यात आणल्याशिवाय राहाणार नाही. ही विसंगती शक्य होईल तेवढ्या लवकर आपण दूर केली पाहिजे". आज पाऊण शतक उलटून चालले तरी बाबासाहेबांनी तीव्रतेने जाणीव करून दिलेल्या त्या विसंगतीचा विलय

घडवून आणण्याकडे आपण इरेसरीने प्रवृत्त झाल्याच्या खुणा काही कोठे दिसत नाहीत. लोकव्यवहाराच्या पारमार्थिक आणि राजकीय क्षेत्रांत समतेची स्थापना करण्यासाठी गतकालात साकारलेल्या व्यवस्था परिवर्तनाच्या दोन प्रवाहांनी दोन रेखा आखून ठेवल्या आहेत. वारकरी संप्रदायाच्या योगदानाचा महिमा आज सर्वत्र कंठरवाने गायला जातो आहे. आता, आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रात समतेचे प्रस्थापन करण्यासाठी, त्या अर्थाने 'राजकीय' कृती करण्याबाबत त्याच वारकरी परंपरेकडून आपण काही प्रेरणा घेणार किंवा नाही? तिसरी रेघ आपण केव्हा आखणार?

## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथलयाचाही लाभ घेता येईल.

## 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलाकडे व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## अर्थबोधपत्रिका मासिक
## वर्गणीदारांसाठी विशेष योजना

| | |
|---|---|
| **वार्षिक वर्गणी** | **फक्त २००/– रुपये** |
| **द्वैवार्षिक वर्गणी** | **फक्त ३५०/– रुपये** |
| **त्रैवार्षिक वर्गणी** | **फक्त ५००/– रुपये** |
| **पंचवार्षिक वर्गणी** | **फक्त ८००/– रुपये** |

**The Bank details for NEFT are as under :**

- Bank Name : **Vidya Sahakari Bank S.B. Road, Pune 411016.**
- Account Name : **Indian School of Political Economy**
- Bank Account No. : **200403130004208**
- NEFT/RTGS No. : **SVCB0003004**
- IFSC Code : **SVCB0003004**

नियतकालिकांच्या मालकी हक्क व इतर तपशीलाबाबत फेब्रुवारीनंतर प्रसिद्ध होणाऱ्या अंकामध्ये प्रसिद्ध करावयाचे प्रगटन, नियतकालिकांच्या रजिस्ट्रेशनबाबत केंद्र सरकारच्या १९५६ मधील नियम (क्रमांक ८) नुसार फॉर्म ४

| | | |
|---|---|---|
| (१) | नियतकालिकाचे नाव : | 'अर्थबोधपत्रिका' |
| (२) | प्रकाशन स्थळ : | 'अर्थबोध', ९६८/२१-२२,<br>सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६. |
| (३) | नियतकालिकाचे स्वरूप : | मासिक |
| (४) | प्रकाशकाचे नाव : | व्ही. एस. चित्रे |
| | राष्ट्रीयत्व : | भारतीय |
| | पत्ता : | 'अर्थबोध', ९६८/२१-२२,<br>सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६. |
| (५) | मुद्रकाचे नाव : | व्ही. एस. चित्रे |
| | राष्ट्रीयत्व : | भारतीय |
| | पत्ता : | 'अर्थबोध', ९६८/२१-२२,<br>सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६. |
| (६) | संपादकांचे नाव : | अभय टिळक |
| | राष्ट्रीयत्व : | भारतीय |
| | पत्ता : | 'अर्थबोध', ९६८/२१-२२,<br>सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६. |
| (७) | मुद्रणस्थळ : | एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट,<br>२०५ शनिवार पेठ, पुणे - ४११ ०३०. |
| (८) | नियतकालिकाच्या मालकांचे किंवा एकूण भागभांडवला पैकी एक टक्क्यांहून अधिक भाग धारण करणाऱ्या भागधारकांची नावे व पत्ते | 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'<br>(भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी)<br>'अर्थबोध', ९६८/२१-२२,<br>सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६. |

मी, व्ही. एस. चित्रे याद्वारे प्रमाणित करतो की वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा आहे.

व्ही. एस. चित्रे

दिनांक - १ मार्च २०२४ (प्रकाशकाची सही)

**RNI Regn. No. MAHMAR/2002/9806**
**Published and Posted at Model colony Post Office Pune,**
**On 10th of each month**

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■ 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■ भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■ अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग-व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■ इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■ संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राकिय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■ संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■ अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे – ४११ ०३०. येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे-४११ ०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**